

## : श्रद्धास्थान :



श्री अनेकांत
231/क
3043
जि.कोल्हापूर

श्रीबाहुबलिस्वामिने नमः ।

## : प्रेरणास्थान :



प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज

## गजाबेन व परिवार

पिता



स्व. फूलचंद मेहता



माता



स्व. राजूबाई मेहता

भून यांचे वयाच्या १७ व्या वर्षीचे छायाचित्र



(आसनस्थ डावीकडून)- प्रकाशचंद्र शहा (भावोजी), इंदुमती (बहीण), राजूबाई (आई), जीवराज व विमलचंद (भाऊ) सुरेखा (भाची) आणि (वर उभे असलेले) जीवराजची मुले, सुना व नातवंडे

आजोबा



श्री. नेमचंद वालचंद गांधी,
वकील (धाराशिवकर)

मामा



श्री. विमलचंद गांधी

मामा



हैद्राबाद संस्थानचे तत्कालीन शिक्षण
व आरोग्यमंत्री श्री. फूलचंद गांधी



धर्मपुत्री ब्र. सुजाता रोटे यांच्या सोबत



श्री. जतीन्द्र गांधी (मामेभाऊ),
श्री. सुबोध शहा (मावस भाऊ)
सौ. माधवी गांधी, सुजाताताई
व श्रीमती शुभांगी गांधी

# गजाबेन–त्यागींच्या सान्निध्यात



प. पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराज.



गुरुदेव समंतभद्र यांना आहारदान.



प. पू. १०८ आचार्यश्री विद्यानंद महाराज आणि संघ.



पूज्य आर्यिका १०५ प्रशांतमती माताजी.



पूज्य आर्यिका १०५ अजितमती माताजी.




स्वस्तिश्री कर्मयोगी चारुकीर्ती भट्टारक स्वामीजी.

## गजाबेन-संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत



मा. साहू श्रेयांसप्रसादजी व श्री. लालचंद काका.



मा. श्रीमती चतुरबाई मोतीचंद शहा.



मा. श्रीमती शरयूताई दफ्तरी.



मा. ब्र. श्री. भीसीकर गुरुजी, मा. ब्र. श्री. तात्या गुरुजी,
मा. ब्र. श्री. श्रीधर आण्णा.



मा. श्री. अरविंद दोशी व श्री. साहू अशोककुमारजी.



मा. श्री. सनत्कुमार आरवाडे, मा. श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे दादा,
मा. श्री. बी. टी. बेडगे गुरुजी व मा. श्री. डी. सी. पाटील.

ॐ

# गुरुकुलमाता
# गजाबेन-जीवनदर्शन

: शब्दांकन :

**ब्र. सुजाता रोटे, बाहुबली**

: प्रकाशक :

**अनेकांत शोधपीठ,**

**श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली**

वीर निर्वाण संवत् : २५३८
इसवी सन् : २०१२

प्रकाशन दिनांक : १९-२-२०१२
प्रती : १०००
किंमत : रु. २०

प्राप्तिस्थान : १) भरतेश ग्रंथ भांडार, बाहुबली
२) महावीर ग्रंथ भांडार, कारंजा
३) पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, वेरुळ

कॉम्प्युटर टाईप सेटिंग : समय क्रिएशन्स, हातकणंगले
मुद्रक : स्वस्तिक ऑफसेट, सांगली

# प्रकाशकीय

३१ जुलै २०११ रोजी 'शांतिसागर प्रवचन हॉल' येथे या भागातील विद्वानांचा स्नेह मेळावा आयोजित केला होता. त्या मेळाव्यात आदरणीय भूनच्या कार्याचा गौरव करून जिनधर्म प्रचारासाठी भूनप्रमाणे विद्यमान विद्वानांनीही प्रयत्नशील राहावे यासाठी प्रेरणा देण्यात आली. मेळाव्यासाठी कार्यकर्ते व विद्वान मिळून सुमारे १५० लोक (पुरुष+स्त्री) उपस्थित होते. सकाळी ७ पासून सायंकाळी ४.३० पर्यन्त हा मेळावा संपन्न झाला.

दरम्यानच्या काळात संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आदरणीय भूनचे कार्य भव्य व दिव्य असल्याने भूनच्या उपस्थितीत एक भव्य समारभ करून त्यांचा गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याच सल्ला दिला. त्यानुसार या मेळाव्यामध्ये 'गुरुकुलमाता गजाबेन गौरवगाथा' समारंभपूर्वक करण्याची घोषणा केली. उपस्थित सर्वांनी या घोषणेचे स्वागत केले.

सन्मती मासिकातून उपर्युक्त ग्रंथासाठी लेख पाठविण्याची सूचना प्रसारित करण्यात आली. भूनच्या कार्यासंबंधी आस्था असणाऱ्या अनेकांनी आमच्याकडे विविध विषयांवरील लेख पाठविले. स्वतः ब्र. सुजाताताई भूनजवळ सुमारे ३० वर्षे वास्तव्य करून आहेत. त्यांमुळे त्यानीही भूनच्या बालपणापासूनचा सविस्तर वृत्तान्त लिहिला. त्यामध्ये संस्थेच्या संबंधित काही घटनांचाही सविस्तर उल्लेख आहे. त्यामुळे त्यांच्या एकट्याचाच लेख सुमारे १०० पानांचा झाला.

गौरव-ग्रंथाच्या विस्ताराची मर्यादा लक्षात घेऊन व पुनरावृत्ती टाळली जावी या हेतूने संपादक मंडळींनी ब्र. सुजाताताईंना गौरव ग्रंथासाठी संक्षिप्त लेखाची मागणी केली व ''गुरुकुल माता – जीवनदर्शन'' नावाने एक स्वतंत्र चरित्रात्मक ग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरविले. त्यानुसार वाचकासमोर हा ग्रंथ उपलब्ध होत आहे.

डॉ. ब्र. सुजाताताई भूनप्रमाणे संस्था व समाजाच्या हितासाठी झटत

आहेत. धर्मप्रभावना व्हावी म्हणून त्या अहर्निश प्रयत्नशील असतात. बाहुबलीतील शिबिरांची परंपरा त्यांच्यामुळेच अखंडित सुरू आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे नाही.

गौरव गाथा व प्रकाशन समारंभासाठी दान संकलनाची जबाबदारी त्यांनी आपल्या शिरावर घेऊन ती यशस्वीपणे पार पाडली. म्हणून त्या धन्यवादास पात्र आहेत.

त्यांनी लिहिलेला हा 'गुरुकुलमाता जीवनदर्शन' ग्रंथ वाचकांना, विद्वानांना व संशोधकांना नक्कीच स्पृहणीय होईल अशी आशा आहे.

दि. १९-०२-२०१२

कार्यवाह,
अनेकान्त शोधपीठ, बाहुबली



# मनोगत

प. पू. समंतभद्र महाराजांचे सुसंस्कार भूनच्या हृदयावर प्रथमपासूनच खोल रुजल्यामुळे त्यांनी महान कार्य करूनसुद्धा कधी सत्कार समारंभाची, मान-सन्मानाची स्तुती-प्रशंसेची अपेक्षा ठेवली नाही. त्यामुळे आजपर्यंत त्यांच्याबद्दल काहीही लिखाण झालेले नाही. जून महिन्यात देवळाली येथे भून पडल्यामुळे त्यांचे प्रकृतिस्वास्थ्य बिघडले. वार्धक्यामुळे त्यांचे जीवन अस्थिर वाटू लागले. त्यामुळे भूनच्या उपस्थितीत सर्व विद्वानांना ३१ जुलै २०११ रोजी एकत्र बोलावून भूनची आंतरिक इच्छा प्रकट करावी या हेतूने संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विद्वत्संमेलन आयोजित केले. त्यावेळी भूनची आंतरिक भावना 'आज समाजामध्ये चारही अनुयोगांचा सखोल अभ्यास असणाऱ्या विद्वानांची उणीव भासू लागली आहे. तरी त्या उणीवेची आपण पूर्तता करावी अर्थात विद्वानांनी चारी अनुयोगांचे गहन अध्ययन करून त्यावर अधिकार प्राप्त करावा. कारण समाजाचे हित त्यागी व विद्वान या दोघांवर अवलंबून आहे. सर्वांनी एकत्र येऊन पक्षपात सोडून जिनेन्द्र प्रणीत तत्त्वाचा प्रचार प्रसार करावा.'

याच कार्यक्रमाप्रसंगी संस्थेच्या विश्वस्तांनी पुढील इच्छा उपस्थित सर्वांना सांगण्यात आली. भूननी निरपेक्षरूपाने दिलेल्या सेवायोगाचा व कर्तृत्वाचा एक गौरव गाथा प्रकाशित करून मोठ्या प्रमाणात गौरव समारंभ आयोजित करावा, जेणे करून समाजाला भूनच्या कार्याची माहिती मिळेल व अन्य महिलांनाही त्यांच्या आदर्श जीवनाची प्रेरणा मिळेल' उपस्थितांना सांगितली. त्यानुसार भूनच्या गौरव ग्रंथाचे नियोजन करण्यात आले. त्यामध्ये भूनचे जीवनचरित्र लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. वेळोवेळी भूननी सांगितलेले प्रसंग आठवून मी त्यांचे जीवनचरित्र लिहायला सुरवात केली. १५-२० पृष्ठांमध्ये जीवनपरिचय लिहून होईल

असा संपादक मंडळांनी अंदाज केला होता; परंतु प्रारंभिक जीवनचरित्रानेच १५ पृष्ठे भरली. अद्यापि शेष जीवन व कर्तृत्व लिहणे शेष होते. मी श्री. जडे गुरुजींना भीतभीतच म्हणाले अजून २०-२५ पृष्ठे तरी होतील. कसे करू? गुरुजी म्हणाले-तुम्हाला जेवढे लिहायचे असेल तेवढे लिहा. पृष्ठांचा विचार करू नका. मी बिनधास्तपणे सहजगत्या लिहीत गेले तर ८५ पृष्ठे भरली. माझे मलाच आश्चर्य वाटू लागले की मी एवढी पृष्ठे कशी काय लिहू शकले? विचार केल्यावर लक्षात आले की 'भूनचे जीवन व कार्यच एवढे महान आहे की त्याचे शब्दात वर्णन करणे कठीण आहे. कितीही लिहले तरी असे वाटते की अजून अपूर्णच आहे. त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाला आपण शब्दबद्ध करू शकलो की नाही याची मला शंकाच वाटते. कारण माझी लेखनशैली अत्यंत साधी आहे. अलंकृत भाषाशैलीच्या वापराचा सराव नाही व अवास्तव वाढवून लिहिता येत नाही. जशी वस्तुस्थिती असेल तसे रेखाटण्याची सवय आहे. त्यामुळे मी लिहिलेले चरित्र गुणात्मक नसले तरी तथ्यात्मक नक्कीच आहे. पाठकांनी एवढे समजून घ्यावे की मी लिहिलेल्या चरित्रापेक्षाही भूनचे चरित्र महान आहे.

लेख विस्तृत झाल्यामुळे संपादकमंडळाने विचार केला की जीवनचरित्राचे एक स्वतंत्र पुस्तकच काढू. खरेतर स्वतंत्र पुस्तकाच्या हिशोबाने मी लिहले नव्हते. परंतु हा योग सहज घडून आला.

भूनसमोरच बसून मी त्यांचे जीवनचरित्र लिहीत होते, तेव्हा भून मला विचारत असत. तू काय लिहितेस? मी त्यांना म्हणाले 'तुमचे जीवनचरित्र लिहिते. त्यावर भून खवळल्या व म्हणाल्या.' आमचे काय जीवनचरित्र लिहितेस? जीवनचरित्र लिहिण्याइतपत आमची लायकी नाही. ती पाने फाडून टाक, नाहीतर मी फाडते? त्यानंतर प्रत्येकवेळी विचारल्यावर मी भूनना खोटेच सांगितले की सन्मतीसाठी प्रवचनसारवर लेख लिहिते. त्यांना खोटे बोलताना मला खंत वाटत होती व त्यांच्या मनाविरूद्ध आपण करतो आहोत याचाही खेद वाटत होता; परंतु माझा नाईलाज होता.

त्यांच्या हयातीत त्यांचे जीवनचरित्र लिहिण्याची मला संधी प्राप्त होईल असे स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते, परंतु ते सद्भाग्य प्राप्त झाले व



त्यांच्याबद्दल आपण काही लिहू शकलो याची धन्यता वाटते. काही सन्मति अंकांचा व भूनच्या १९४१ ते १९४४ व १९५६ ते १९६० पर्यंतच्या ९ डायऱ्यांचा आधार घेऊन मी वास्तविक वस्तुस्थिती लिहू शकले.
या सिद्धान्तास अनुसरुन-

**गच्छतः स्खलनं क्वापि भवत्येव प्रमादः।**
**हसन्ति दुर्जनास्तत्र समादधति सज्जनाः।।**

चरित्र लिखाणामध्ये ज्या काही त्रुटी झाल्या असतील किंवा कुणाचे मन दुखावले गेले असेल तर त्याबद्दल मी निश्छल अंतःकरणाने परोक्ष त्या सर्वांची क्षमा मागते.

दि. ०१-०२-२०१२

– ब्र. सुजाता रोटे,
बाहुबली

# गुरुकुलमाता गजाबेन : जीवनदर्शन

**धाराशिव आजोळ –**

मराठवाड्यामधील प्राचीन इतिहास आपल्या उराशी बाळगून असलेले सुप्रसिद्ध शहर 'धाराशिव'. धाराशिवचा परिसर लेण्यांनी नटलेला आहे. धाराशिवच्या दक्षिणेस मैलभर अंतरावर काही हिंदू लेणी आहेत व उत्तरेस दोन मैल अंतरावर सात लेण्यांचा समूह आहे. त्यापैकी सहा लेणी जैनधर्मीय असून सातव्या क्रमांकाची लेणी वैष्णवपंथीय आहे. दक्षिणेस असलेल्या 'हातल्या' डोंगराच्या पायथ्यास असलेली लेणी मातीने मुजली असून ती जैनधर्मीय असण्याची शक्यता आहे.

धाराशिव नगरीचा उल्लेख प्राचीन साहित्यात आढळून येतो. हे शहर येथील तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकाची लेणी तयार होत असताना वसले असण्याची शक्यता इतिहासतज्ज्ञ देतात. ह्या लेण्याच्या करकंड राजाने इ. स. पूर्व काळात खोदल्या आहेत. करकंड हा अंग देशातील चंपानगरीचा राजा होता. त्याने दक्षिणेतील चोल, चेर व पांड्य राज्ये हस्तगत करण्यासाठी मोहीम काढली होती. दक्षिणेकडे जात असताना त्याचे आगमन तेरापूर (आजचे तेर) येथे झाले. त्यावेळी येथे 'शिव' नावाचा राजा राज्य करीत होता. त्या राजाने करकंड राजास तेरच्या पश्चिमेस असलेल्या लेण्याविषयी माहिती दिली. त्यावेळी येथे केवळ दुसऱ्या क्रमांकाची लेणी तयार होती. या लेणीतील भगवान श्री १००८ पार्श्वनाथ तीर्थंकरांची ६-७ फूट उंच पद्मासनस्थ प्रतिमा प्रेक्षणीय, मनोज्ञ व अत्यंत प्राचीन आहे. या स्वरूपाची आकर्षक नि सुबक मूर्ती इतरत्र क्वचितच निदर्शनास येते. नील व महानील नावाच्या दोन विद्याधरांनी या लेणीची रचना करून जिनबिंब स्थापन केल्याचा उल्लेख मुनी कनकामर-रचित 'करकंडुचरिउ' ग्रंथामध्ये सापडतो.

ही लेणी पाहून करकंड राजास खूप आनंद झाला म्हणून त्याने आणखी काही लेण्या खोदण्याचे ठरविले. त्यासाठी येथे बराच काळ वास्तव्य करण्याचा त्याने निर्णय घेतला. राजा करकंड जेथे वास्तव्य करू लागला तेथेच धाराशिव नगराची स्थापना झाली. म्हणजेच इ.स.पूर्व काळातच धाराशिव नगर वसले असण्याची शक्यता आहे.

त्या सुमारास तेर हे एक महत्त्वाचे केंद्र व राजधानीचे ठिकाण होते. प्राचीन काळात दक्षिण भारतात काही अत्यंत महत्त्वाच्या नगरांमध्ये तेरचा समावेश केला जात होता. तेरचा इतिहास बराच विविधतेने भरलेला आहे. येथे अंतिम तीर्थंकर भगवान महावीर प्रभूंचे समवसरण अवतरले होते. येथे आजसुद्धा जैन मंदिरात भगवान महावीरांची सात हात उंच पद्मानस्थ मनोहर प्रतिमा दर्शनीय आहे. इ.स.६० मध्ये एका रोमन व्यापाऱ्याने लिहिलेल्या ग्रंथात तेरचा उल्लेख दृष्टिपथात येतो. यावरून त्याची प्राचीनता लक्षात येते. येथे कापडाचा व्यापार प्रचंड प्रमाणात चालत असे. तेर राजधानीचे ठिकाण असल्यामुळे धाराशिवचे महत्त्व वाढू लागले. तेरपासून धाराशिव अवघ्या १०-१२ कि.मी. अंतरावर आहे. करकंड राजाला दुसऱ्या क्रमांकाच्या लेणीमध्ये एक जिवंत पाण्याचा झरा आढळून आला व त्याची धार कधीच थांबत नाही हे समजले. तसेच लेणी खोदकामास तेरच्या 'शिव' राजाने खूप सहकार्य केले म्हणूनच नवीन वसलेल्या गावास करकंड राजाने 'धाराशिव' असे नाव दिले असावे.

मध्ययुगीन काळात धाराशिव नगरीचे महत्त्व वाढले. मुसलमान राजवटीत धाराशिव नगरीच्या परिसरात अनेक घडामोडी झाल्या. अठराव्या शतकात ह्या प्रदेशावर निजामाचे वर्चस्व होते. सन १९०५ साली निजामानी 'धाराशिव' नावाने प्रसिद्ध असलेल्या या शहराचे नाव बदलून 'उस्मानाबाद' असे ठेवले.

**धाराशिवचे गांधी घराणे –**

या ऐतिहासिक धाराशिव (उस्मानाबाद) नगरीमध्ये १८-१९ व्या शतकात प्रसिद्ध 'गांधी' घराणे त्याकाळी सामाजिक, राजकीय व धार्मिक



कार्यात अत्यंत अग्रेसर होते. येथील तीन मजली टोलेजंग वाडा 'गांधींचा वाडा' या नावाने ओळखला जायचा. या प्रसिद्ध गांधी घराण्यात कितीतरी कर्तृत्ववान नररत्ने जन्माला आली. वालचंद गांधींची चार अपत्ये-नानचंद, नेमचंद, रामचंद व माणिकचंद. सगळेच नावानुसार आकाशांतील चकाकणाऱ्या चंद्राप्रमाणे तेजस्वी होते. जणू काही हे उस्मानाबादचे अनधिकृत राजेच होते. एखाद्या संस्थानिकाप्रमाणे उस्मानाबाद व आजूबाजूच्या परिसरातील जनमानसावर त्यांनी राज्य केले. सावकारी करीत असल्यामुळे सर्वजण त्यांना सावकारच म्हणत असत. मोठे नानचंद अत्यंत लहान वयात नामांकित वकील झाले. श्री. नेमचंद प्रसिद्ध व निष्णात कायदेपंडित तर होतेच, शिवाय जैन तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक व विद्वज्जनप्रिय होते. त्या वाड्यात त्या काळच्या प्रसिद्ध विद्वानांची रेलचेल असायची. बुध महाचंद कवी, ब्र. शीतलप्रसादजी, पंडित वंशीधरजी, जिनदास फडकुले शास्त्री, वर्धमान शास्त्री यांचे ते माहेरघर होते. विद्वान लोकांचा आदर सत्कार करणे नेमचंदजीच जाणोत. अभ्यागत विद्वानांशी धार्मिक चर्चा करण्यात त्यांना अत्यंत रस होता. विनोदी स्वभाव असल्यामुळे विद्वानांनाही त्यांच्याशी चर्चा करण्याचा कंटाळा येत नसे. चेष्टा मस्करी करण्यात पटाईत असल्यामुळे त्यांना सर्वजण 'मस्करीबाबा' म्हणत.

**अक्कलकोटचे मेहता घराणे –**

नेमचंदांचे एकूण तीन विवाह झाले. त्यापैकी पहिल्या पत्नीपासून दोन कन्यारत्ने जन्माला आली. प्रथम राजूबाई व दूसरी माणिकबाई. दोघीही स्वभावाने स्वाभिमानी, तेजस्वी, ओजस्वी, स्पष्टवादी, कडक शिस्तीच्या होत्या. त्यांच्या बाणेदार वक्तृत्वापुढे वडील व चुलतेही नम्रीभूत होत असत.कारण त्यात असत्य व अन्यायासंबंधी चीड असायची, सत्य व न्यायाचा पक्ष असायचा, त्यामुळे त्यांना काही एक बोलता येत नसे. निमूटपणे ऐकून घेण्याशिवाय दुसरा पर्याय नसे. माणिकबाई बालविधवा आपल्या पितृगृहीच वास्तव्य करून होत्या. राजूबाई नावाप्रमाणेच राजा माणूस. अक्कलकोट निवासी ध.श्री. फूलचंद सखाराम मेहता यांच्याशी

राजूबाईंचा विवाहसंबंध झाला. ध.श्री. फूलचंद मेहता स्वभावाने अत्यंत शांत, प्रेमळ, धर्मनिष्ठ देवमाणूस होते. जणू कडक लक्ष्मी व शांत नारायणाचाच हा संगम होता. राजूबाई दिसायला साधारण होत्या. पण फूलचंद गोरवर्णी, उंचेपोरे, लांबलचक नाक, व भव्य ललाट संपन्न होते. पांढरे शुभ्र धोतर, पांढरा शुभ्र नेहरू शर्ट व डोक्याला पटका, या वेषातून त्यांची सात्त्विकता दृष्टिगोचर होत असे. सात्त्विकतेपुढे सारी जनता नतमस्तक होती. शेठजी भाजी मंडईत भाजी आणायला गेले की त्यांच्या पिशवीत सर्वात उत्तम भाजी पडत असे. शेठजी भाजी न्यायला येतील म्हणून भाजीवाल्यांनी अगोदरच उत्तमोत्तम भाजी शेठजींसाठी वेचून ठेवलेली असे. भाजीवाले जो दर सांगतील तो बिनतक्रार देण्याचा शेठजींचा स्वभाव. गरीब बिचाऱ्या लोकांना त्यातून दोन पैसे मिळतात, त्यातसुद्धा घासाघासी करणे त्यांना अजिबात पसंत नव्हते. जेवणाची वेळ झाली की प्रथम मंदिरामध्ये जाऊन कोणी त्यागी, व्रती, ब्रह्मचारी अतिथी आले आहेत का ते पाहूनच स्वत: जेवण करीत असत. कोणी अतिथी आले असतील त्यांची व्यवस्था करून नंतरच स्वत: अन्न ग्रहण करीत होते. श्रावकांची व्रते व्रतरूपाने न अंगीकार करतानाही श्रावकाच्या सर्व क्रियांचे पालन करणे त्यांच्या अंगी बाणले होते. प्रात:काळी उठून प्रातर्विधी आटोपून गृहचैत्यालयातील श्री. जिनेंद्र भगवंतांचा अभिषेक पूजन करून त्यानंतर गावातील मंदिरात जाऊन जिनेंद्र भगवंतांची पूजा करणे हे त्यांच्या दिनचर्येचे एक अंग बनले होते. अशा या श्रावकोत्तम फूलचंदजींच्या सान्निध्यात जीवन व्यतीत करण्याचे सौभाग्य राजूबाईंना लाभले होते.

गोरगरिबांना मदत करणे, महिलांच्या समस्या सोडवणे, गरजू लोकांची गरज भागवणे इत्यादी सामाजिक कार्यात राजूबाई अग्रेसर होत्या. त्यांच्या उदार व दिलदार स्वभावामुळे त्यांना लोक गावचा राजा म्हणायचे. वडिलांकडून वारसा हक्काने लाभलेली, एखाद्या पंडितालाही लाजवेल अशी विद्वत्ता त्यांच्याठायी होती.



**सोलापूरचे दोशी घराणे –**

सोलापूरचे रावजी सखाराम दोशी (श्री. अरविंद दोशींचे पिताजी) हे फूलचंदजींचे सख्खे मावसभाऊ. सोलापूरला भला मोठा त्यांचा दगडी वाडा. वाड्यामध्ये सर्व दोशी कुटुंब गोण्यागोविंदाने राहत असे. सखाराम यांचे चुलत बंधू हिराचंद त्यांची चार मुले-प्रसिद्ध उद्योगपती वालचंद, गुलाबचंद, लालचंद, रतनचंद. हे सर्व लहानपणी याच वाड्यात वाढले. राजूबाई अधून मधून सोलापूरी जात तेव्हा हे सर्व बालचमू त्यांच्याभोवती गराडा घालून आग्रह करीत, 'राजूकाकी आम्हाला एकतरी गोष्ट सांगा'. त्यांची सरस मधुर मनोहर वाणी ऐकायला सर्वजण हपापलेले असत. तेव्हा राजूबाई त्यांना आपल्या मधुर रम्य ओजस्वी वाणीने बोधप्रद कथा सांगून मंत्रमुग्ध करीत. वाड्याच्या माडीवर बसून गुपचुपपणे त्यांची कथा ऐकणारा पंडितवर्गसुद्धा आश्चर्यचकित होत असे. म्हणून त्यावेळी सोलापूरमध्ये एक म्हण प्रसिद्ध होती 'धाराशिवचे विद्वान सारे.'

**गजाबाईंचा जन्म –**

अशा या धार्मिक सत्त्वशील फूलचंदजीपासून ज्ञानतेजाने चकाकणाऱ्या राजूबाईच्या पोटी- २१ नोव्हेंबर १९१३ रोजी एक तेजस्वी कन्यारत्न जन्माला आले. त्या रत्नाचे नाव 'गजराबाई' असे ठेवण्यात आले. कन्या गोरी, नाक चाफेकळीप्रमाणे लांबसडक, भव्य ललाट इ. रूपामध्ये पित्याचे अनुकरण करणारी होती. गजराबाईपूर्वी राजूबाईच्या कुशीत एक कन्यारत्न जन्माला आले होते. त्या रत्नाचे नाव 'अवलबाई'. गजराबाईंच्या पाठीवर एका वर्षातच 'जीवराज' व तत्पश्चात् दोन वर्षांनी 'विमलचंद' या दोन पुत्ररत्नांनी फूलचंदजींचे घर भरून गेले.

**गजाबाईंचे बालपण व मातृवियोग –**

'गजराबाईचे' संक्षिप्तीकरण करून सर्वजण 'गजाबाई' म्हणून तिला संबोधू लागले. गजाबाईंचे बालपण अत्यंत लाडात गेले. जणू ही राजाची राजकुमारीच. कुंडली पाहून ज्योतिषांनी सांगितले होते की कन्येच्या भाग्यात 'राजयोग' आहे. तिच्या हातून फार मोठे दिव्य भव्य काम होणार आहे.

दिसायला सुंदर असल्यामुळे आजूबाजूच्या सर्व लोकांच्या आकर्षणाचे ती केंद्र बनली होती. रूप वडिलांचे पण गुण आईचे असे हे संमिश्र रूप होते. ती आईप्रमाणे अत्यंत बुद्धिमान, चाणाक्ष व शिस्तप्रिय होती. पाच वर्षे पूर्ण झाल्यावर अक्कलकोट येथील प्राथमिक शाळेत तिचे नाव घालण्यात आले. कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे गुरुजींनी शिकविलेले पटापट आत्मसात् होई. घरी आल्यावर शाळेचा अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय जेवायला मिळत नसे. दररोज सर्व पाढे पाठ करून म्हणून दाखविणे, दररोज सायंकाळी भगवंतांची आरती, सामायिक पाठ म्हणणे हा नित्याचा कार्यक्रम असे. मुलामुलींना खूप शिकवावे, शहाणे करावे ही आईची जिद्द; परंतु नियतीला ते मान्य नव्हते. गजराबाई चवथ्या वर्गात शिकत असतानाच आईला क्षयरोगाने ग्रासले. त्याकाळी क्षयरोगावर औषध नव्हते. हा रोग असाध्यच होता. पुष्कळ उपचार करूनही काही उपयोग झाला नाही. अखेर सन १९२२ मध्ये रोग तिला घेऊनच गेला. मृत्यूलाही न भीता ती माता निर्भयपणे मृत्यूला सामोरे गेली. चार छोटी छोटी बालके सोडून जातानाही तिचे मन डगमगले नाही. मोहजाळ्यात न अडकता णमोकार मंत्राच्या स्मरणात तिने देह त्यागून समाधिमरण साधले. शेवटी जाताना माझ्या मुलांना सांभाळा वगैरे एक ब्र शब्दही तिने तोंडातून काढला नाही. उलट आपल्या विधवा बहिणीला जाताना सांगून गेली 'तू या मुलांच्या मोहजाळ्यात फसू नकोस. यांच्याविषयीचा मोह आपल्याला दुर्गतीत घेऊन जाणारा आहे,' किती निर्मोही वृत्ती, कारण तिने जैनसिद्धान्त कोळून प्याला होता. 'प्रत्येक जीव स्वतंत्र आहे. तो आपापले पुण्यपाप बरोबर घेऊन येतो. आपण त्याचे कर्ते-धर्ते नाही.' हा सिद्धान्त ती प्रत्यक्षपणे जगत होती. मुलांना जन्म दिला आहे म्हणून त्यांचे लालन-पालन करणे, त्यांना शिक्षण देणे हे आपले एक व्यावहारिक कर्तव्य आहे. त्यामध्ये कसूर करू नये; परंतु त्यांच्या मोहात न गुरफटता अलिप्त राहून सर्व करावे, अशी तिची धारणा. हा सर्व संयोग पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे क्षणिक आहे, वीजेप्रमाणे चंचल आहे याची सतत जाणीव ठेवून प्रसंग आल्यावर धैर्य धरणेच शहाणपणाचे आहे. आई



स्वर्गवासी झाल्यावर ही चारही मुले आई विना पोरकी झाली. 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' हे साने गुरूजींचे वाक्य एकदम सत्य आहे.

मोठी अवलबाई लग्न होऊन सासरी गेली होती. त्यामुळे तिच्या संगोपनाचा प्रश्न नव्हता. गजाबाई ९ वर्षांच्या, जीवराज ८ वर्षांचा व विमलचंद ६ वर्षांचा. या तीन बालकांच्या संगोपनाची जबाबदारी मावशीने स्वीकारली. आईपेक्षाही जास्त काळजीपूर्वक तिने मुलांचे पालन पोषण केले; परंतु मुलांच्या शिक्षणासाठी अहोरात्र झटणारी माता निघून गेल्यामुळे मुलांचे शिक्षण अपुरेच राहिले. कारण त्यावेळी उस्मानाबादमध्ये मोगलाईचे राज्य होते. तेथे मराठी शिक्षणाची सोय नव्हती.

श्री. फूलचंदजींना दुसरा विवाह करण्याची इच्छा नव्हती. संयोगाची क्षणभंगुरता व संसाराची असारता प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांचे मन भोगापासून विरक्त झाले होते. परंतु अजून वय लहान आहे, मुलेही लहान आहेत, म्हणून आप्तेष्टांच्या आग्रहास्तव ते दुसऱ्या विवाहबंधनामध्ये बद्ध झाले. तिचेही नाव राजूबाईच ठेवले. विवाह झाल्यानंतर जीवराज व विमलचंदांना अक्कलकोटला आणले. दुसऱ्या पत्नीपासून दोन कन्या झाल्या. प्रथम इंदूमती व दुसरी शांताबाई. त्या माऊलीने पोटच्या पोरीपेक्षाही सवतीच्या मुलांचा सांभाळ अधिक काळजीपूर्वक केला. त्यांना मातेची ममता दिली. विमलचंद प्रकृतीने नाजूक, आईच्या क्षयरोगाचा प्रसाद थोडा बहुत प्राप्त झालेला. आपल्यामुळे कोणत्याही मुलीचे वाटोळे होऊ नये म्हणून ते आजन्म ब्रह्मचारीच राहिले. त्यांची अखेरपर्यंत सेवाशुश्रूषा त्या दुसऱ्या मातेने केली. जीवराजचा विवाह झाला. त्यांना तीन मुले व एक मुलगी झाली. त्यांची पत्नीही छोट्या बालकांना सोडून लवकरच देवाघरी गेली. म्हणून जीवराजच्या संपूर्ण परिवाराचेही पालणपोषण दुसऱ्या राजूबाईंनीच केले.

**गजाबाईचे आजोळी प्रस्थान -**

गजाबाई मात्र अक्कलकोटला न राहता उस्मानाबादलाच आजा व मावशीच्या छत्रछायेत वाढल्या. माणिकबाई बालविधवा, त्यांना मूलबाळ नव्हतेच. 'गजाबाई' हेच तिच्या मोहाचे व मायेचे स्थान बनले. तिने तिला

तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. तिच्या केसालाही धक्का लागला तरी तिला सहन होत नसे. तिला ती प्राणापेक्षाही अधिक जपत असे. आईच्या क्षयरोगाचा थोडा प्रसाद गजाबाईलाही प्राप्त झाला होता. सकाळी स्नान केले की तिला एकसारखा खोकला व ताप येत असे. त्यामुळे मावशी तिची खूप काळजी घेत होती. आंघोळ उशीरा घालून तत्काळ तिचे अंग पुसून बाहेरचे वारे लागू न देता शेकोटी पेटवून शेकणे, गरम कपडे घालणे, वेळोवेळी औषधे पाजणे या सर्व गोष्टी ती तन्मयतेने करीत असे. अत्यंत काळजीने त्या डॉक्टरांना सल्ला विचारायला गेल्यावर डॉक्टर म्हणायचे, 'अहो, माणिकबाई, तुम्ही विनाकारण फार काळजी करू नका. ही पोरगी वयाच्या पंधरा वर्षापेक्षा अधिक जगू शकणार नाही. तुम्ही आपल्या मनाची तशी तयारी करा.' एवढे ऐकूनही त्या बाईने चिकाटी न सोडता सेवा शुश्रूषा करून पोरीला निरोगी बनविले. हे तिचे अनंत उपकारच म्हणावे लागतील.

त्यावेळी उस्मानाबाद हे निजामाच्या आधिपत्याखाली होते. तेथील मुसलमान दलितांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्यावर अत्याचार करीत होते. दिवसा ढवळ्यासुद्धा स्त्रियांना घराबाहेर पडण्याची भीती होती. त्यामुळे मुलींना शाळेत जाऊन शिक्षण घेता येत नसे. शिवाय सर्व शाळा मुसलमानांच्या. तेथे उर्दूमध्येच शिक्षण मिळत असे. त्यामुळे गजाबाईला शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ४ थी पर्यंतच शिक्षण घेऊन समाधान मानावे लागले. निजामी राज्य नष्ट केल्याशिवाय नागरिक हक्क उपभोगता येणार नाहीत म्हणून नेमचंद बाबांनी (भूनचे आजोबा) सरकारशी संघर्ष करण्याला प्रारंभ केला. सर्व समाजाने मिळून मंदिर बांधावे असे ठरले असता सरकारी विरोध पाहून त्यातून इतरांनी अंग काढून घेतले; परंतु जैन मंदिर बांधून त्याची प्रतिष्ठा करायचीच या ईर्षेला नेमचंद बाबा व त्यांचे दोन्ही बंधू पडले. सन १९२३ ला अनेक तंटे बखेडे होऊन मंदिर बांधण्याची परवानगी मिळाली. सन १९२८ मध्ये मिलिट्रीच्या पहाऱ्यात प्रतिष्ठा पार पडली. या प्रतिष्ठेतही मुसलमानांनी पोलिसांच्या साहाय्याने दंगल करण्याचा प्रयत्न केला. बाबांना लाठीचा प्रसादही खावा लागला; परंतु त्यांना संकल्पपूर्तीचा



आनंद उपभोगायला मिळाला. निजामशाहीमुळे गजाबाईच्या मनात मुसलमानाबद्दल चीड व हिंदूबद्दल स्वाभिमान स्वभावतःच अंगी बाणला होता. एकदा एका मुसलमान बाईच्या तोंडून गजाबाईने एक वाक्य ऐकले की 'आम्ही काय हिंदू आहोत काय, गोंदून घ्यायला'? गजाबाईच्या मनातील स्वाभिमान जागृत झाला. त्या घरी गेल्या. सुई घेतली व तिला शाईमध्ये बुडवून स्वतःच कपाळावर गोंदून घेतले. कोणी विचारले असे का केले? तर त्या म्हणाल्या. 'आम्ही हिंदू आहोत, गोंदून न घ्यायला आम्ही काय मुसलमान आहोत?

नेमचंदांचा वाडा म्हणजे विद्वानांचे माहेरघर, सरस्वतीपुत्र सरस्वती भक्ताला भेटायला वारंवार येत असत व त्यांच्याशी धर्मचर्चा करीत असत. गजाबाईच्या मनावर अनपेक्षितपणे सहजच धर्माचे संस्कार होत होते. बाबांजवळ बसून धर्मचर्चा ऐकण्यामध्ये ती गढून जात असे. सप्तम प्रतिमाधारी ब्रह्मचारी शीतलप्रसादजी त्यांच्याकडे अनेकदा येत व २-४ महिने राहून एखादा ग्रंथ शिकवित असत. माणिकमावशी त्यांच्या परम भक्त. त्या मन लावून त्यांची व्यवस्था व सेवा करीत. २० जुलै १९२९ साली नेमचंद बाबांनी शीतलप्रसादजींच्याजवळ कर्मकांड ग्रंथ शिकण्यास शुभारंभ केला. त्यावेळी गजाबाई १६ वर्षांच्या होत्या. बाबांच्याबरोबर त्याही ऐकायला बसत. शीतलप्रसादजी हिंदीतून शिकवीत व नेमचंद बाबा त्याचे मराठीमध्ये अनुवाद करून लिहून काढीत. गजाबाईची बुद्धी अत्यंत तल्लख. त्यात तरूण रक्त, ताजीतवाणी स्मृती. त्यामुळे त्या पटापट उत्तरे देत व कर्म प्रकृत्यांची नावे तोंडपाठ सांगत. ते ऐकून शीतलप्रसादजी आश्चर्यचकित होऊन गजाबाईला विनोदाने म्हणत 'गज्जी, तू मेरे साथ चल, मै तुझे पढाकर अच्छी विदुषी बनाऊंगा।' गजाबाई त्यांना अडमूठपणे उत्तर देत 'आप पुनर्विवाह के मतके हो, मै आपके साथ नही आऊंगी! पुढे जाऊन या गोष्टीचा तिला पश्चात्ताप झाला.

कर्मकांड ग्रंथ बराच मोठा असल्यामुळे तो एका वास्तव्यात पूर्ण होण्यासारखा नव्हता. म्हणून अधून मधून जेव्हा शीतलप्रसादजी येत तेव्हा तो

ग्रंथ शिकवीत असत. २२ फेब्रुवारी १९३७ ला हा ग्रंथ वाचून पूर्ण झाला. ग्रंथ शिकण्यास एकून ७।। वर्षे लागली. नेमचंद बाबांनी संपूर्ण ग्रं सारांशरूपाने मराठीत लिहून काढला. तो १९३९ ला प्रकाशितही झाला वाचकांस व विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन सौकर्याने व्हावे म्हणून अने कोष्टके तयार केली. या सर्व कार्यामध्ये गजाबाईने बाबांना बरीच मदत केली

रामचंदबाबांचे चिरंजीव फूलचंद, माणिकचंद बाबांचे चिरंजी कुमुदचंद व विमलचंद तसेच कन्या फुलूबाई, नानचंद बाबांचे ना विनयकुमार व नात कस्तूरीबाई या सर्व बालचमूंनी गांधींचा वाड गजबजलेला होता. सर्वजण जवळ जवळ गजाबाईचे समवयस्क सवंगडी त्यामुळे नेहमी वाड्यामध्ये चेष्टा मस्करी विनोद चालायचे. आईविना पोरकं झालेली सर्व लेकरे बाबांच्या व माणिकमावशींच्या स्नेहछत्राखाली गुण्य गोविंदाने राहत असत. लेण्यांकडे फिरायला जाणे व लेण्यांचे दर्शन करणे ह सर्वांचा आवडता कार्यक्रम असे. सर्वांबरोबर खेळत बागडत कधी ८-१ वर्षे निघून गेली हे कोणाला कळालेसुद्धा नाही.

**गजाबाईचा विवाह–**

गजाबाई १६-१७ वर्षाच्या झाल्या तशी बाबांची चिंता सुरू झाली मुलगी मोठी झाली की ती कुणाला द्यायची ही मातापित्यांना मोठी चिंत असते. म्हटलचे आहे की,

> **जातेति कन्या महती हि चिन्ता**
> **कस्मै प्रदेयेति महान्वितर्क:।**
> **दत्ता सुखं यास्यति वा न वेति**
> **कन्यापितृत्वं खलु नाम कष्टम्।।**

कन्या हे परकीयांचे धन आहे. ती दुसऱ्याची लक्ष्मी आहे. तिल तिच्या पतिगृही पाठविले की आपण रिकामे झालो, अशी भारतीयांचं मान्यता होती. बाबांना वाटले हिला योग्य ठिकाणी देऊन आपले कर्तव्य पू करावे. आई नसल्यामुळे आपल्यावरच ही जबाबदारी आहे याची त्यांन जाणीव होती. जेव्हा विवाहाची चर्चा सुरू झाली तेव्हा गजाबाईनी विवाहाल



साफ नकार दिला. स्वाभिमानाने जगलेली पोर कुणाच्या अधीन राहायला तयार नव्हती. धार्मिक सुसंस्कार व तत्त्वज्ञानाचे अमृत प्याल्यामुळे आता विषयरूपी विष चाखण्याची इच्छा नव्हती. ब्रह्मचारी राहून आपले आत्मकल्याण करून घ्यावे, एवढीच तिची मनीषा होती; परंतु त्याकाळी कुमारी मुलीला घरात ठेवण्याचे धाडस कोणी करीत नसत. शिवाय समाजात आपली बदनामी होईल, अशी बाबांची समजूत. अशावेळी गजाबाईला आईची आठवण यायची व वाटायचे 'आई असती तर आपली इच्छा फलद्रूप झाली असती.' अखेर नेमचंद बाबांनी स्थळे शोधण्यास प्रारंभ केला. प्रकृती अत्यंत नाजूक, लाडात वाढलेली, घरात सर्व कामे करण्यासाठी नोकर-चाकर असल्यामुळे अधिक कामाची सवय नाही म्हणून मावशीची अट असायची की, घरात कमी माणसे असावीत, घरी श्रीमंती असावी. मुलगा मुलीला शोभेल असा देखणा असावा. गजाबाईला शेठ लालचंद हिराचंद सारखी मोठी स्थळे येऊन गेली त्यांना मुलगी तर पसंत पडे; परंतु मुलगी नाजूक, लाडात वाढलेली तिला कोण जपणार? त्यामुळे कोणी धाडस करत नसे. त्याकाळी १८ वर्षाची मुलगी अजून अविवाहित म्हटले की गावात सर्वत्र चर्चा होई. गजाबाई तर आपण कोणाला पसंत पडू नये म्हणून विचित्र अवतार करून बसणार. शेवटी बाबा कंटाळून गेले होते. एक दिवस बाबा मुरुमला गेले व कोणालाही न विचारता स्थळ पसंत करून आले. एकुलता एक मुलगा, गोरापान, उंच देखणा, २५० एकर काळ्या मातीची सुपीक जमीन, शेतात पाण्याचा धो-धो वाहणारा पाट, मुलगा बुद्धिमान, कोठेच काही कमी नाही. नाव होते वालचंद नानचंद शहा वाड्याच्या दारात मंडप घालून थाटामाटात लग्न लावून दिले.

गजाबाई नाखुषीनेच विवाह वेदीवर चढल्या. अग्नीच्या साक्षीने सात फेऱ्या मारल्या; परंतु एकमेकांना स्पर्श न करताच. विवाह समारंभाप्रसंगी गजाबाईच्या चाणाक्ष बुद्धीने वराची योग्यता हेरली होती. तेव्हा एका क्षणातच तिने निर्णय घेऊन टाकला. वैवाहिक क्रिया समाप्त होताच गजाबाईच्या अंगी असणारे क्षात्रतेज, ब्रह्मतेज प्रकट झाले. ज्याठिकाणी

अक्षता पडल्या त्याच विवाह मंडपात तिने संसाराला क्षत करून अक्षत आत्म्याला वरले. तिच्यात कडकलक्ष्मी अवतरली. तिने बाबांना कणखर आवाजात म्हटले, 'तुमच्या मनासारखे तुम्ही सर्व केले आहे. आता तुमची जबाबदारी संपली आहे. आता मी' 'तुमच्या अधीन नाही तुमचा माझ्यावर हक्क नाही. कारण तुम्ही परकीयांचे धन परकीयांना देऊन टाकले आहे. आता मी स्वतन्त्र आहे. आता मला जे पाहिजे ते मी करणार. तुम्ही अडवू शकत नाही'. असे म्हणून मंगळसूत्रासकट अंगावरचे सर्व दागिने उतरविले व हातात दागिने घेऊन म्हणाल्या, 'कोणाला पाहिजे सौभाग्य, हे घेऊन टाका.' अंगावरचा सर्व साजशृंगार उतरवत जणू ती वैरागीणीच बनली. त्या स्त्रीत्वाच्या तेजापुढे कोणाच्याही तोंडातून चकार शब्द निघाला नाही. सर्वजण गुपचूप. बाबांनाही आपली चूक कळाली होती. त्यामुळे ते खाली मान घालून निमूटपणे बसले होते. सुदैवाने जो वर मिळाला होता तो इच्छानुकूलच निर्विकार होता. त्या बिचाऱ्याने एक ब्र शब्दही तोंडातून काढला नाही. काही तरी करून दोघांमध्ये विकार उत्पन्न करून जुळते का पहावे म्हणून उभयतांना काही दिवस उस्मानाबादच्या वाड्यातच ठेवले; परंतु सर्वांचे प्रयत्न निष्फळ ठरले. विकारांवर निर्विकारतेनेच विजय मिळविला. दोघेही ब्रह्मचारीच राहिले. शेवटी वालचंदांना त्यांच्या घरी पाठवण्यात आले. गजाबाई उस्मानाबादलाच राहिल्या.

**संस्कृत शिक्षण –**

आता पुढे काय करावे हा गजाबाईच्या पुढे मोठा प्रश्न होता. गांधी घराणे सुधारक, दसाहुम्मड गुजराती. त्यामुळे त्यागाचा कोठे पत्ताच नव्हता. सर्वजण भोगविलासामध्ये मग्न होते. या संसाराच्या चिखलात रूतून न बसता आपले आत्मकल्याण करून मनुष्यभव सफल करण्याची तिची मनस्वी भावना होती. स्त्रीच्या शीलाचे संरक्षण हा महत्त्वाचा भाग, तो या भोगी लोकांच्या सहवासात होणे कठीण म्हणून कोठेतरी श्राविकाश्रमात किंवा त्यागींच्या सान्निध्यात आपले जीवन व्यतीत करण्याची इच्छा गजाबाईने प्रकट केली; परंतु बाबांना व मावशीला हे मान्य नव्हते. आपले मोठे घराणे,



समाजातील लोक काय म्हणतील? जे करायचे आहे ते घरी राहूनच करावे, असे त्यांचे म्हणणे होते. थोडे वातावरण निवळल्यानंतर १९३३ साली गजाबाईला शिकविण्यासाठी एका संस्कृत शिक्षकाची नियुक्ती केली. तो बिचारा नवशिका शिक्षक, मोठ्यांच्या घरी जायचे म्हणजे संकोच, त्यात गजाबेन बुद्धिमान. आपल्याला शिकविणे जमेल की नाही म्हणून काकू करीतच त्याने जबाबदारी स्वीकारली. शिकविणे चालू केले. त्या शिक्षकास 'कसे शिकवावे' हे गजाबाईनीच शिकविले. शिक्षकाने विद्यार्थिनीला अभ्यास द्यायचे सोडून विद्यार्थिनीच शिक्षकाला अभ्यास देऊ लागली. 'गुरुजी, उद्या पुढच्या धड्याची वाक्ये पाहून या.' ती स्वत:ही तो धडा तयार करून शिक्षकांपुढे शिकायला बसत असे. अशा पद्धतीने १-१।। वर्षात भांडारकर संस्कृत प्रथम पुस्तक व द्वितीय पुस्तक शिकून पूर्ण केले. त्यावेळच्या संस्कृत अध्ययनाच्या भूनच्या वह्या आजही साक्षीरूपाने आमच्याकडे विद्यमान आहेत. संस्कृत समजू लागल्यामुळे तिला शास्त्र वाचण्यामध्ये गोडी वाटू लागली. शीतलप्रसादजी उस्मानाबादला जेव्हा जेव्हा येत तेव्हा तिने त्यांच्याकडून इष्टोपदेश, समाधिशतक इत्यादी ग्रंथ शिकून घेतले. शीतलप्रसादजी शास्त्र पूर्ण झाल्यावर गुरुदक्षिणा म्हणून तो ग्रंथ एक वर्षभर वाचण्याचा नियम देत. त्यामुळे आजतागायत ते ग्रंथ त्यांना पाठ आहेत.

**क्षु. समंतभद्र महाराजांची भेट–**

पुढील धार्मिक शिक्षण घेण्यासाठी व आपले जीवन पवित्र धर्ममय व्यतीत करण्यासाठी घरातून बाहेर पडण्याचा गजाबाईने अतोनात प्रयत्न केले. बरेच सत्याग्रह केले. ८-८ दिवस अन्न सोडून केवळ जांभळे खाऊन राहिल्या, कित्येक वस्तूंचा त्यागही केला; परंतु काही उपयोग झाला नाही. तिच्या सत्याग्रहामुळे घरातील लोक चिन्तित झाले होते. दरम्यानच्या काळात ब्र. देवचंद (समंतभद्र महाराज) वरचेवर नेमचंद बाबांच्या भेटीसाठी व त्यांचा सल्ला घेण्यासाठी उस्मानाबादला येत असत. ३ वर्षांपूर्वीच अर्थात १९३३ साली त्यांनी ब्यावर येथे आचार्य शांतिसागर महाराजांच्याकडून

क्षुल्लकपदाची दीक्षा घेतली होती. ते व कारंजानिवासी धर्मबंधू प्रद्युम्नसावजी डोणगावकर १९३६ साली गुरुकुलाच्या कामानिमित्त उस्मानाबादला आले होते. सात्त्विकवृत्तीच्या व्यक्तीच्या इच्छा फलद्रूप होतात असे म्हणतात, ते काही खोटे नाही. क्षु. समंतभद्र महाराजांचे आगमन गजाबाईला शुभशकुनच वाटला. तिला आपल्या इच्छापूर्तीची आशा वाटू लागली. आपली धार्मिक शिक्षणाची जिज्ञासा तिने महाराजांसमोर व्यक्त केली. पू. महाराज व प्रद्युम्नसावजींनी कारंजाला येऊन धर्मशिक्षण घेण्याचा सल्ला दिला; परंतु महाराजांना अंतरंगामध्ये थोडी शंका वाटत होती की, लाडात वाढलेली, घरात नोकर-चाकर, गुरुकुलातील स्वावलंबी जीवन गजाबाईंना झेपेल का? कारंजाला ३ वर्षापूर्वीच कंकुबाई श्राविकाश्रमाची स्थापना झाली होती. प्रारंभीच ब्र. देवचंदबरोबर ब्र. कंकुमावशींचे कारंजाला आगमन झाले होते. पुढे कारंजा हीच त्यांची साधनाभूमी व कर्मभूमी झाली. विख्यात उद्योगपती श्री. वालचंद हिराचंद यांच्या त्या सख्या भगिनी. स्त्रियांना लौकिक व धार्मिक शिक्षण प्राप्त झाल्याशिवाय सामाजिक उन्नती होऊ शकत नाही. भावी पिढी चांगली निर्माण करायची असेल तर स्त्रियांना सुशिक्षित केले पाहिजे, असा कंकुमावशींचा आग्रह होता. प्रथमत: कंकुबाईंच्या नावाने पाठशाळारूपानेच हे कार्य सुरू झाले. प्रद्युम्नसावजींच्या बाल विधवा भगिनी बजा आत्या मुंबईच्या श्राविकाश्रमात कंकुमावशींच्या मार्गदर्शनाखाली सुशिक्षित झाल्या होत्या. त्यांचा तेथे सेवायोग लाभला. पुढे याच पाठशाळेचे श्राविकाश्रमामध्ये रूपांतर झाले. त्या श्राविकाश्रमात गजाबाईंची व्यवस्था होईल या हेतूने पू. महाराजांनी कारंजाला येण्याचे आवाहन केले.

प्रथमत: बाबा, मावशी, मामा, मामी हे गजाबाईला जाण्याची परवानगी देण्यास तयार नव्हते; परंतु गजाबाईचा जिद्दी स्वभाव सर्वांना परिचित होता, जे तिच्या मनात येईल ते सिद्ध केल्याशिवाय ती राहणार नाही हे सर्वांना ठाऊक होते. म्हणून नाईलाजास्तव बाबांना परवानगी द्यावी लागली. पोटच्या गोळ्याप्रमाणे जपलेल्या गजाबाईला दूर पाठविणे सर्वांना अवघड झाले. तसेच गजाबाईलाही मावशीच्या मोहपाशातून सुटणे अत्यंत



अवघड झाले; परंतु कट्टर ध्येयवादी गजाबाईने सर्व मोहपाश तोडून आपला मार्ग प्रशस्त केला. बरोबरच आहे, 'निर्धार, चिकाटी व प्रयत्नशीलतेशिवाय यशाची पायरी चढता येत नाही. मनाने दुबळे लोकच मोहजाळ्यात अडकून आपली अवनती करून घेतात.' पू. महाराजांवर नेमचंद बाबांची अतिशय श्रद्धा होती. त्यामुळे ते थोडे निर्धास्त होते. सर्व आजोळवासीयांनी भरल्या डोळ्यांनी व जड अंत:करणाने पू. महाराज व प्रद्युम्नसावजींबरोबर गजाबाईची कारंजाला रवानगी केली.

**कारंजास आगमन –**

पूर्वी वाहनाची फारशी सोय नव्हती. अनेक गाड्या बदलून गजाबाई, महाराजांसह दोन दिवसांनी कारंजाला पोहोचल्या. एकदम आश्रमात पाठविले तर गजाबाईंना सर्व अवघड वाटेल. मोठ्या घरची पोरगी, तिची आभाळ होईल, म्हणून प्रद्युम्न सावजींनी त्यांना आपल्यासोबत घरीच नेले. दिगंबर जैन सेनगण मंदिरासमोरच सावजींचा वाडा होता. कारण सावजींचे मत होते की मनुष्य उद्योग व उपजीविकेसाठी पाहिजे तेवढे दूर जाईल; परंतु घर व दुकान सोडून देवालयात दर्शन करण्यासाठी दूर जाणे कठीण. म्हणून त्यांनी मंदिराजवळच आपले घर बांधले होते. टांग्यातून उतरताच गजाबाईंना पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. ही तरूण सुंदर कन्या येथे कशी काय? सावजींनी घरातील महिलांना गजाबाईंची ओळख करून दिली. घरातील महिलांनी वाड्याच्या बाहेरील चौकात गजाबाईंना प्रवासातील सर्व कपडे भिजवायला लावले व त्यांना डोक्यावरून न्हाऊ घातले व नंतरच आत घेतले. सुधारक घराण्यात वाढलेल्या पोरीला हे सोवळे ओवळे कसे माहीत असणार? तिला सर्व काही नवीन वाटत होते. तेथील माणसे नवीन, बोली भाषा नवीन, क्षेत्र नवीन, तेथील राहणीमान निराळे, खानपान निराळे. पण सर्व मुकाट्याने जमवून घेतले. जमवून घेणे भागच होते. कारण तिने स्वत:हूनच हा मार्ग पत्करला होता.

कारंजाला येऊन दोन महिने लोटले. प्रद्युम्न सावजींच्या घरातील महिलांनी गजाबाईंना आपुलकीची वागणूक दिली. पर प्रांतातून, पर

समाजातून आलेल्या पोरीला पोरकेपणा जाणवू नये याची सर्वांनी खबरदारी घेतली. सावजींनी तर वडिलांची माया दिली व गुरु बनून धार्मिक शिक्षणही दिले. दुसऱ्यांच्या घरी स्त्रीने किती दिवस राहायचे? हे स्वाभिमानी गजाबाईला योग्य वाटेना. ही गोष्ट महाराजांच्या कानावर घालून तिने श्राविकाश्रमामध्ये राहण्याची तयारी दर्शविली. पू. महाराज गावाबाहेरच्या मुलांच्या आश्रमात रहात असत. श्राविकाश्रमामध्ये गजाबाईंची व्यवस्था करण्यात आली. राजघराण्यात अत्यंत लाढात वाढल्यामुळे कधी एक तांब्या उचलायचीही सवय नव्हती; परंतु येथे सर्व काही करण्याची मनाची तयारी दाखविली. त्यावेळी गोविंदसावजी यांची कन्या व प्रद्युम्नसावजींची पुतणी बालविधवा श्री. मंजुळाताई रूईवाले यांनी श्राविकाश्रमाच्या संचालनाचे कार्य हाती घेतले होते. पुत्ररत्न गर्भामध्ये असतानाच तिचे पतिराज दिवंगत झाले होते. प. पू. समंतभद्र महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून तिने आपले जीवन सेवेसाठी सर्वस्वी समर्पण केले. आपत्तीला आपल्या उन्नतीची पायरी बनवून स्वपरकल्याण साधले. पुत्र गजकुमार आजोबांच्या छत्रछायेत वाढत होता. कोणताही मोबदला न घेता हे सेवाव्रत ५०-५५ वर्षापर्यंत अव्याहतपणे मंजुळाताईंनी पाळले. गजाबाईंच्या आगमनाने त्यांना एक मोठी बहीण मिळाल्याचा आनंद झाला. आपले सर्व दुःख विसरून गजाबाई या नवीन भगिनीशी समरस झाल्या. मंजुळाताई मोठ्या बहिणीचा मान देऊन त्यांना 'गजाबेन' म्हणून संबोधू लागल्या. कारंजात आल्यावर सर्वच जण त्यांना 'गजाबेनच' म्हणू लागले. सर्वांची भगिनी बनण्याचे सौभाग्य त्यांना प्राप्त झाले आणि गजाबाईंच्या गजाबेन झाल्या. सूर्याच्या उदयाने कमल फुलावे त्याप्रमाणे गजाबेनच्या संगतीने मंजुळाताईंचे हृदयकमल खुलले. त्यांना सुखदुःखाची साथीदारीण, निःस्वार्थ सल्लागार, धर्मामृत पाजणारा गुरु मिळाला. त्या दोघींचे भगिनीप्रेम आम्ही डोळ्यांनी पाहिले आहे. मंजुळाताईलाच मंजाताईही म्हणतात.

मंजाताई अत्यंत शांत व गजाबेन अत्यंत कडक तरीही दोघींचे जमले. कारण गजाबेन जसे म्हणतील तसे 'मोठ्या बहिणीचा आदेश' मानून



आज्ञाकारिणी बहीण बनून त्या राहात होत्या. उलट बोलणे तर त्यांना माहीतच नव्हते.

उस्मानाबादलाच गजाबेनचे संस्कृत शिक्षण व थोडे धार्मिक शिक्षण झाले होते. त्याचा फायदा करून घेण्यासाठी श्राविकाश्रमातील मुलींना संस्कृत व धार्मिक तास घेण्याची जबाबदारी गजाबेनवर सोपविली गेली. त्यांच्या अध्यापन कौशल्यावर मुली अत्यंत खुश होत्या. शिकविलेला पाठ मुलींना अगदी कंठस्थ व हृदयस्थ होऊन जात असे. श्राविकाश्रमातील मुली त्यांचे नाव न घेता त्यांना 'भून' म्हणू लागल्या. गुजराती लोक मोठ्या बहिणीला 'भून' म्हणतात. त्यावेळी त्यांच्याकडून शिकलेल्या मुली आजही सांगतात की त्यावेळी भूननी शिकविलेले ग्रंथ अद्यापही आमच्या स्मरणात आहेत. विद्युल्लता, (सोलापूरच्या श्राविकाश्रमाच्या संचालिका) विशल्या गंगवाल, जयमाला, मंजाताई, अरूणावहिनी (धन्यकुमार भोरेंच्या पत्नी) इ. त्यावेळच्या त्यांच्या प्रथम विद्यार्थिनी. पहाटे ५ वा. इष्टोपदेश, समाधिशतक इत्यादी ग्रंथांचे शुद्ध उच्चारणामध्ये त्यावेळी पठन होत असे.

**कंकुबाई श्राविकाश्रमात सेवायोग–**

माता पित्यांना सोडून आलेल्या मुलींना भूननी मातेची ममता दिली. भून, श्राविकाश्रमात राहिल्यामुळे आश्रमीय वातावरणात एक प्रकारचे नवचैतन्य संचारले होते. मुलींना नीटनेटके राहायला शिकविणे, त्यांच्या डोक्यातील उवा काढणे, सुट्टीच्या दिवशी त्यांना न्हाऊ घालणे इत्यादी निस्वार्थ सेवा, त्या देत होत्या. सुट्टीच्या दिवशी मुलींची बालसभा घेऊन वक्तृत्व, गीत गायन, कथाकथन इ. गुण प्रगट होण्यासाठी संधी प्राप्त करून देत असत. मुलींचा सर्वांगीण विकास होण्यासाठी भूनची धडपड असे. मुलींनी खोड्या केल्या किंवा कामात व अभ्यासात चुकारपणा केला तर त्यांना कडक शिक्षाही त्या करीत; परंतु ज्याप्रमाणे मातेला आपल्या बाळाला रागावले, मारले की नंतर पश्चात्ताप होतो व नंतर ती बाळाला कुशीत घेऊन कुरवाळते त्याप्रमाणे भूनसुद्धा मुलींना शिक्षा करून नंतर पुन्हा मायेचा हात फिरवून जवळ करीत. त्यामुळे मुलींना त्यांच्याबद्दल आदर

वाटत असे. भूनचा स्वभाव नारळासमान आहे. वरकरणी कठीण पण आतून मऊ. कोणी आजारी असेल किंवा दु:खी असेल तर भूनचे अंत:करण दयेने ओलेचिंब होत असे. भावनावश होऊन तिला सर्व काही समर्पण करायला भून तयार असत. मुली आजारी पडल्या की त्यांची मनोभावे सेवा करून योग्य ते औषधोपचार करून त्यांना निरोगी बनवूनच स्वस्थ बसत. मोठ्यांशी आदराने बोलेन,चोरी करणार नाही, खोटे बोलणार नाही, इत्यादी छोटे छोटे नियम घ्यायला लावून त्यांच्यावर सुसंस्काररूपी अत्तराचे सिंचन करीत. त्याचा सुगंध आजूबाजूला दरवळत असे. थोड्याच दिवसात श्राविकाश्रमाची कीर्ती सर्वत्र दरवळू लागली. मुलीला पाहुणे पाहायला आल्यावर मुलगी कंकुबाई श्राविकाश्रमात शिकलेली आहे हे कळाल्यावर काही न पाहता संबंध पक्का करून जात. ५ डिसेंबर १९४१ रोजी श्री. विनोबा भावे यांचे श्राविकाश्रम पाहण्यासाठी आगमन झाले. आश्रमातील स्वच्छता, व्यवस्था, मुलींचा नीटनेटकेपणा व पवित्र वातावरण पाहून ते अत्यंत खुश झाले व तसा शेराबुकमध्ये शेराही लिहून दिला.

**कंकुबाई श्राविकाश्रमातील जीवन –**

श्राविकाश्रम संस्थेची उभारणी स्व. कंकुमावशींच्या स्त्रीधनाने झाली. आपल्या मातु:श्रींचे कार्य व स्मारक म्हणून कंकुमावशींचे सुपुत्र उदारधी श्रीमान् सेठ मोतीचंद गौतमचंद शहा व त्यांच्या धर्मपत्नी कुसुमबाई यांनी तन-मन-धनाने संस्थेस सहयोग दिला. त्यावेळी त्यांनी १३ हजारांचे बृहद्दान देऊन श्राविकाश्रमाची दोन मजली इमारत बांधून दिली. त्याच्या तिसऱ्या मजल्यावर एक छोटीशी खोली बांधली होती. तेथे भूनचे वास्तव्य होते. भून जेव्हा कारंजाला आल्या तेव्हा कंकुमावशी महावीर ब्रह्मचर्याश्रमामध्ये पू. महाराजांच्या सानिध्यात राहत असत. गजाबेनना पाहून त्यांना खूप समाधान वाटे. गुजराती समाजातील एक तरूण महिला एवढा मोठा त्याग करते याचा त्यांना स्वाभिमान वाटे. त्या गजाबेनना सतत संस्कारित करण्यासाठी मार्गदर्शन करीत. 'येथील माणसे रूक्ष, माती रूक्ष, हवा रूक्ष तू येथे कशी राहणार?' असे त्या भूनना चेष्टेने म्हणत. १९३९ मध्ये



कंकुमावशींचा स्वर्गवास झाल्यामुळे भूनचे मातृछत्र हरवले.

काही काळानंतर भून स्वत: स्वयंपाक करून घेऊ लागल्या. बाबांना सांगून घर खर्चाची व्यवस्था केली. पू. महाराजांनी भूनना समजाविले 'स्वतंत्र घर करू नका, मोठ्या घराण्यात ऐश आरामात राहिलेल्या तुम्हाला हे कष्ट सोसणार नाहीत. तुम्ही आश्रमातच जेवण करा.' पण जिद्दी स्वभावाच्या भूननी कधी हार मानली तर खरे, त्यांनी स्वतंत्र स्वयंपाक केलाच. स्वत:च्या हातांनी स्वयंपाक बनवून महाराजांना आहार दिला. महावीर ब्रह्मचर्य आश्रमातही एक घर केले व तेथे जाऊनही त्या स्वयंपाक बनवून महाराजांना आहार देऊ लागल्या. सहजच श्राविकाश्रमातील मुलींच्यावर ही हे आहारदानाचे संस्कार होत गेले. मुली भूनना मदत करून त्यागींना आहार देत असत. भून श्राविकाश्रमात राहत. पण धार्मिक शिकण्यासाठी सावजींच्याकडे व पू. महाराजांच्याकडे दुपारी महावीर ब्रह्मचर्याश्रमात जात असत. प. पू. महाराजांच्या सदुपदेशाने व सत्समागमामुळे त्यांना व्रते धारण करण्याची भावना उफाळून येत असे. प. पू. महाराज त्यांना समजावत 'व्रते धारण करणे हा खेळ नाही. भावनावश होऊन व्रते स्वीकारून उपयोग नाही. कोणताही कठीण प्रसंग आला तरी व्रताचा भंग होता कामा नये. व्रते घेताना 'आपण कोठे राहतो, तेथील वातावरण आपल्या व्रताला अनुकूल होईल का? पुढे आपल्याला कोठे जावे लागेल? तेथे आपल्या व्रतांचा निभाव लागेल का?' या सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करून व्रते धारण करावीत. भूननी सर्व बाबींचा सांगोपांग विचार करून सन १९३८ रोजी ५ अणुव्रते, ३ गुणव्रते व ४ शिक्षाव्रते अशा श्रावकांच्या बारा व्रतांचा अंगीकार केला. घेतलेल्या व्रतांची नोंद एका छोट्याशा वहीमध्ये करून ठेवली आहे.

**उज्वल जीवनासाठी प्रयत्न –**

आजोळी अत्यंत मोकळ्या वातावरणात वावरलेल्या भूनना पुरुषांशी बोलतांना संकोच वाटत नसे. कारंजाच्या लोकांना त्यांचे हे मोकळे वागणे खटकत असे. त्यामुळे लोक काही अपवाद करीत. पू. महाराज व प्रद्युम्नसावजी त्यांना कसे रहावे हे समजून सांगत. या सर्वांच्या सुसंस्कारामुळे त्यांचे जीवन अष्टपैलू बनत चालले होते. आपल्या चुका

सुधारून आपले जीवन उन्नत बनविण्यासाठी भूनना सतत महाराजांचे मागदर्शन मिळत होते. चवरे घराण्यातील एक सुपुत्र ध. श्री. माणिकचंदजी यांनी महाराजांकडून ब्रह्मचर्य व्रत घेऊन आपले जीवन महाराजांना व आश्रमाला समर्पित केले होते. त्यांना सर्वजण 'तात्या' म्हणत. त्यांनीही ज्येष्ठ बंधूची भूमिका वठवून भूनना मार्गदर्शन केले.

२३ सप्टेंबर १९४१ रोजी भूननी लिहिलेल्या दैनंदिनीमधील मजकूर वाचल्यावर लक्षात येते की आपले दोष काढून आपले जीवन उज्ज्वल बनविण्यासाठी भून किती आतुर होत्या. तो मजकूर पुढीलप्रमाणे- 'लक्षात ठेवण्यासारखा दिवस, तात्यांना व महाराजांना माझ्यात होणाऱ्या चुका विचारल्या. त्यांनी फार मोकळ्या अंत:करणाने एक चूक सांगितली-प्रश्न विचारताना आवाज चिडलेला असतो. चूक ऐकून फार आनंद वाटला.' आपले दोष ऐकून आनंदी होणारे लोक जगात किती सापडतील? लाखात एखादा मिळणेही दुर्लभ आहे.

तसेच ४ जानेवारी १९४२ रोजीची दैनंदिनी-'पूज्यपादांनी (महाराजांनी) भावनाप्रधानी माणसाचे लक्षण (मला) सांगितले. (ते मला) फार पटले. (पहिले लक्षण) कषायाधीन होऊन काम करणे आणि हा गुण (दुर्गुण) माझ्यात आहे हे परोपरीने दुसऱ्या भाषेत (महाराजांनी) व्यक्त केले. मलाही माझ्यात दुर्गुण असेल असेच वाटते आणि दुसरे (दुसरे लक्षण) एकदम कोणतेही खात्रीपूर्वक बोलून जाणे. मी प्रयत्न करते असे न म्हणता कधीच होऊ देणार नाही असे बोलण्याने आपल्या शत्रूस बोलण्यास वाव मिळतो. बोलण्यात गांभीर्य असावे वगैरे सूचना (महाराजांनी) दिल्या. एकदा भूननी महाराजाजवळ आपला मनोदय प्रकट केला. त्या म्हणाल्या, ''महाराज, मला संस्कृत शिकून पंडित व्हावयाचे नाही, माझे ते ध्येय मुळीच नाही. मला जिनेन्द्र भगवंतांनी सांगितलेल्या वस्तुस्वरूपाचे ज्ञान करून घ्यावयाचे आहे. याशिवाय दुसऱ्या कशातही मला रस नाही.' यावरून लक्षात येते की खऱ्या धर्मास प्राप्त करण्याची भूनची किती आंतरिक तळमळ होती. ख्याती, पूजा, लाभ, प्रतिष्ठा यांची यत्किंचितदेखील अपेक्षा नव्हती.



१९३४ साली कुंभोज-बाहुबली येथे नवीन गुरुकुल काढल्यामुळे महाराजांचे कारंजाहून बाहुबली व बाहुबलीहून कारंजाला जाणे येणे चालू झाले. कारंजा व बाहुबली येथे आलटून पालटून चातुर्मास होत असत. बाहुबली येथे जंगलच होते. श्रावकांची वस्ती नव्हती. शिवाय दक्षिणेकडील खानपानामध्येही फरक असे. महाराजांचा गुजराती पिंड. त्यामुळे प्रकृती नाजूक म्हणून त्यांच्या व्यवस्थेसाठी भूनही बाहुबलीला येत असत. त्यावेळी बाहुबलीमध्ये कोणत्याही सुविधा नव्हत्या. हाताने दळण दळावे लागे. भांडी घासायलाही कोणी मिळत नसे. नेजचे ए. बी. पाटील गुरुजी भूनला भांडी घासून देत. पू. महाराजांना व भूनला तर त्यांनी एका सख्या भावाप्रमाणे मदत केली. महाराज व भून म्हणतील ती आज्ञा शिरसावंद्य मानून सेवेमध्ये हजर राहात असत. जेव्हा महाराजांनी बाहुबलीला संस्था काढली हे पाटलांना समजले तेव्हा पोलीस पाटील पद सोडून महाराजांच्या चरणसान्निध्यात जीवन समर्पण केले. असे सर्वस्व समर्पक ए. बी. पाटील गुरुजी असल्यामुळे भूनला कशाचीही उणीव जाणवली नाही. भूननी महाराजांच्या प्रकृतीला अनुकूल असा आहार देऊन भक्तिपूर्वक महाराजांची सेवा केली.

जानेवारी १९४२ सालची घटना. बाहुबलीत वास्तव्य असताना भूनना श्वास घ्यायला त्रास होत असे. त्याचवेळी त्यांचे धाकटे बंधू श्री. विमलचंद यांनाही श्वासाचा त्रास होत होता. त्यावेळी मिरजेच्या मिशन हॉस्पिटलशिवाय इतरत्र मोठ्या दवाखान्याची सोय नव्हती. दोघांनाही मिरजेला मिशन हॉस्पिटलमध्ये डॉ. बोर्डे यांनी तपासले व नाकाचे ऑपरेशन करण्यास सांगितले. भूननी डॉक्टरांना स्पष्ट सांगितले, 'आपले औषध वगैरे काही घेणार नाही. असे असेल तर ऑपरेशन करून घेते, नाही तर नको, डॉक्टरांनी काही हरकत नाही. फक्त ऑपरेशन करतो असे कबूल केले. डॉक्टर बोर्डेनी दोघांचेही ऑपरेशन अत्यंत आत्मीयतेने व आस्थेने केले. दवाखान्यातील कम्पाउडर व नर्स 'औषधच घ्या, आमची गादी वापरा इत्यादी सारखी किरकिर करत व त्रास देत. डॉक्टरांना हे समजल्यावर डॉक्टरांनी सर्व कर्मचाऱ्यांना बोलावून खडसावून सांगितले. 'ही

धार्मिकवृत्तीची माणसे आहेत. यांना स्वतंत्र म्हणतील त्याप्रमाणे वागू द्या, त्रास देऊ नका.' दुसऱ्या दिवशी नाकातील कापसाचा बोळा काढल्याबरोबर भून डॉक्टरांना म्हणाल्या. मी 'घरी जेवावयास जाणार.' डॉक्टरही म्हणाले, 'बेधडक जा'. लगेच दुपारी भून बागेत फिरल्यासुद्धा. भूनची ही स्वतंत्रवृत्ती व डॉक्टरांची त्यांच्यावरची आस्था पाहून नर्स व कम्पाउंडरांना आश्चर्य वाटे. भूनच्या त्यागवृत्तीचा व व्यक्तित्वाचा डॉक्टरांवर चांगलाच प्रभाव पडला होता. मिरज व मुंबईच्या डॉक्टरांच्या आत्मीयतापूर्ण व्यवहाराचे किस्से भून वारंवार आम्हाला ऐकवत असतात.

१९४२ साली कारंजा गावामध्ये प. पू. वीरसागर, प. पू. आदिसागर व प. पू. सिद्धिसागर महाराजांचा चातुर्मास संपन्न झाला. त्यावेळी क्षु. समन्तभद्र महाराजांचा चातुर्मास महावीर ब्रह्मचर्याश्रमातच होता. श्राविकाश्रमामध्ये भून व मुली मिळून चौका लावीत. दररोज एकेका मुनींचा आहार निरन्तराय पार पडत असे. मंदिरात जाऊन भून पू. वीरसागर व पू. सिद्धिसागर महाराजांशी धर्मचर्चा करीत. महाराजांनाही भूनच्या बुद्धिमत्तेबद्दल व धार्मिक ज्ञानाबद्दल कौतुक वाटे. महावीर ब्रह्मचर्याश्रमात जाऊन क्षु. समंतभद्रांशीही चर्चा व ग्रंथवाचन करीत. त्या एका चातुर्मासात भूनने रयणसार, सारसमुच्चय, अष्टपाहुड, परमात्मप्रकाश, महापुराण, ज्ञानार्णव, सर्वार्थसिद्धी एवढ्या ग्रंथांचा स्वाध्याय केला. केवळ हिंदी अनुवाद न वाचता, संस्कृत श्लोक व टीकेचा अर्थ लावून त्या वाचत असत. एवढ्या ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी किती तास ज्ञानसाधना करीत असतील याचे अनुमान करता येत नाही. भून नेहमी सांगत, "दररोज १८-१८ तास मी अभ्यास करीत होते."

१९४१ मध्येच प्रद्युम्नासावजींकडून कर्मकांड ग्रंथ शिकून घेतला होता. महाराजांच्याजवळ क्षत्रचूडामणी, सागार धर्मामृत, पुरुषार्थसिद्ध्युपाय इत्यादी ग्रंथांचा अभ्यास केला. दोघांच्याजवळचे धार्मिक ज्ञानाचे भांडवल संपले. यांची तर किती शिकले तरी नवीन ग्रंथ शिकण्याची भूख भागत नव्हती. लब्धिसार, धवला इ. मोठमोठे ग्रंथ स्वत: वाचून काढीत; परंतु पूर्ण



समाधान होत नसे. मोठमोठ्या विद्वानांनासुद्धा त्या ग्रंथांचा अर्थ समजणे कठीण. त्याकाळी बनारस येथे पंडित लोकांची खाण होती. विश्वविद्यालयामध्ये बरेच पंडित कार्यरत होते. सिद्धान्ताचार्य पं. फूलचंद्रजी शास्त्री यांच्याशी भूननी पत्राने संपर्क साधला. त्यांनी योग देण्याची स्वीकृती दिली. एका स्वयंपाकीण बाईला घेऊन भून १९४८ मध्ये बनारस येथे लब्धिसार ग्रंथ शिकण्यासाठी गेल्या.

श्री. फूलचंद्र पंडितजी सिद्धान्तशास्त्राचे गाढे अभ्यासक, त्यांनी आयुष्याची २६ वर्षे धवल, जयधवल, महाधवल ग्रंथांचे हिन्दी अनुवाद करण्यामध्ये वेचली व सारे आयुष्यही सरस्वती मातेच्या सेवेत समर्पित केले. त्यांच्या तोडीचा अन्य सरस्वतीपुत्र होणे दुर्लभ आहे. भून बनारसला पोहोचल्या. पंडितजींनी अत्यंत आदरपूर्वक आत्मीयतेने त्यांची सर्व व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी ग्रंथ शिकायला सुरू करण्यापूर्वी भूनने पंडितजींना अट घातली. "पंडितजी, हम पहले श्लोकका व टीकाका अर्थ लगाते हैं। आप सुनना और जहा गलत होवे या हमे नही आवे वहा आप बताना।" पंडितजींच्या जीवनामध्ये असा शिष्य प्रथमच भेटला असेल. पंडितजींनी अट कबूल केली. भून स्वत: विषय तयार करून जात व पंडितजींना अर्थ लावून दाखवत.

लब्धिसारासारख्या कठिण ग्रंथाचा अर्थ लावणे सोपी गोष्ट नव्हती. शक्यतो कोणी त्याचा स्वाध्याय करीत नव्हते. महाराष्ट्रातील तर लब्धिसार ग्रंथ वाचणारी ही पहिलीच महिला असेल. पंडितजी भूनच्या विलक्षण बुद्धिमत्तेवर अत्यंत खुश होते. त्यांना भूनचे खूप कौतुक वाटायचे. दोन महिन्यात औपशमिक चारित्राधिकारापर्यंतचा भाग पूर्ण झाला. शेवटचा क्षपणाअधिकार शेष होता; परंतु काही कारणास्तव भूनना तेथून निघावे लागले. माणसाला कधी-कधी आपल्या इच्छांना आवर घालावा लागतो. शिकण्याची इच्छा अपुरी ठेवूनच भविष्यात कधीतरी योग येईल या आशेने त्यांनी इच्छेला आवर घातला. स्वंयपाकीण बाईला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी सम्मेद शिखरजीची वंदना करून त्या कारंजास परतल्या.

कारंजाला आल्यानंतर प्रद्युम्नसावजींशी पुन्हा या ग्रंथाचे वाचन केले. पुढे अनेकांना हा ग्रंथ शिकवून परंपरा चालू ठेवली. क्षपणासार शिकण्याची इच्छामात्र शेवटपर्यंत अपुरीच राहिली. भून श्राविकाश्रमामध्ये महिलांसाठी दररोज दुपारी जीवकाण्ड-कर्मकाण्ड इत्यादी ग्रंथ शिकवीत असत. भूनच्या शिकविण्याच्या सचोटीमुळे महिलांना शिकण्याची गोडी निर्माण झाली होती. जवळ जवळ ५०-६० महिला त्यांच्या तासाला उपस्थित असत. १९५० साली क्षु. समंतभद्र महाराजांसोबत खुरई (मध्यप्रदेश) येथे भूननी चातुर्मास केला होता. चातुर्मासात भूनची बुद्धिमत्ता, व्यवस्थापन कौशल्य व कडक शिस्त पाहून खुरईचे सेठ साहब कृषिपंडित ऋषभकुमारजी व सेठानीजी भूनवर फिदा झाले होते. शेवटपर्यंत ते दाम्पत्य भूनना भगिनीप्रमाणे मानून प्रत्येक कार्यामध्ये भूनचा सल्ला घेत असत.

**क्षुल्लक समंतभद्र महाराजांचा दीक्षाविधी –**

१९५२ साली क्षुल्लक समन्तभद्रांनी बाहुबली येथे मुनिदीक्षा घेण्याचे निश्चित केले. महाराजांनी लहानपणीच भाविजीवनाचा आराखडा आखला होता. ५-६ वर्षाचे असल्यापासून ते वडिलांबरोबर मंदिरात शास्त्र ऐकायला जात होते. त्यामुळे मुनिजीवनाचे संस्कार होऊन त्यांनी आपणही मुनी होऊ असा संकल्प केलेला होता. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांनी कुंथलगिरी पहाडावर ब्रह्मचर्यव्रत घेतले होते. वयाच्या २० व्या वर्षी दैनंदिनीमध्ये लिहून ठेवले होते की ४० व्या वर्षी क्षुल्लक दीक्षा व ६० व्या वर्षी मुनिदीक्षा घ्यावी. त्यानुसार त्यांनी प्रथम सातवी प्रतिमा, नंतर १० वी प्रतिमा, त्यानंतर ४० वर्षे पूर्ण झाल्यावर क्षुल्लक दीक्षा घेतली होती. वयाची ६१ वर्षे समाप्त होण्यापूर्वीच त्यांच्या मनात, संकल्पानुसार मुनिदीक्षा घेण्याचे भाव जागृत झाले. गुरुकुलाचा दिवसेंदिवस पसारा वाढत असतानाही ते आपले आत्महित कधीही विसरले नाहीत. महाराजांचा दीक्षेचा विचार ऐकून भून व कार्यकर्ते 'महाराजांची नाजूक देहयष्टी, त्यांना हे दिव्य कसे काय पेलू शकेल? पायात छोटासा खडा टोचला तरी त्रास होतो, पायी विहार कसा झेपणार? महाराजांच्या निवृत्तीनंतर संस्था कशा चालणार? या प्रश्नचिन्हानी



चिंताक्रांत झाले; परंतु दुबळ्या शरीरामध्ये सामर्थ्यशाली आत्मा वास करीत होता. त्यांना स्वत:च्या सामर्थ्यावर विश्वास होता. तसेच संस्था मुळातच पवित्र उद्देशाने स्थापित झाली असल्याने तिलाही एका व्यक्तीच्या निवृत्तीमुळे धक्का पोहचणार नव्हता. कारण संस्था जिवंत राहतात त्या ध्येयप्रवणतेमुळे, कार्यकर्ते बदलले किंवा दिवंगत झाल्याने संस्थेच्या उद्देशाचा व ध्येयाचा नाश होत नाही, असा त्यांना दृढविश्वास होता.

गुरुकुलाची मुहूर्तमेढ रोवण्यापूर्वी देवचंदांनी प्रद्युम्नसावजींना स्पष्ट सांगितले होते की, ''आत्मोन्नतीला साधक म्हणून हा संस्थेचा प्रपंच आहे. माझ्यासाठी संस्था आहे, संस्थेसाठी मी नाही, हे निक्षून सांगतो. जेव्हा संस्था माझ्या आत्मोन्नतीच्या आड येईल तेव्हा मी केव्हाही संस्था सोडून जाईन. तेव्हा आपण मला रोकू शकणार नाही, आणि ठपकाही ठेऊ शकणार नाही, हे लक्षात असू द्यावे.' तेव्हा प्रद्युम्नसावजींनी सहज उत्तर दिले होते. ''जेव्हा आपणास असे वाटेल तेव्हा आपण सोडून जा. नंतर आम्ही आमच्या संस्थेचे पाहून घेऊ. पण ही गोष्ट कुणाजवळही बोलू नका.' ही घटना प्रत्यक्षात साकार होईल असे प्रद्युम्नसावजींना वाटले नव्हते. आता ते त्यांना त्यांच्या मार्गापासून परावृत्त करू शकत नव्हते. कारण आपणच त्यांना तशी संमती दिली आहे. तो दीक्षेचा सोहळा आपणाकडून पाहवणार नाही म्हणून ते बाहुबलीला दीक्षाविधीला हजर राहिले नाहीत.

पू. गुरुदेवांचा विचार प्रथमत: प. पू. चारित्र चक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या हस्ते श्री. सिद्धक्षेत्र कुंथलगिरीवर मुनिदीक्षा घेण्याचा होता; परंतु आचार्यश्री तूर्त कुंथलगिरीला जात नाहीत हे समजल्यानंतर त्यांची अनुमती व शुभाशीर्वाद मिळवून श्रीं अतिशय क्षेत्र, बाहुबली येथे आचार्यश्रींचे ज्येष्ठबंधू प. पू. वर्धमानसागर महाराजांच्या हस्ते दीक्षा घेण्याचे निश्चित झाले. त्यावेळी प. पू. वर्धमानसागर महाराज कुंभोज गावीच होते. त्यांना जाऊन दीक्षा देण्याची विनंती केली. त्यांनी ती सहर्ष स्वीकारली. ६१ व्या वर्षसमाप्तीच्या सात दिवस अगोदर मार्गशीर्ष शु.१२ शुक्रवार, दि. २८-११-१९५२ रोजी मुनी वर्धमानसागर महाराजजींच्या

करकमलाद्वारे त्यांनी परमपावन भगवती जैनेश्वरी दीक्षा अंगीकारली. क्षुल्लक समन्तभद्र मुनी समन्तभद्र बनले.

तो भव्य दीक्षा सोहळा पाहून भूनना व कार्यकर्त्यांना अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटल्यासारखे वाटले. सर्वांचे डोळे सहजपणे पाणावले. वैराग्याचे तेज व निर्धाराचे बळ पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले. निरागस दिव्य निर्ग्रन्थ रूप वाहून सर्वांचे मस्तक श्रद्धेने नत झाले. समन्तभद्र महाराजांच्या जय जयकाराने आकाश दुमदुमून गेले. अगदी चारच दिवसात दीक्षेचा निश्चय झाल्यामुळे तार व फोनद्वारे कारंजा, सोलापूर, मुंबई इत्यादी ठिकाणी कळविण्यात आले होते. तरीसुद्धा बरेच भक्तगण सर्व कामे बाजूला ठेवून धावत आले होते.

महाराजांनी मुनिदीक्षा घेतल्यानंतर भूनना आपली जबाबदारी वाढल्यासारखे वाटले. एक तर महाराजांचे शरीर-स्वास्थ्य सांभाळणे व दुसरे संस्थेची अनधिकृत सर्व जबाबदारी येऊन पडली. महाराजांच्या प्रकृतीनुसार निर्दोष आहार व औषधोपचार करण्यामध्ये भूननी कधीही प्रमाद केला नाही. डोळ्यात तेल घालून त्या काळजीपूर्वक व्यवस्था करीत असत. महाराजांचे निरामय दीर्घ जीवन व्यतीत होण्याचे रहस्य भूनच्या निस्पृह वैय्यावृत्यामध्येच लपलेले आहे. यानंतर भूनचा स्थायी निवास बाहुबली येथेच झाला.

दीक्षा घेण्यापूर्वी महाराजांनी संस्थेचा संपूर्ण भार सोलापूरहून ब्र. माणिकचंदजी भीसीकरांना बोलावून सोपविला होता. आता भीसीकर गुरूजी संस्थेच्या संचालक पदावर अधिरूढ होऊन संस्थेची धुरा वाहू लागले. त्यांनीसुद्धा महाराजांच्या आज्ञेवरून आपले संपूर्ण जीवन ब्रह्मचर्यपूर्वक संस्थेसाठी समर्पित केले होते. त्यांनी प्राकृत एम.ए. व न्यायतीर्थ पदवी संपादन केली होती. आता बाहुबली हे त्यांचे कार्यक्षेत्र बनले. कारंजा ही त्यांची जन्मभूमी. त्यांचेही स्थायी वास्तव्य बाहुबली येथेच झाले. ते भूनना ज्येष्ठ भगिनीचा मान देत होते व त्यांचा प्रत्येक शब्द आज्ञा समजून पाळत होते. त्यांना अध्यात्मग्रंथांच्या स्वाध्यायाची गोडी भूननीच लावली. संस्थेच्या व्यापातून दिवसभर स्वाध्यायासाठी निवांत वेळ मिळत नसे. भून



पहाटे ४ वाजता उठून आपल्या बंधूजवळ जाणार व बाहेरूनच ''भीसीकर, उठा, स्वाध्याय करावयाचा आहे.'' भूनच्या हाकेसरशी गुरूजी खाडकन उठून बसणार व शुचिर्भूत होऊन पुस्तक घेऊन ज्येष्ठ भगिनीसमोर बसणार. त्यांनी कुन्दकुन्द आचार्य प्रणीत समयसार ग्रंथ संस्कृत आत्मख्याती टीकासहित वाचला. त्यामुळे गुरूजींना स्वाध्यायातील रस चाखता आला. खराखुरा स्वाध्यायाचा रसास्वाद आजपर्यंत कधी चाखलाच नाही असे वाटून त्यांना अपूर्व आनंद होऊ लागला. त्यांना स्वाध्यायाची एवढी रुची उत्पन्न झाली की जीवनाच्या अखेरच्या दिवसापर्यंत पहाटे ४ वाजता उठून स्वाध्यायाद्वारे ज्ञानामृताचे प्राशन करूनच त्यांच्या दिवसाची सुरवात होत असे. मोठ्या बहिणीने दिलेली ही मोठी देणगी होती ती त्यांनी शेवटपर्यंत जतन करून ठेवली.

**बाहुबली बृहत् मूर्तीची संकल्पना –**

१ व २ एप्रिल १९५४ रोजी बाहुबली येथे मौजीबंधन रथोत्सव व नूतन वसतिगृहाचा उद्घाटन समारंभ संपन्न होत होता. १ एप्रिललाच अचानक आचार्यश्री शंतिसागर महाराजांनी नांद्र्याहून बाहुबलीस येण्यास विहार केला. एकाच दिवसात त्यांनी नांद्र्याहून बाहुबलीपर्यंतचे ३० किलोमीटर अंतर वयाच्या ८३ व्या वर्षी हा हा म्हणता तोडले. सायंकाळी क्षेत्राजवळील एका शेतात मुक्काम केला. दर्शनास आलेल्या कार्यकर्त्यांजवळ त्यांनी आपल्या मनातील संकल्प सांगितला – तो म्हणजे श्री बाहुबली क्षेत्रावर २५ फूट उंचीची एक विशालकाय भव्यमूर्ती विराजमान करून बाहुबली हे श्रवणबेळगोळासारखे महान् तीर्थक्षेत्र बनवावे व अशा भव्यमूर्तीच्या छत्रछायेत याठिकाणी कमीत कमी १००० विद्यार्थी निरंतर जिनधर्माचे अध्ययन करीत राहोत,'' हा होय. या संकल्पाची पूर्ती संमतभद्र महाराज करीत असतील तर मी क्षेत्रामध्ये प्रवेश करीन, अन्यथा आल्या वाटेने परत जाईन.

प. पू. समंतभद्र महाराजांना मोठे कोडे पडले. ज्ञानाची साधना,

ज्ञानाचा प्रचार करणे हे महाराजांचे ध्येय होते. एवढे मोठे क्षेत्र निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न नव्हते. मुनिदीक्षा घेतल्यानंतर आचार्यश्रींचे प्रथमच दर्शन होणार होते. गुरूंची आज्ञा उल्लंघण्याचे महापापही करण्याचे साहस नव्हते. भून, भीसीकर गुरूजी व अन्य कार्यकर्त्यांनी महाराजांना ही जबाबदारी आम्ही घेतो. आपण आचार्यश्रींना होकार देऊन त्यांची इच्छा पूर्ण करण्याचे आश्वासन द्या' असे सांगितले. २ एप्रिल रोजी सकाळी समंतभद्र महाराज व सर्व कार्यकर्त्यांनी आचार्यश्रींचे स्वागत केले. त्यांच्या महान् संकल्पपूर्तीचे आश्वासन दिले. ज्याप्रमाणे लोकामध्ये सर्वांना दिव्यातील प्रकाशमान ज्योत दिसते; परंतु त्या दिव्याला प्रकाशमान होण्यासाठी आपले अस्तित्व संपुष्टात आणून आपले जीवन ज्योतीला समर्पित करणारे तेल दिसत नाही. त्याप्रमाणे महापुरुष या लोकात प्रकाशमान होतात; परंतु त्यांना प्रकाशित करण्यासाठी अनेक छोट्या पुरुषांचे बलिदान कारणीभूत असते ते मात्र अदृश्यच राहते. गुरुदेवांचे प्रत्येक कार्य सफल होण्यासाठी भूनचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी कधी आपली प्रसिद्धी केली नाही. सभा समारंभामध्ये पुढे पुढे केले नाही म्हणून त्यांचे योगदान अज्ञातच राहिले.

मोठी माणसे कोणतेही कार्य हाती घेतले की ते तडीस नेल्याशिवाय राहात नाहीत. आचार्यश्रींचा संकल्प पूर्ण करण्यासाठी जयपूरहून प्रसिद्ध मूर्तिकार नाठाजी यांना बोलावण्यात आले. ९ ऑगस्ट १९५५ रोजी बाहुबलीची बृहन्मूर्ती ११००० रूपयामध्ये निर्माण करण्याचे नाठाजींनी कबूल केले. मकराना येथे मूर्ती कोरण्याचे कार्य सुरू झाले.

त्याचवेळी कुंथलगिरी सिद्धक्षेत्रावर आचार्यश्रींची सल्लेखना चालू होती. त्यांना हा शुभ संदेश ऐकून समाधान वाटले. १८ सप्टेंबर १९५५ भाद्रपद शुद्ध द्वितीयेच्या दिवशी आचार्यश्रींचे यमसल्लेखनेपूर्वक महानिर्वाण झाले. संकल्पपूर्तीचा गोड सोहळा पाहण्यासाठी आचार्यश्री राहिले नाहीत; परंतु आपला शिष्य, केलेला संकल्प पूर्ण करणार याचा त्यांना दृढविश्वास होता.



### पितृछत्र हरपले-

जानेवारी १९५५ मध्ये अक्कलकोटहून धाकटे बंधू विमलचंद यांची वडिलांची तब्बेत बरी नसल्याची २-३ पत्रे आली. सज्जन पुरुषालासुद्धा कर्माचा उदय सोडत नाही. सात्त्विकवृत्तीच्या धार्मिक पित्याला असाध्य रोगाने पछाडले होते. वेदना भयंकर होत्या; परंतु सतत णमोकार मंत्राचे स्मरण करीत शांत परिणामाने सहन करीत ते कर्मांचे कर्ज चुकवत होते. दिवसेंदिवस प्रकृती क्षीण होऊ लागली होती. १३ जानेवारीस दादांची प्रकृती जास्त गंभीर असल्याचे बाहुबलीस टपाल आले. भूननी सर्व सामान आवरून ताबडतोब गाडी गाठली. १४ तारखेस सकाळी ९।। वाजता अक्कलकोटच्या स्टॅण्डवर उतरताच दादा काल रात्रीच गेल्याची दु:खद बातमी समजली. दादांची अखेरची तरी भेट होईल व त्यांची थोडी बहुत सेवा करण्याचा योग्य मिळेल व अंतिम समाधी साधता येईल हे मनातले विकल्प मनातच राहिले. आता राहिला होता फक्त पश्चात्ताप. भूनना फार मानसिक यातना झाल्या. स्वत:च्या निर्बलपणाचा सारखा तिरस्कार वाटत होता. स्वत:च्या कृतघ्नपणाची जाणीव होत होती. आपण असा कसा प्रमाद केला. लवकरच आपण निघालो असतो तर पश्चात्तापाची वेळ आली नसती. अशा असंख्य विकल्पांनी काहूर माजले असता घर कधी गाठले समजलेच नाही. भूनना पाहून सर्वांना दु:ख अनावर झाले. अश्रूवाटे सर्वांनी आपले हृदय हलके केले. भूननी आपल्या प्रमादाबद्दल पश्चात्ताप व्यक्त करून सर्वांची क्षमा मागितली. दादांचे मरण सुधारलेले ऐकून मात्र त्यांना थोडे समाधान वाटले. णमोकर मंत्र ऐकता ऐकता त्यांनी शेवटचा श्वास सोडला होता. दुसऱ्या राजूबाईंनी मात्र अखेरपर्यंत सेवा करून आपले कर्तव्य पूर्ण केले. दादांनी मात्र आपली दानवृत्ती शेवटपर्यंत खंडित होऊ दिली नाही. आपल्या खोलीच्या कोपऱ्यात धान्याची पोती ठेवावयास सांगितली व जे गोरगरीब याचक वृत्तीने येत त्यांना आपल्या हाताने त्यातील धान्य घेऊन जाण्यास सांगत. प्रत्येक मकर संक्रांतीच्या दिवशी भूनना दादांची आठवण येई व आपोआपच डोळ्यातून अश्रू ओघळत. दादा शेवटी न भेटल्याचे शल्य भूनना सतत सलत राहिले.

**कुन्दकुन्दागम–उत्कीर्णाचे महाकार्य –**

श्री कुंदकुंद आचार्यांच्या साहित्याचे वारंवार पारायण केल्यामुळे भूनच्या मनावर त्याचा अमिट प्रभाव होता. समयसारादी ग्रंथाच्या महिमेने हृदयऊर्मी उसळत होत्या. दोन हजार वर्षांपासून ही परम पावन कल्याणकारिणी, भवतापहारिणी कुन्दकुन्द वाणीरूपी गंगा अखंड वाहत आपल्यापर्यंत येऊन पोहचली आहे, हे आपले परम सौभाग्य. तिला असेच पुढे वाहत ठेवण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे या भावनेतून कुंदकुंद आगम मंदिराची संकल्पना पुढे आली. भूनच्या मनात आले की कृती झालीच म्हणून समजावे. संगमरवरी श्वेत पाषाणावर कुंदकुंदांचे पंच परमागम उत्कीर्ण करून कुंदकुंदवाणीला टंकोत्कीर्ण अमर बनवावे अशी योजना आखण्यात आली. योजना आखून शांत बसणे हा भूनचा पिण्ड नव्हे. योजना आखण्यापूर्वीच ती कार्यान्वित व्हावी ही भूनची धडपड. तत्काल जयपूरहून कारागीर व संगमरवरी पाषाण बोलावण्यात आले. मध्ये समवशरण व त्याच्याच चारी बाजूच्या भिंतीला आगम मंदिर अशी जोड योजना होती. कारण समवसरणात प्रभूंचे दर्शन व त्यांची वाणी ऐकणे अशी दोन कार्ये होतात. जयपूरहून पांढऱ्या शुभ्र संगमरवरी फरशा आल्या. त्यावर प्रथम सिसपेनने अक्षरे काढून तपासून नंतर खोदण्याचे कार्य भूनच्या देखरेखीखाली चालू होते. एवढे मोठे ग्रंथ पाषाणावर उत्कीर्ण करण्याचे कार्य भारताच्या इतिहासात प्रथमच मानावे लागेल: प्रशस्ती, राजाची स्तुती, क्षेत्राचा इतिहास इत्यादी संबंधी उत्कीर्ण शिलालेख प्राचीन इतिहासात प्रचुरसंख्येने उपलब्ध होते; परंतु पूर्ण ग्रन्थच्या ग्रन्थ उत्कीर्ण करण्याची ही पहिलीच घटना असावी. दि. १९ फेब्रुवारी १९५९ रोजी अध्यात्मसन्त, कुंदकुंद परमागमाचे रहस्योद्घाटक श्री. कानजी स्वामी बाहुबलीस क्षेत्रदर्शनासाठी आले होते. त्यावेळी कुंदकुंद आगम संगमरवरी फरशीवर खोदलेले पाहून 'हे फारच महत्त्वाचे व अपूर्व कार्य झाले आहे. भारतातील हे पहिलेच असले आगममंदिर आहे.' असे उत्स्फूर्त उद्‌गार काढून त्यांनी अपूर्व आनंद व्यक्त केला. भून तेव्हा कुंथलगिरीला होत्या. जेव्हा भूनची त्यांची भेट झाली तेव्हा



ते भूनला म्हणाले– 'तमे तो अम्हारे आगळ गयेला छे' अर्थात 'तुम्ही तर आमच्यापुढे गेला आहात.' येथून प्रेरणा घेऊनच नंतर त्यांनी सोनगढ येथे विशाल परमागम मंदिराची रचना केली. **प्राचीन मूर्ती खंडित झाली तर नवीन बसवता येते, मंदिर भग्न झाले तर त्याचा जीर्णोद्धार करता येतो; परंतु जर प्राचीन आचार्यांनी रचलेले शास्त्र नष्ट झाले तर त्याचा जीर्णोद्धार कसा करणार?** आपल्यासारख्यांच्या प्रमादामुळे कितीतरी प्राचीन ग्रंथसंपदा कालकवलित झाली आहे. आता जी काही जिवंत आहे तिचे संरक्षण करणे आपले कर्तव्य आहे. आपण जर त्यात कसूर केली तर तो अक्षम्य अपराध होईल, पुढील पिढी सत्यधर्मापासून वंचित होईल म्हणून भूनचा एवढा अट्टाहास.

हे कार्य चालू असताना महाराजांचे वास्तव्य पहाडावर होते. पहाडावरून खाली येऊन भूनना हे काम पहावे लागत असे; त्यांनी हे काम अत्यन्त भक्तिपूर्वक तन्मयतेने केले. कामावर असणाऱ्या नोकरांची काळजी घेणे, त्यांच्या सुखदु:खामध्ये सहभागी होणे, त्यांना धर्ममार्गाला लावणे इत्यादी गोष्टींमध्ये भून तत्पर असत. एकदा अक्षरे खोदणाऱ्याची बायको अत्यंत आजारी होती. तिला उठता बसतासुद्धा येत नव्हते. भून स्वत: तिला औषधाच्या पुड्या तयार करून नेऊन देत व खायला लावीत. दोन दिवसातच तिला उठता येऊ लागले. त्या दररोज तिची जातीने चौकशी करून औषध देत असत. काम करणाऱ्याच्या पाठीमागे काही चिंता नसेल तर तो व्यवस्थित काम करू शकतो. म्हणून कामगारांना निश्चिंत करणे आपले कर्तव्य आहे असे भूनचे मत होते.

भूनजवळ काम करणाऱ्या धोंडूने अष्टमूलगुण घेऊन हिंसेचा त्याग केला. एकदा इचलकरंजीचे तीन मराठा गृहस्थ क्षेत्रावर दर्शन करण्यासाठी आले होते. त्यांना भूननी मांसत्यागाची प्रेरणा केली. त्यांनी स्वखुषीने महाराजांजवळ मांस त्यागाचा संकल्प केला. दरवर्षी मे महिन्यात धर्मशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येत होते. भून त्यावेळी छहढाला शिकवीत होत्या. भूनच्या प्रेरणेने एका ब्राह्मण विद्यार्थ्याने आजन्म ब्रह्मचर्यव्रत घेतले.

समवसरणाचे व आगममंदिराचे कार्य लवकरच पूर्ण झाले. इ.स.१९५७ साली १२ ते २० फेब्रुवारीपर्यंत प्रतिष्ठा महोत्सव संपन्न झाला. प्रतिष्ठेसाठी आलेल्या पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था भूनकडेच होती. व्यवस्था करण्यामध्ये भून अत्यंत पटाईत होत्या. एरवीही आश्रमास भेट देणाऱ्या मोठ्या पाहुण्यांच्या जेवणाची संस्थेत स्वतंत्र व्यवस्था नसल्यामुळे भूनच त्यांचा यथोचित पाहुणचार करीत. त्यांना गोड-धोड करून जेऊ घालण्यात भून दक्ष असत. त्यामुळे येणारा पाहुणा खुश होऊन मागतील तेवढे दान देण्यास तयार होई.

दसरा दिवाळीला गुरुकुलातील मुले घरी जात नसत. त्यांच्यासाठी सर्व महिलांना हाताशी घेऊन भून कडाकण्या, करंज्या इत्यादी फराळ करून मुलांना खाऊ घालत. त्यामुळे मुलांना घरची आठवण येत नसे. १००-२०० मुले व कार्यकर्त्यांसाठी करंज्या करण्याचे कार्य किती कष्टाचे आहे! भूनच्या ऑक्टोबर १९५६ ज्या डायरीत लिहिले आहे की, "आज १ ते ७ पर्यंत १२६५ करंज्या केल्या."

१९५७ साली पू. महाराजांचा चातुर्मास उदगांव-कुंजवन येथे झाला होता. कुंजवन क्षेत्रावर राहण्याच्या विशेष सुविधा नव्हत्या.तेथेही भूननी कट्टा बांधणे, चूल घालणे, भांडी घासण्यासाठी ओटा तयार करणे, भिंत सारवणे इत्यादी कामे स्वत: केली. जेथे भून तेथे सौंदर्य व सुव्यवस्था हे गणित ठरलेले होते. त्यावेळी भूनजवळ स्वयंपाक करण्यासाठी अक्कलकोटहून चतुरबाई आल्या होत्या. त्यांचे मालक माणिकलाल विभूते संस्थेमध्ये सेवाकार्य करीत होते. या बाईंनी कामाचा मोबदला न घेता ३५ वर्षे भूनची सेवा केली. चतुरबाईचा २-२।। वर्षाचा विलास नावाचा मुलगा अत्यंत खोडकर होता. तो महाराजांसारखे निर्वस्त्र राहणे, उभा राहून हातात आहार घेणे, सामायिक करणे, मौन राहणे इत्यादी क्रिया करून सर्वांना आकृष्ट करीत असे. चातुर्मासामध्ये १७ ऑगस्ट रोजी पाचलेगावकर महाराज (अजैन साधू) समन्तभद्र महाराजांच्या दर्शनासाठी कुंजवन येथे आले होते. विलासच्या बालक्रीडा पाहून ते त्याच्यावर अत्यंत लट्टू झाले. हे छोटे



महाराज आम्हाला देऊन टाका असे ते म्हणाले. विशेष म्हणजे प. पू. समन्तभद्र महाराजांच्या सदुपदेशाने प्रभावित होऊन त्यांनी रात्रिभोजन त्याग, जलगालन, चर्मासनाचा त्याग, १२ तासाचे मौन इत्यादी नियम घेतले.

याच दरम्यान मकराणा येथे १००८ श्री बाहुबली भगवंतांची मूर्ती कोरून पूर्ण झाल्याचा शुभसंदेश मिळाला. नेज निवासी ए.बी.पाटील गुरुजी मकराना येथे मूर्ती आणण्यासाठी रवाना झाले. २८ फूट उंच मूर्ती आणायची कशी हा प्रश्न होता. कारण त्यावेळी वाहतूक व्यवस्था नव्हती. शेवटी रेल्वेला एक स्पेशल डबा जोडून रेल्वेने मूर्ती आणली. मूर्ती येत असल्याची वार्ता सर्वत्र पसरली होती. श्रवणबेळगोळच्या नंतर विशाल मूर्ती बनवण्याचे हे प्रथमच कार्य होते. गावोगावी मूर्तीचे स्वागत होत होते. मूर्ती पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडायची. ७ सप्टेंबर १९५७ रोजी मूर्ती तेथून रवाना झाली. पावणे दोन महिन्यांनी १ नोव्हेंबर रोजी मूर्ती मिरज स्टेशनवर येऊन पोहोचली. मूर्ती आलेली समजताच भून कुंजवनहून मिरजला अत्यंत उत्सुकतेने गेल्या. ती दिव्य भव्य मनोज्ञ मूर्ती पाहताच त्यांना नेत्र सफल झाल्यासारखे वाटले. त्यांच्या सौन्दर्यप्रधान दृष्टीमध्ये मूर्तीची सौन्दर्यता, रेखीवता, वीतरागता, सामावली होती. कल्पनेपेक्षासुद्धा मूर्ती अधिक सुन्दर मनोज्ञ बनली होती. पुढे १२ दिवसांनी मूर्तीचे हातकणंगले स्टेशनवर आगमन झाले. तेथून पुढे मूर्ती ट्रॉलीवर ठेवून बाहुबली येथे आणण्यात आली. रस्ता कच्चा असल्यामुळे अत्यंत कष्टपूर्वक २।। महिन्यांनी मूर्तीचे बाहुबली येथे शुभागमन झाले. (क्रमश:) (क्रेस्ट ५)

**डोंगर पोखरून स्वगृहाची निर्मिती –**

भूनना एक गोष्ट मनात सलत होती की येथे आपले स्वत:चे घर नाही. संस्थेच्या घरात किती दिवस राहायचे? शिवाय ज्या घरात भून राहत होत्या ते अगदी छोटे व सुविधारहित होते. राजवाड्यासारख्या टोलेजंग तीन मजली वाड्यामध्ये वावरलेल्या भूननी कित्येक वर्षे छोट्याशा एका खोलीमध्ये जीवनयापन केले याचेच आश्चर्य वाटते. स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी कधीही संस्थेवर अवलंबून न राहणाऱ्या भूनना स्वत:च्या

खर्चाने घर बांधायचे होते. तशी भूनची स्वत:ची इस्टेट नव्हती. थोडे बहुत आजोबांनी दिलेले, थोडे बहुत दागिने विकून जमा झालेल्या रक्कमेच्या व्याजावर भूनचा खर्च चालत असे; परंतु कधीही संस्थेचा नवा पैसा घेतला नाही. घर बांधण्यासाठी पैसे कोठून आणायचे? त्यांनी नेमचंद बाबांना पत्र लिहिले. ''बिन भाड्याच्या घरात कोण राहतो? कैदी. मग मी कैदी होऊन राहू का?'' बाबांनी घर बांधण्यासाठी प्रथम रू.५००० पाठवून देण्याचे पत्राने कबूल केले व त्यातील थोडी रक्कम पाठवलीसुद्धा. आता प्रश्न हा होता की, घर कोठे बांधायचे? भूननी जागा अशी निवडली की आपल्या घरावर पुन्हा कोणी घर बांधू नये. अगदी डोंगराच्या पायथ्याशी; जेथे घर बांधले तेथे डोंगरच होता. डोंगर पोखरून तेथे घर बांधण्यास जागा तयार केली. २२ मार्च १९५८ रोजी घराच्या पायाखुदाईचा मुहूर्त केला. भूनच्या देखरेखीखाली बांधकाम सुरू झाले. आपल्या घराभोवती बागबगीचा असावा, फुलाफळांच्या झाडांनी परिसर रम्य बनवावा, अशी भूनची हौस होती. डोंगर असल्यामुळे खाली सर्व खडक लागत असे. भूननी सुरुंग लावून दगड फोडून पाच-पाच फूट खोल खड्डे काढून घेतले व त्यात काळी माती व खत घालून ७-८ आंब्याची व काही नारळांची रोपे लावली. भूनचा हा खटाटोप पाहून कार्यकर्ते चेष्टेने म्हणत 'दगडात कोठे झाडे उगवतात होय. व्यर्थ मेहनत का करता? परंतु कोणाचेही न ऐकता भूननी पुष्कळ झाडे लावली. खत पाणी घालून त्याचे पुत्रवत् संगोपन, संवर्धन केले व याच झाडांची गोड-गोड फळे महाराजांनाही खाऊ घातली. आज भूनच्या घराभोवती एक आमराईच आहे. त्याची गोड फळे चाखायला सर्व लोक लालायित असतात.

**सेवावृत्ती–**

बांधकाम चालू असताना एका गवंड्याच्या डोळ्यात कालवलेल्या सिमेंटचे काही कण पडले. डोळ्याचा नाजूक भाग सुजून लालबुंद झाला. त्याकाळी कोठे आजच्यासारखे डोळ्याचे दवाखाने? बाहुबलीतील डॉक्टर म्हणजे भूनचं. कोणी कार्यकर्ता असो की, कोणी मुलगा असो, कामावरचा गडी माणूस असो की स्वयंपाकीण बाई असो, कोणताही आजार झाला



किंवा जखम जरी झाली तरी सर्वजण भूनकडे धावत येत असत. भूनवर सर्वांची श्रद्धा. भून सर्वांची नि:स्वार्थ सेवा करीत. त्यांनी त्या गवंड्याला दोन दिवस आपल्याजवळ ठेवून घेऊन तासातासाला पाणी, दूध व मातीच्या पट्ट्या ठेवून सेवा केली आणि काय आश्चर्य डोळा दोन दिवसात बरा झाला. पूर्वी कारंजालाही अशीच एक घटना घडली होती. एक मुलगा विहीरीतून पाणी काढीत असताना दुसऱ्या मुलाच्या धक्याने तो मुलगा विहिरीत पडला. बादलीची कडी त्याच्या मनगटात घुसून मोठी जखम झाली. सर्व विहीर रक्ताने लाल दिसू लागली. त्या मुलाला वर काढण्यात आले. त्याच्या गुडघ्याचे चार भाग दिसत होते. महाराजांनी भूनकडे जाण्यास सांगितले. भूननी गुडघा जुळवून वर पट्टी बांधली. मातीच्या व पाण्याच्या प्रयोगाने गुडघा पूर्ववत जुळला. हाताची जखमही मातीनेच भरून निघाली. एवढी मोठी केस हाताळण्याचे धाडस भूननी केले. गावातील डॉक्टरांना कळाल्यावर ते म्हणाले ''या बाईवर केस होऊ शकते. एवढी मोठी जबाबदारी घेण्याचे धाडस कसे केले?'' परंतु मुलाला भूनवर श्रद्धा होती. त्यामुळे अन्यत्र न जाता त्याने भूनकडूनच औषधोपचार करून घेतले. त्याच्या श्रद्धेने व भूनच्या चिकाटीने गुडघा पूर्ववत झाला.असे कितीतरी प्रसंग भूनच्या जीवनात घडले आहेत. विंचू चावला की हमखास सर्व लोक भूनकडे पळत येत. विंचू चावल्याच्या खूप वेदना व्हायच्या. भूनजवळ त्याचे औषध होते. विंचू चावलेल्या जागी ते औषध टाकून पाणी टाकले की विष जळून जाई. त्याबरोबर भून णमोकार मंत्राचे उच्चारणही मनातल्या मनात चालू ठेवत व त्याला एक पेलाभर दूध साखर घालून प्यायला देत.. आलेला माणूस ५-१० मिनिटात हसत घरी जात असे.

७-८ महिन्यात घराचे बांधकाम पूर्ण झाले. दिवाळीच्या मुहूर्तावर वास्तुशांती करून पाडव्यादिवशी नवीन घरात प्रथम महाराजांना आहारदान देऊन घर पवित्र केले. मनातील इच्छा पूर्ण झाली.

**नेमचंद बाबांचा वियोग –**

१९५८ साली डिसेंबर महिन्यातच महाराजांचा बाहुबलीहून कुंथलगिरीकडे विहार झाला. २५ दिवसात महाराज कुंथलगिरीला पोहचले.

विहारामध्ये महाराजांची राहण्याची व्यवस्था, चौक्याची व्यवस्था बरोबर आलेल्या लोकांची खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यामध्ये भून दक्ष होत्या. महाराज कुंथलगिरीला आले आहेत, हे समजताच ती. बाबांनी महाराजांच्या सहवासात राहण्याची इच्छा प्रगट केली. १५ जानेवारी १९५९ रोजी ते कुंथलगिरीस आले. महाराज व भूनच्या समागमात राहून पुढच्या भवाची शिदोरी बांधून घेतली. १५ फेब्रुवारी १९५९ रोजी पू. महाराजांचा आशीर्वाद घेऊन निघतांना डोळ्यात आसवे आणून ते म्हणाले, 'कोणास ठाऊक पुन्हा दर्शन होते की नाही? घरी गेल्यावर सर्व लहान सहानांना बोलावून त्यांना क्षमायाचना केली. उभ्या हयातीत जे कधी नतमस्तक झाले नाहीत, मोडेन पण वाकणार नाही या स्वाभिमानाने प्रत्येक आपत्तीला टक्कर देण्यात ज्यांची सारी हयात गेली ते विनम्रपणाने पोरासोरांची क्षमा मागतात हे दृश्य अंत:करण हेलावून टाकणारे होते. शेवटी परिणाम विशुद्धी वाढवून पुढच्या भवाची शिदोरी ते बांधून घेत होते. दोन दिवसापूर्वीच प्रकृती गंभीर असल्याचे समजल्यामुळे भून त्यांचे अंतिम मरण सुधारण्यासाठी उस्मानाबादला गेल्या. रात्रंदिवस णमोकार मंत्रांचे उच्चारण चालू होते. अखेर १५ मार्च १९५९ रोजी दुपारी दोन वाजता णमोकार मंत्राच्या स्मरणपूर्वक त्यांची प्राणज्योत मावळली. ८५ वर्षाच्या त्यांच्या कर्तृत्वाचा पूर्ण विराम झाला. ज्यांनी भूनना लहानपणापासून मुलीप्रमाणे जपले ते मायेचे छत्र हरपले.

**पशुपक्ष्यांची सेविका –**

आतापर्यंत भूननी शेकडो पशुपक्ष्यांची सेवा करून त्यांना जीवनदान दिले आहे. भून जशा वरून कठोर दिसतात तशा प्रसंगी लोण्याहूनही मऊ होतात. दुसऱ्यांचे दु:ख पाहून त्यांचे हृदय तत्काल द्रवते व भावनावश होऊन त्या स्वत:चे भान न ठेवता त्यांचे दु:ख दूर करण्यासाठी सर्वस्व देतात. विशेषत: पशुपक्ष्यांचे दु:ख तर त्यांना सहनच होत नाही. कित्येक पक्ष्यांची पिल्ले जन्मताच घरट्यातून खाली पडून जखमी होतात. त्या जखमी पक्ष्यांना घेऊन मुले सरळ भूनकडे येत; कारण त्यांना माहीत झाले होते की भून पक्ष्यांची खूप सेवा करतात. पक्ष्यांची जखम धुऊन स्वच्छ करणे, जखमेवर औषध लावणे, पाय वगैरे मोडला असेल तर त्यांना बँडेज बांधणे, आपल्या



मांडीवर बसवून त्यांना फळांचे रस ड्रॉपने पाजणे इत्यादी सर्व कामे भून स्वत: करीत.

मार्च १९६२ सालची घटना हृदयद्रावक आहे. बाहुबलीहून धर्मराज शास्त्री व विलास विभूते प्राथमिक शाळा शिकण्यासाठी दररोज नेज गावी जात असत. एकदा शाळेला जात असताना त्यांना झाडावरून पडून पोपटाच्या ७–८ पिलांना अपघात झाल्याचे समजले. त्यातील ३–४ पिल्ली कुत्र्यांनी खाल्ली. दोन पिल्ली ढोलीत राहिल्यामुळे वाचली होती. त्यांना ते बाहुबलीला घेऊन आले. ही गोष्ट भूनना समजली, भूननी त्यांना पाहिले तर ते नुकतेच जन्मलेले दोन मासांचे गोळे होते. त्यांना पाहताच भूनचे कोमल अंत:करण दयेने द्रवले. भूननी एका स्वतंत्र खोलीत त्यांची राहण्याची व्यवस्था केली. एवढ्या लहान पिल्लांना मातेशिवाय कसे जगवायचे हा मोठा प्रश्न होता; परंतु भूननी हा प्रश्न सोडवला. भूनच त्यांच्या माता बनल्या. ज्याप्रमाणे आई आपल्या चोचीने पिल्लांना चारा भरवते त्याप्रमाणे भूननी ड्रॉपद्वारे त्यांना एक–एक थेंब पाणी व फळांचा रस पाजला. वेळच्यावेळी त्यांना खाऊ पिऊ घातल्यामुळे पिल्ली हळूहळू मोठी होऊ लागली. प. पू. महाराजांचा निवास त्यावेळी पहाडावर होता. त्यामुळे भूनना स्वाध्याय आहारादिकासाठी वरच रहावे लागे. म्हणून त्या दोन पोपटांनाही पहाडावरच नेण्यात आले. तेथेही महाराजांच्या शेजारील खोलीमध्ये त्यांना स्वतंत्र ठेवण्यात आले. पुढे त्यांना महाराजांच्या खोलीतच एका खिडकीत ठेवण्यात आले. त्यांना गुरुदेवांचा सत्समागम मिळाल्यामुळे त्यांच्यावर सुसंस्कार होऊ लागले. स्वाध्यायाच्यावेळी महाराज काही सांगू लागले की ती त्यांच्याकडे टक लावून पाहात व एखाद्या श्रद्धाळू श्रोत्याप्रमाणे मन लावून ऐकत. प. पू. महाराज देखील त्यांना भव्य श्रोते समजून मधून मधून त्यांच्याकडे मुख करून त्यांना उद्देशून सांगत व तेही मान डोलावून एकाग्र मनाने ऐकत, जणू काही आपल्याला समजले असा भाव आणीत. प. पू. महाराजांचा आहार होईपर्यंत स्वयंपाकघराच्या दोन दरवाजावर बसून भक्ताप्रमाणे महाराजांचा आहार पाहून आनंद व्यक्त करीत. महाराजांचा आहार होईपर्यंत स्वत: खायला मागत नसत अथवा भूनला स्पर्श करीत

नसत. महाराजांचा आहार झाला की प्राणदात्री भूनच्या भोवती खाऊ मागण्यासाठी बालकाप्रमाणे घिरट्या घालीत, त्यांना दहीभात आवडत असे. दोन्ही मांडीवर दोघांना घेऊन दोन्ही हातांनी एकाचवेळेस खाऊ घालावे लागे. नाहीतर ते रूसून बसत. महाराजांच्या सामायिकाच्यावेळीही ते महाराजांच्या गुंफेवर दोन बाजूला ध्यानमग्न तटस्थ बसत. त्यामुळे जणू स्वत: ते सामायिक करीत आहेत असा भास होई. जणू काही महाराजांचे शिष्य आहेत व त्यांनी श्रावकांची व्रते स्वीकारली आहेत असे वाटे. अशा कथा आपण पुराणात ऐकतो ते येथे प्रत्यक्षात पाहावयास मिळत होते.

प. पू. महाराजांचा केशलोच चालू होता. डोक्याला राख लावून केस उपटण्याचा प्रकार पोपटांना नवीनच. त्यामुळे ते महाराजांकडे एकटक पहात होते. समोर चौरंगावर जेथे राख ठेवली होती व महाराज केस उपटून ताटात टाकत होते. त्या चौरंगाच्या दोन्ही बाजूला दोघेजण बसले होते. राख लावून केस उपटताना राख त्यांच्या डोळ्यात उडणार; परंतु त्याची पर्वा न करता राख झटकून तेथेच बसून राहिले. पू. महाराजांनी त्यांना संबोधन केले. ''मिटू राया, थोडे बाजूला व्हा, तुमच्या डोळ्यात राख उडते. विनाकारण का त्रास सहन करता?'' परंतु नकारात्मक मान डोलावून केशलोच संपेपर्यंत ते तेथेच बसून राहिले. त्या दोन जीवांचे सद्भाग्यच म्हणाले लागेल की दुर्लभ अशी साधुसंगती त्यांना या पशुपर्यायात लाभली होती. पूर्वजन्मी काहीतरी पुण्य केले असेल; परंतु मायाचार केल्यामुळे त्यांना आता पशुपर्याय प्राप्त झाली होती.

बाहेर उडण्यासाठी समर्थ झाल्यावर त्यांना स्वतंत्र सोडून देण्यात आले. तरीही ते दिवसभर फिरून रात्री परत येत. कारण त्यांना भूनचा लळा लागला होता. आपल्या उपकारकर्त्रीला ते विसरू शकत नव्हते. माणसांपेक्षा प्राण्यांमध्येच उपकाराची जाणीव अधिक असते. ते आपल्या प्राणांचे बलिदान देऊनही उपकाराची परतफेड करतात. इतिहास याला साक्षी आहे. मेवाडचा राजा राणा प्रताप यांच्या चेतक नावाच्या घोड्याने युद्धामध्ये आपल्या प्राणांची आहुती देऊन आपल्या राजाचे प्राण वाचवले होते हे सर्वांना विदित आहेच. पुढे पोपट खाण्यापुरते ठराविक वेळी येऊ लागले.



भून त्यांचा हिस्सा बाजूला काढून ठेवीत. भूननी साद घातली की कोठे असतील तेथून ते धावत येत. एकदा एका पोपटाला कावळ्यांनी जखम केली. मुले त्यांना वर भूनजवळ घेऊन आली; परंतु तो भयाने व्याकुळ झाल्यामुळे बाहेर उडाला तो पुन्हा आलाच नाही. मधून मधून समोरील झाडावर बसून गोड आवाज करी, पण खायला येण्याचे मात्र त्याने सोडून दिले.

दुसरा पोपट दिवसातून दोनदा येऊन जाई. काही दिवसांनी महाराज खाली राहायला आल्यामुळे भूनही खालीच आल्या. त्याला ही गोष्ट माहीत नसल्यामुळे नेहमीप्रमाणे तो दाराजवळ येऊन चोचीने दार उघडण्याचा प्रयत्न करी. हे समजल्यावर भूननी त्यास साद घालून बोलावले. भूनचा आवाज ऐकताच तो खाली आला व येथेही रोज आपली हजेरी लावू लागला. एकदा तो चारच्या सुमारास कुठून तरी थकून भागून आला. टपून बसलेल्या मांजराने त्याच्यावर अचानक झडप घातली. पोपट किंचाळला. त्याचे हृदय पिळवटणारे किंचाळणे ऐकून जवळपासचे लोक धावून आले व त्यांनी मांजराच्या तावडीतून त्यास वाचवले. मांजर पोपटाला चावा घेऊन भीतीने पळाले.

भूनना हे कळताच त्या पोपटाजवळ धावत आल्या. पोपट भीतीने भेदरला होता. त्यांनी सर्वांना बाहेर घालवून एकट्याच पोपटाजवळ जाऊन त्यास म्हणाल्या 'मिट्टू, आता भिऊ नको. येथे मी एकटीच आहे. भूनचा आवाज ऐकताक्षणीच तो शांत झाला. पुन्हा भूननी विचारले. 'मिट्टू, तुला मांजराने कुठे चावा घेतला आहे? किती लागले आहे ते दाखव पाहू.'' असे विचारताच त्यांनी आपले पंख वर उचलून दोन्ही बाजूस झालेली जखम दाखवली. भूननी त्याच्या जखमेवर औषध लावले. रात्रभर भून पोपटाजवळ बसून त्याची शुश्रूषा करीत होत्या. पण पोपटाची जखम खोल असल्यामुळे बरी होणे कठिणच होते. त्याची अस्वस्थता वाढतच होती. महाराजांचा आदल्या दिवशी उपवास असल्यामुळे महाराज आहाराला लवकरच उठले होते. महाराजांचा आहार होईपर्यंत पोपटास काही होऊ नये असे सर्वांना

वाटत होते. महाराजांचा आहार निर्विघ्न पार पडला. आहारानंतर महाराज पोपटाजवळ आले. पोपट एकसारखा त्यांच्याकडे दृष्टी लावून पहात होता. महाराजांना त्याची केविलवाणी अवस्था पाहून खूप दया आली. त्याच्याजवळ जाऊन ते म्हणाले. 'मिट्टू, धीर धरा, शांती ठेवा, घाबरू नका, तुम्ही बरे व्हाल' पोपट एकसारखा टक लावून पहात होता. त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. महाराजांचे दर्शन झाल्यामुळे त्याला अतिशय समाधान वाटत होते. त्याची अवस्था पाहून महाराजांनी त्याच्या कानात णमोकार मंत्र सांगण्यास सुरवात केली. ७-८ वेळा णमोकार मंत्र दिला असेल तोच पोपटाचे प्राण निघून गेले. त्याला देवगती प्राप्त झाली असणार यात शंका नाही. कारण मरताना मनुष्यालाही दुर्लभ दिगंबर संतांच्या मुखातून णमोकार मंत्र ऐकण्याचे सौभाग्य त्याला लाभले होते.

भूनना अतिशय दु:ख झाले. सहजच त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. आपला एक साधर्मी बंधू निघून गेल्याचा त्यांना भास झाला. त्या पोपटाची घटना सांगताना आजही भूनच्या डोळ्यात आसवे उभे राहतात. त्याच्या स्मरणार्थ भूननी त्यावेळी संस्थेला १५१ रूपयाचे दान दिले.

दुसरी एक घटना अशी घडली की, आश्रमातील एका गाईने वासराला जन्म देताच आपले प्राण सोडले. वासरू आईविना पोरके झाले. भूननी त्या वासराला मातेची ममता दिली. त्याला आपल्या घरात ठेवून घेऊन त्याचे व्यवस्थित पालनपोषण केले. भून बाळाला दूध पाजायच्या बाटलीने त्यास दूध पाजवीत. त्याला एका स्वतंत्र खोलीत ठेवून बसायला पोते वगैरे ठेवून उत्तम व्यवस्था केली. ते वासरूसुद्धा भूनशिवाय कोणालाही हात लावू देत नसे. तिचे नाव ठेवले चंदा. ती मोठी होऊन आश्रमात स्वैरपणे बागडू लागली व पुढे दूध देऊन तिने भूनच्या उपकाराची परतफेड केली.

१९९१ सालीही नुकतीच जन्मलेली पोपटांची दोन पिल्ली भूनना मुलांनी आणून दिली. त्यांचे पाय फ्रॅक्चर झाले होते. भूननी त्यांच्या पायाला बँडेज बांधले व त्यांना द्राक्षे, आंबा, डाळिंब इत्यादी फळांचा रस ड्रॉपने पाजला. भूननी सुताराकडून दोन पिंजरे करून घेतले. जोपर्यंत त्यांना चालता



फिरता येत नाही तोपर्यंत त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना पिंजऱ्यात ठेवले जाई. त्यांना उडता येऊ लागले की त्यांना खोलीत सोडले जाई. ते दोन पोपट फळांचे रस पिऊन चांगले धष्ट पुष्ट झाले व एका महिन्यात त्यांना उडता येऊ लागले. खोलीत त्यांना आम्ही उडवत असू. भूननी विचार केला अजून थोडे चांगले उडता येऊ लागले की त्यांना मुक्तपणे बाहेर सोडून देऊ; परंतु एके दिवशी बाहेरचे दार उघडे राहिले होते तेव्हा त्यातील एक पोपट भुर्कन उडून गेला. एकच पोपट शिल्लक राहिला. त्यानेही सत्याग्रह सुरू केला. काही मेवा मिठाई दिली तरी तो स्पर्शही करेना. दोन दिवसापर्यंत त्याने उपोषण केले. त्याला उडता आले नाही तर दुसरे पक्षी इजा करतील अशी भीती वाटत होती म्हणून आम्ही सोडत नव्हतो. अखेर त्याच्या उपोषणाने हार मानून त्याला बाहेर अंगणात ठेवले तरी तो उडेना. शेवटी चम्पापुरी क्षेत्राजवळ त्याला नेले. तेथे अन्य ७-८ पोपटांनी येऊन त्याला साद घातली. तेव्हा तो पोपट त्यांच्याबरोबर उडून गेला. तेव्हा लक्षात आले की प्राण्यांची जातसुद्धा किती हुशार आहे! त्यागाशिवाय मुक्ती नाही हा सिद्धान्त जाणला म्हणून त्यांनी आपल्या मुक्ततेसाठी उपोषण केले. दुसरे असे की दुसऱ्यांनी आदरांनी बोलाविल्याशिवाय आपण त्यांच्याकडे जाऊ नये म्हणून दुसऱ्या पोपटांनी बोलाविल्याशिवाय तो पोपट गेला नाही. अशा कित्येक पशूंना भूननी जीवनदान दिले आहे.

आम्ही भूनला नेहमी म्हणत असतो पुढच्या जन्मी तुमच्यावर कोणतेही संकट आले तर हे स्वर्गात गेलेले पशुपक्षी नक्कीच तुम्हाला मदत करायला येतील.

दुसरा एक पोपट, भूननी सेवा करून बरा केलेला, रोज भूनच्या खोलीत येऊन बसत असे व एकीभाव स्तोत्र ऐकल्याशिवाय परत जात नसे. भून नेहमी म्हणतात 'माणसांची सेवा कोणीही करेल; परंतु मुक्या प्राण्यांची सेवा कोण करणार? त्यांना कोण वाली आहे?' अशा कित्येक घटना भूनच्या जीवनात घडल्या आहेत. (क्रमश:)

**आयुर्वेदपारंगत भून --**

भूनना आयुर्वेद व निसर्गोपचाराचे ज्ञान उपजतच आहे. रोगी मनुष्य समोर आला की त्या रोगावरील औषध त्यांना चटकन सुचत असे. त्यांचे पाहून आपण शिकावे म्हटले तर शक्य नाही? कारण प्रत्येक वेळी त्यांना वेगळेच औषध सुचते व त्या औषधाने रोगही बरा होतो. मुडदूस रोगावर तर त्यांच्याकडे रामबाण औषध आहे. कित्येक पालक आपल्या लहान रोगी बालकांना घेऊन येतात. मुलाचे वय २-३ वर्षाचे, पण तो आजारामुळे ६ महिन्याच्या बाळाप्रमाणे दिसायचा. हात, पाय, अत्यंत बारीक वाळलेले असायचे. भून त्यांच्याकडून विड्याचे पान मागवून त्यात औषध घालून मंत्रोच्चार करून देतात. बाळाच्या आईने तो विडा खाऊन बाळाच्या पाठीवर थुंकून पाठीवरून फिरवून त्याच्यावर शेणाने सारवले की रोगजंतू बाहेर पडतात. ते जंतू न मारता त्यांना पकडून सुरक्षित ठिकाणी सोडण्यास भून सांगत. अशारीतीने २-३ वेळा केल्यावर बाळ निरोगी होऊन सुदृढ होते. मराठा, मुसलमान, हरिजन सर्व जातीचे लोक भूनकडे येतात. प्रथम मांस त्यागाचा नियम देऊनच भून त्यांना औषध देतात. १५-२० दिवसात आई वडील सुधारलेल्या बाळाला घेऊन येतात व भूनचे परम उपकार मानून दुवा देत निघून जातात.

प. पू. महाराज व आदरणीय भूनच्या निरामय दीर्घायुष्याचे रहस्य, पूर्व भवामध्ये विशुद्ध परिणामांनी दीर्घ आयुकर्माचा बंध झाला होता हे तर नियामक कारण आहेच; परंतु त्याला नोकर्मरूप बाह्य निमित्ताच्या अपेक्षेने सुखसारक व लंघन या दोन गोष्टींच्या सेवनात आहे. भून याचे महत्त्व पटवून देतांना सांगतात, ज्याप्रमाणे खोलीमध्ये कचरा साठला असेल तर तो नष्ट करण्यासाठी दोन गोष्टी कराव्या लागतात. एक नवीन कचरा येऊ नये म्हणून दरवाजा, खिडक्या बंद करून घेणे व दुसरे साठलेला कचरा झाडून बाहेर काढणे. त्यामुळे घर स्वच्छ साफ होते व आनंद मिळतो. त्याचप्रमाणे या शरीररूपी घरामध्ये अनावश्यक मळ साठतो त्यामुळे रोग उत्पन्न होतो. त्या रोगाला दूर करण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक १) नवीन मल उत्पन्न होऊ नये म्हणून तोंडरूपी दरवाजा बंद ठेवावा म्हणजेच लंघन करावे. २) जो शरीरामध्ये मल संचय झाला आहे तो काढून टाकण्यासाठी सुखसारक घेऊन पोट साफ करावे. भून स्वत: महिन्यातून एक वेळा पोट साफ करतात व पू. महाराजांना ही वरचेवर सुखसारक देत असत. कोणीही आजारी मनुष्य भूनजवळ आला की भून त्यास प्रथम सुखसारक देतात. ते घेतल्यावर त्याचा अर्धा आजार बरा होतो. खोकला सर्दीसाठी काढा, लेंढी पिंपळी वगैरे देतात. पुष्कळजण सुखसारक घ्यायला नको म्हणून आजारी असल्यावर भूनपासून लांब राहतात. कारण भूनना समजले की भून सुखसारक पाजविल्याशिवाय रहाणार नाहीत.

अंगातील रक्त कमी होऊन ओठ वगैरे पांढरे पडले असतील तर भूनजवळ ताकातले औषध आहे. त्यासाठी पथ्य खूप आहे. ताकावरच १४-१४ दिवस रहावे लागते व हे औषध भून स्वत:च्या देखरेखीखाली देतात. त्यामुळे चौदा दिवसात पिचकारीने रक्त चढविल्याप्रमाणे ओठ लालबुंद होतात. भूनच्या बंगल्यात दोन मोठी कपाटे औषधाने भरलेली आहेत. भूनला सेवेचा कधी कंटाळा नाही. दिवस असो, रात्र असो. रोगी आला की त्याची सेवा करायला भून तयार. १९७० सालची घटना असेल. खेड्यातील एक गृहस्थ रात्री ११ वाजता भूनकडे आला व आपली पत्नी जळाल्याचे त्यांनी सांगितले, भून ताबडतोब गाडी घेऊन त्याच्याबरोबर गेल्या. ती महिला वेदनेनी तडफडत होती. भूननी आयुर्वेदिक मलम तयार केले व तिच्या सर्व अंगाला लावले. रात्रभर तिची सेवाशुश्रूषा केली. तिला थोडे बरे वाटल्यावर भून पहाटे परत आल्या. भूननी कधी आपल्या जीवनास समयाच्या नियमामध्ये बांधून ठेवले नाही. भूनचा दवाखाना २४ तास उघडा असतो. अलिकडे ७-८ वर्षातच विस्मृतीमुळे जवळजवळ सर्व बंद झाले आहे.

भून नवीन कोणी काही औषध सांगितले की ते चटकन ग्रहण करून त्याचा प्रयोग करून पहात असत. महाराजांना काही ताप वगैरे आजार झाला की भून लगेच औषध तयार करून देणार व सांगलीच्या कुलकर्णी वैद्यांनाही

बोलावयाला पाठवणार. वैद्य आल्यावर महाराजांना तपासून भूननी दिलेली औषधे पाहिली की वैद्य म्हणणार 'बेन, तुम्ही दिलेली औषधे अगदी योग्य आहेत.' पुन्हा नवीन काही औषध देणे आवश्यक असेल तर तसे सांगून जात होते.

**भगवान बाहुबली महामूर्तीचा प्रतिष्ठा महोत्सव –**

१९५४ साली प. पू. चा. च. १०८ आचार्यश्री शांतिसाग महाराजांच्या भावनेला अनुसरून बाहुबली क्षेत्रावर बृहन्मूर्ती उभी करण्याचा शब्द संस्थेच्या कार्यकर्त्यांनी दिला. त्यावेळी एवढ्या मोठ्या कामासाठी इतके परिश्रम घ्यावे लागतील किंवा समाज इतक्या प्रेमाने आपले सहस्त्रावधी हात येथपर्यंत पोहोचवेल, अडचणीतून मार्ग काढतांना लागणारा वेळ व विलंब पाहून तग धरील व उत्साह वाढता ठेवील अशी कुणालाही अपेक्षा नव्हती. पण कार्य व्हावयाचे असले म्हणजे योग जुळून येतात. त्यातलाच ह महान योग जुळून आला. माघ शुद्ध ७ दि.३१-१-१९६३ ते माघ शु.१ दि.८-२-१९६३ हा भगवान बाहुबली महामूर्तीच्या प्रतिष्ठा महोत्सवासाठी शुभमुहूर्त ९ महिने अगोदर निश्चित झाला. त्या वेळेपासून कामाचा डोंग दृष्टीपुढे उभा राहिला. अद्यापि मूर्तीची बैठक, कमलासन, चबुतरे, पायऱ्या कोट, दिंडी दरवाजा, वरची गोपुरे, अशी कितीतरी कामे अपुरीच होती.

सांगलीचे ध. श्री. भीमगोंडा पाटील व त्यांची धर्मपत्नी वरचेवर प. पू. महाराजांच्या दर्शनासाठी व आहारदान करण्यासाठी येत असत. भूनव त्यांची अपार श्रद्धा व जिव्हाळा होता. एकदा सहज दर्शनाला आल्याव भूननी त्यांना सहज शब्द टाकला. ''अण्णा, आपल्यातर्फे कमलासन मूर्तीच्या सभोवती मारबलचे कठडे व्हावेत असे आम्हाला वाटते.'' अण्ण म्हणाले 'त्यासाठी किती खर्च येईल?' भून म्हणाल्या, ''फक्त ३५०० रू.'' अण्णांनी लगेच होकार दिला. ही गोष्ट त्यांच्या चिरंजीवाला कळाल त्यांनी बाहुबलीला येऊन भूनना नमस्कार करून विचारले. ''भून, तुम आमच्या वडिलांवर काय जादू केली? १५ पैशाचा चहा पाजून त्यांच्याकड



३५००० रू. उकळले. ५ पैसे खर्च करण्यासाठी विचार करणारे वडील एवढे उदार कसे काय झाले? याचेच आम्हाला आश्चर्य वाटते. खरच, तुम्हाला मानले पाहिजे.'' अशाप्रकारे एका-एका दाताराला भेटून भूननी दान काढले.

प्रतिष्ठा होणार असा घोषा सर्व समाजामध्ये सतत सुरू असल्यामुळे लाखाहून अधिकच लोक गोळा होतील असा अंदाज होता. त्या मानाने तयारी करणे व पैसा गोळा होणे जरूरीचे होते. लोकवस्तीपासून दूर असलेल्या या जंगलात एक-दीड लाख लोकांच्या निवासाची, अन्न पाण्याची, प्रकाशाची, सांड पाण्याची, स्वच्छतेची सोय करायची म्हणजे एक दिव्यच! हा समारंभ एकट्या दुकट्याने पार पडणार नव्हता. यासाठी अनेक सहकारी कार्यकर्त्यांची गरज होती. प. पू. महाराजांच्या प्रेरणेने अनेक प्रतिष्ठित कार्यकर्ते धाऊन आले. मिटिंग घेऊन एक-एक काम वाटून देण्यात आले.

प्रमुख प्रतिष्ठित पाहुण्यांच्या भोजनाची व्यवस्था भूनकडे होती. ती त्यांनी स्वतःहून स्वीकारली होती. भूनचे नवीन स्वतंत्र घर तयार झालेच होते. त्याच्या पाठीमागे मंडप घालून भोजनाची व्यवस्था केली होती. भूनची तयारी म्हणजे सर्व शाहीथाट असायचा. सोलापूर, कारंजा इत्यादी ठिकाणाहून संबंधित महिलांना बोलावून जय्यत तयारी भूननी ठेवली होती. १५०० झोपड्या व तंबू घालून यात्रेकरूंच्या निवासाची म्हणजेच 'पोदनपुरीची' रचना करण्यात आली. 'आहारदान देऊ इच्छिणाऱ्यांसाठी मंदिराजवळच्या परिसरात खास ' श्रेयांसपुरीची' स्वतंत्र रचना करण्यात आली होती. तसेच 'अयोध्यापुरी' 'भरतेशपुरी' आदी विभाग निर्माण करून त्यातूनही आहारदानाची व्यवस्था ठेवण्यात आली. या सर्व विभागात विद्युत प्रकाशाची सोयही उत्तम करण्यात आली होती. पहाडावरून पाहिल्यावर बाहुबलीमध्ये जणू स्वर्गपुरी पृथ्वीतलावर अवतरली आहे असा भास होत होता.

प्रतिष्ठेचा सुमंगलमय दिन उजाडला. लाखो भाविकांची बाहुबली क्षेत्रावर गर्दी उसळली. येणारे पाहुणे मंडळी, आपापसात बोलायचे ''आम्ही अनेक यात्रा व उत्सव पाहिले; परंतु अशी व्यवस्था, स्वच्छता, जेवणाची सोय अन्यत्र कोठेच पाहिली नाही.'' ५ फेब्रुवारी १९६३ रोजी बाहुबली संस्थेचा रौप्य महोत्सव ही संपन्न झाला. त्या रौप्यमहोत्सवाचे उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. दादासाहेब कन्नमवार होते. या महोत्सवप्रसंगी 'भारतीय ज्ञानपीठ' संस्थेचे संस्थापक भारतातील उच्चकोटीचे उद्योगपती श्रीमान सेठ साहू शांतिप्रसादजी व त्यांच्या धर्मपत्नी विदुषीरत्न श्रीमती सौ रमाराणी हे सन्माननीय पाहुणे लाभले होते. ते उभयता या समारोहप्रसंगी आले असता संस्थेच्या कार्यकर्त्यांकडून त्यांचा यथोचित आदर केला गेला नाही. व्यवस्थेमध्येसुद्धा कुचराई झाली. थोडा अविनयाचाच प्रकार घडला. त्यामुळे साहूजी महोत्सव सोडून पन्हाळ्याला निघून गेले. सर्व कार्यकर्त्यांमध्ये चिन्तेचे वातावरण झाले. एवढ्या मोठ्या उत्साहाला हे गालबोट लागले असे वाटू लागले. आता काय करावे कुणालाही कळेना. रात्री भून उठल्या, संस्थेची गाडी बाहेर काढायला लावली व संस्थेचे अध्यक्ष वालचंद देवचंद यांना म्हणाल्या, ''चला गाडीत बसा. पाहुण्यांची क्षमा मागून केलेल्या चुकीचे प्रायश्चित घेऊ व पाहुण्यांना घेऊन येऊ.'' काही न बोलता वालचंद देवचंद गाडीत बसले. भून व भीसीकर गुरुजीही गाडीत बसले व सरळ पन्हाळ्याला गेले. पाहुण्यांना विनम्र अभिवादन करून घडलेल्या प्रसंगाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. भूनने पाहुण्यांची समजूत घातली व त्यांची क्षमा मागितली. भून व भीसीकर गुरुजींसारखे ब्रह्मचारी आपली येऊन क्षमा मागतात हे पाहून पाहुण्यांनाही लाज वाटली. आपलेही काहीतरी चुकले याची त्यांना जाणीव झाली व त्यांनीही आपल्यामुळे झालेल्या त्रासाची क्षमा मागितली. पाहुणे बाहुबलीला आले त्यामुळे रौप्यमहोत्सव सानंद संपन्न झाला. नाहीतर सर्वत्र निराशेची छटा पसरली होती. अशाप्रकारे भूनने नेहमी सुई दोऱ्याप्रमाणे जोडण्याचे कार्य केले आहे .



कधी कात्रीचे काम केले नाही. योग्यवेळी तातडीने योग्य निर्णय घेण्याची भूनमध्ये कुवत होती.

**पूज्य महाराजांसह कारंजाकडे विहार–**

मुनिदीक्षा संपन्न झाल्यावर प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराजांनी एकदा विदर्भात कारंजाकडे विहार करावा ही तेथील धर्मप्रेमी भक्तजणांची खूप दिवसापासूनची तीव्र इच्छा होती; परंतु बाहुबली येथील महामूर्तीच्या स्थापना, प्रतिष्ठादी कार्यविशेषामुळे हा सुयोग घडून आला नव्हता. कारंजा ही गुरुदेवांची पहिली कर्मभूमी, भूननीही प्रथम १६ वर्षे तेथेच ज्ञानसाधना केली होती. म्हणून तेथील लोकांची दोघांवर अपार भक्ती व श्रद्धा होती. स्व. प्रद्युम्नसावजी यांच्या थोर दातृत्वातून त्यांनी मरतेसमयी प्रगट केलेल्या इच्छेनुसार महावीर ब्रह्मचर्याश्रम कारंजा येथे एका स्वतंत्र भव्य जिनमंदिराची निर्मिती करण्यात आली व त्यात पाच फूट उंच संगमरवरी पीतवर्णी मनोज्ञ दोन जिनबिंबांची स्थापना करण्याचे योजिले होते. या मंगलसमयी प. पू. गुरुदेवांचे शुभागमन व्हावे अशी तेथील सर्वांची स्वाभाविक इच्छा. त्यामुळे २६ ऑक्टोबर १९६३ रोजी दुपारी मंगल मुहूर्तावर बाहुबलीहून महाराजांनी प्रस्थान केले. प्रस्थानसमयी उपस्थित गुरुकुलवासी व अन्य भक्तगणांची अंत:करणे गुरुदेवांच्या दर्शनाचा लाभ दुरावणार या विचाराने गहिवरून आली होती. साश्रू नयनांनी सर्वांनी गुरुदेवांना निरोप दिला.

हातकणंगले, तमदलगे, जयसिंगपूर, मिरज, आष्टी, कुर्डवाडीमार्गे विहार होऊन १८-११-१९६३ रोजी पू. गुरुदेव कुंथलगिरीस पोहचले. विहारामध्ये भूनची व्यवस्था पाहून सर्वजण थक्क होत होते. कारंजाची मंडळी महाराजांना नेण्यासाठी आली होती; परंतु भूनच्या मार्गदर्शनानेच सर्व व्यवस्था होत असे. महाराजांना मुक्काम करण्याची जागा पाहून येणे, चौक्याची व्यवस्था करणे, सोबत आलेल्या लोकांची व्यवस्था करणे सर्व नियोजनबद्ध शिस्तबद्ध होत होते. गुरुदेवांची देहयष्टी अत्यंत नाजूक व त्वचा अत्यंत मुलायम असल्यामुळे विहारात त्यांच्या पायांना जखमा होत असत; परंतु त्यांना योग्य औषधोपचार करून भून त्यांच्या प्रकृतीची अत्यंत काळजी

घेत. मार्गात प्रत्येक ठिकाणी जैन अजैन जनता आदराने सामोरी येऊन स्वागत करीत होती व गुरुदेवांचा उपदेश ऐकून यथाशक्य नियम व्रते ग्रहण करीत होती. कुंथलगिरीला ४ दिवस मुक्काम करून पुढे बीड-जालना-देऊळगाव मार्गे विहार करीत १७-१२-१९६३ रोजी सकाळी कारंजास सर्व संघ सुखरूप पोहोचला. देऊळगावराजा येथे आर्यनंदी महाराजही येऊन मिळाले होते. कारंजाजवळ प. पू. गुरुदेव आले त्यावेळी नगरवासी जनता, आश्रमीय विद्यार्थी व कार्यकर्तागण ४ मैल पुढे सामोरे गेले होते. कित्येक वर्षानंतर सर्वांना त्यांचे दर्शन घडत होते. त्या प्रसंगाचा आनंद शब्दातीत होता. जय जयकार ध्वनीने आसमंत दुमदुमून गेला होता.

श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम गुरुकुल संस्थेमध्ये दि.२०-१-१९६४ ते दि.२७-१-१९६४ अखेर पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव उत्साहाने सानंद संपन्न झाला. प. पू. गुरुदेवांच्या उपस्थितीमुळे सर्वांचा उत्साह अगणित होता व उत्सवाला एक ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले होते. या महोत्सवाच्या प्रसंगी क्षुल्लक महाबल महाराजांनी प. पू. गुरुदेवांच्या करकमले दि. २६ रोजी भगवती जिनदीक्षा ग्रहण करून आपले जीवन कृतार्थ केले. ते कर्नाटकातील खवटखोप येथील कुलीन घराण्यातील असून स्वभावाने अत्यंत ऋजू व शांत परिणामी होते.

**कंकुबाई श्राविकाश्रमाच्या विकासामध्ये हातभार –**

कंकुबाई श्राविकाश्रमामध्ये १९४१ पासून प्रायमरी विभाग चालू केला होता. तसेच १९४४ मध्ये पूर्व माध्यमिक (५ वी ते ८ वी) विभागाचे चार वर्ग खाजगी स्वरूपामध्ये चालू करण्यात आले होते. १९५८ साली या विभागाला सरकारमान्यता घेण्यात आली. १९४४ –१९६४ पर्यंत वीस वर्षे संस्थेचा विकास माध्यमिक विभागापर्यंत कुंठित व्हावा, त्याची पुढे काहीच प्रगती दिसत नसल्यामुळे सर्वच कार्यकर्ते व हितैषी असमाधानी होते. भूनना १५-१६ वर्षे कारंजा येथे राहिल्यामुळे स्त्रियांच्या सुखदु:खाची, स्त्रीमनाची पुरेपूर कल्पना होती. छोट्या मोठ्या कारणाने स्त्रीशिक्षणाचा हा असा वर्षोगणती चालू असलेला कोंडमारा त्यांच्या विचक्षण बुद्धीला असह्य



झाला. त्यांच्या कार्यसाधिका प्रतिभेने पू. समंतभद्र महाराजांच्या शुभागमनाच्या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे ठरविले. त्यांनी सर्वांपुढे आग्रह धरला की मुलींसाठी पुढील शिक्षणवर्ग ही चालू करण्यात यावेत. त्यांनी केवळ आग्रह धरला नाही तर या पूर्ततेला बाधक असे सर्व अडचणींचे डोंगर पार करून तत्परतेने सर्वच साधनांची त्यांनी जुळवाजुळव केली. किमानपक्षी मॅट्रिकपर्यंत स्त्रियांच्या स्वतंत्र शिक्षणाची पूर्ण सोय व्हावी हे हितावह असल्याने प. पू. गुरुदेवांनाही तो विचार पटला. त्यांनी तो उचलून धरला आणि सर्व संस्थाप्रेमींनी सक्रिय सहयोग देण्याचे मंजूर केले. हायस्कूलच्या वर्गांचे बांधकाम करण्यासाठी लागणारी राशीही भूननी दानरूपाने विलक्षण प्रकारे गोळा केली. कारंजातील महिलामंडळापुढे भूननी हा प्रस्ताव मांडला. महिलांचा भूनवर जबरदस्त विश्वास व श्रद्धा होती. पूर्वी महिला काही स्वतंत्रपणे नोकरी करून मिळवायला जात नव्हत्या. घरी खर्चासाठी दिलेल्या रकमेपैकी काही रक्कम शिल्लक राहते ती त्या आपल्या वेळप्रसंगी आधार म्हणून ठेवत असत. त्या राखून ठेवलेल्या पैशातून प्रत्येक महिलांनी शक्ती अनुसार १००० रू. ५०० रू. देऊन भूनच्या संकल्पाची पूर्ती होण्यासाठी मदत केली. हायस्कूल उभे राहिले. श्री. गोसावी गुरुजींनी हायस्कूलसाठी परवानगी प्राप्त करणे, सरकारमान्यता व अनुदान मिळविणे मुलींच्या पालकांना भरती होण्यास प्रेरित करणे इ. सर्व कामे उत्साहाने केली. २०-६-१९६४ रोजी हायस्कूल विभागाचे उद्घाटन विद्वद्वर्य पं. फूलचंद्रजी यांच्या हस्ते झाले. कोणतेही काम हाती घेतले की ते पूर्णत्वास नेणे हे भूनचे खास वैशिष्ट्य आहे.

हा हा म्हणता दोन वर्षे लोटली. त्यानंतर पुन्हा बाहुबलीकडे येण्यासाठी पू. महाराजांचा १२-१२-१९६५ रोजी कारंजाहून पुण्यविहार सुरू झाला. कुंभोज, नेज, कबनूर, नांद्रे इत्यादी ठिकाणची प्रमुख मंडळी विहारात सहभागी होण्यास गेली होती. श्री अतिशय क्षेत्र अंतरिक्ष पार्श्वनाथ येथील वंदना करून देऊळगाव, जालना, औरंगाबादमार्गे दि.६-१-१९६६ रोजी एलोरा येथील श्री पार्श्वनाथ गुरुकुलात पू. समंतभद्र महाराजांचे

शुभागमन झाले. संस्थास्थापनेपासून गुरुदेवांचे हे प्रथमच आगमन होत असल्याने सर्वजण हर्षभराने पुलकित झाले होते. सुमारे २० दिवस संस्थेत त्यांचे वास्तव्य होते. दि. २६ जानेवारी १९६६ रोजी गुरुदेवांचा बाहुबलीकडे विहार सुरू झाला. वाटेत सिद्धक्षेत्र कुंथलगिरीची वंदना करून दि. १९-२-१९६६ रोजी बाहुबली येथे शुभागमन झाले. सुमारे सव्वा दोन वर्षानंतर प. पू. गुरुदेवांचे या भागात शुभागमन झाल्यामुळे सर्वांची अंत:करणे आनंदातिशयाने भरून आली. या सर्व विहारात भूननी जे कष्ट केले त्याला मोल नाही. त्यांच्याशिवाय हा विहार सुखपूर्वक पार पडणे अशक्यच होते.

**एक नवी आपत्ती –**

विवाहानंतर भूननी संसारापासून विरक्त होऊन आपल्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त केला; परंतु ज्यांच्याशी भूनचा नाममात्र विवाहसंबंध झाला होता ते वालचंद शहा मुरुमकर एकाकी असल्यामुळे त्यांच्या आत्या सौ. नवलबाई वालचंद गुंजोटीकर यांच्याकडे वास्तव्य करू लागले. तेथे त्यांच्याकडून इस्टेट मिळविण्यासाठी त्यांचा खूप छळ होऊ लागला. इतका छळ होऊनसुद्धा त्या बहाद्दराने शेवटपर्यंत सही काही करून दिली नाही; परंतु या त्रासामुळे त्यांचे मानसिक संतुलन अधिक बिघडले. २५० एकर काळीभोर सुपीक जमीन कुळकायद्याखाली गडप होऊ लागली. विवाहानंतर भूनचे नाव मुरुमच्या ग्रामपंचायतीमध्ये लागले होते. नेमचंदबाबा व फूलचंद मामा वकील असल्यामुळे त्यांना सर्व कायद्याचे ज्ञान होतेच. त्यातील थोडी बहुत जरी इस्टेट गजाबाईला मिळाली तरी त्यांच्या जीवनाचा प्रश्न सुटेल म्हणून त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. भून विवाहानंतर कधीच मुरुमला गेल्या नव्हत्या; परंतु एकदा या कामानिमित्त सही करण्यासाठी त्यांना तेथे जाण्याचा प्रसंग आला. त्यांना पाहण्यासाठी गावातील सर्व मंडळी एकत्र जमली. 'एवढ्या मोठ्या इस्टेटीचा मोह सोडून जिने संसाराचा त्याग केला ती बाई आहे तरी कोण पाहू या' या हेतूने सर्वजण गोळा झाले. पुष्कळ खटपट केल्यानंतर अत्यंत अल्प रक्कम भूनना प्राप्त झाली. तेवढाच त्यांना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी आधार मिळाला.



पहिल्यापासून संस्थेतून स्वत:साठी नवा पैसासुद्धा न घेता अत्यंत कमी खर्चात स्वावलंबनानेच जीवन यापन केले होते; परंतु यामुळे भूनवर दुसरीच आपत्ती ओढवली. भूनना इस्टेट प्राप्त झालेली समजताच नवलबाईंनी वालचंद मुरुमकरांच्या खर्चासाठी दरमहा १०० रू. देण्यासाठी फूलचंद मामांच्या पाठीमागे तगादा लावला व आतापावेतो पोटगीची थकबाकीसुद्धा द्यावी म्हणून आग्रह धरला. शेवटी एप्रिल १९६५ ला त्यांनी फूलचंद मामांना निरोप पाठविला की 'तुम्ही वालचंद मुरुमकरांच्या खर्चाकरिता पोटगी देत नसाल तर आम्ही त्यांना सांभाळण्यास तयार नाही. आम्ही त्यांना बाहुबली येथे गजाबाईच्या बंगल्यावर नेऊन सोडू. आता आम्हाला तुमचा पैसा ही नको व वालचंदही नको. ही बातमी ऐकताच फुलामामांना मोठा धक्का बसला. त्यांनी भूनना ही गोष्ट सूचित केली. अखेर दि. २०-८-१९६५ रोजी एका मनुष्याबरोबर वालचंद भैय्यांना बाहुबलीस पाठवून दिले. तो मनुष्य त्यांना भूनच्या बंगल्याजवळ सोडून परत निघून गेला. भूनच्या पुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. वालचंदना सांभाळावे की सोडावे? सोडून दिले तर या जीवाचे कसे व्हायचे? एकाकी असल्यामुळे त्यांना कोण सांभाळणार? सांभाळावे तर त्यांना कोठे ठेवायचे? संस्थेवर तर हा भार लादणे योग्य नाही. शेवटी सदसद्‌विवेकबुद्धीने विचार केला की 'कितीतरी अनाथ महिला व पुरुषांना अभयदान देऊन आपण त्यांचे कल्याण केले आहे. हा सुद्धा एकाकी व असहाय जीव आहे. शिवाय त्याच्या जीवावरच आपणसुद्धा स्वावलंबनाने जगत आहोत' त्यांचे हे उपकार मानून त्यांना ठेवून घेण्याचा निर्णय घेतला. एका धर्मबंधुत्वाच्या नात्याने आपल्या बंगल्यामध्ये पाठीमागील एका स्वतंत्र खोलीत ठेवून त्यांची उत्तम व्यवस्था केली. मिरजेला नेऊन त्यांच्या मूळव्याधीचे व दोन्ही डोळ्यांच्या मोतीबिंदूचे सुद्धा ऑपरेशन केले. नवलबाईंना वाटले, गजाबाई काय त्यांची व्यवस्था करणार? संस्थेत ठेवून दिले असेल? म्हणून एकदा खास पाहण्यासाठी त्या आल्या होत्या; परंतु भूननी केलेली व्यवस्था पाहून आश्चर्यचकित झाल्या व तुमच्याबद्दल आमचा गैरसमज होता. खरच तुम्ही मनाने मोठ्या आहात, असे म्हणून भूनची क्षमा

मागून गेल्या.

पुढे २० वर्षांनी वालचंद भैय्यांचे त्या खोलीतच शांतपणे देहावसान झाले. येथे आल्यामुळे निदान शेवटचे त्यांचे आयुष्यतरी त्रासाशिवाय समाधानाने व्यतीत झाले. भैय्यांच्या जीवनावरून पुण्यपापाची विचित्र लीला लक्षात येते. कोठे पुण्याच्या उदयाने संपन्न घरामध्ये जन्म, रूप सौंदर्य, प्रचुर बुद्धिमत्ता, घराण्याचा एकुलता एक दीपक; परंतु पापाच्या उदयाने सर्व निरुपयोगी झाले. संपत्तीचा भोग घेऊ शकले नाहीत, पत्नीने सोडल्यामुळे रूपसौन्दर्य निरर्थक झाले, मनावरचा समतोल बिघडल्यामुळे बुद्धी भ्रमिष्ट झाली. म्हणूनच दौलतरामजी म्हणतात –

पुण्यपाप फलमांही, हरख विलखो मत भाई।<br>
यह पुद्‌गल परजाय उपजि विनसै फिर थाई।

शेवटी पुन्हा पुण्याचा उदय आल्यामुळे बाहुबलीसारख्या पवित्र तीर्थक्षेत्री मंगल वास्तव्य करण्याची संधी मिळाली.

**फूलचंद मामांचे देहावसान –**

१९६६ जूनची ७ तारीख. सोलापूर वालचंद कॉलजमध्ये फिजिक्सच्या एका प्राध्यापकांचा इंटरव्ह्यू चालू होता. उत्साह आणि स्फूर्तीचे अधिष्ठान असलेले श्री. फूलचंदजी गांधी काही प्रश्न विचारीत होते. तोच त्यांच्या मेंदूत एकाएकी रक्तस्राव सुरू झाला. त्यांचे प्रश्न घशातच अडखळू लागले. अंग ताठर बनले. त्यांनी पेन मागून प्राध्यापकास एक लेखी प्रश्न विचारला– प्रश्न विचारल्यावर श्री. फूलचंदमामा काहीसे गंभीर बनले. जवळच्या कार्यकर्त्यांना सारा प्रकार लक्षात आला. लागलीच घरी फोन करून त्यांना जवळच असलेल्या डॉ. चिडगुपकरांच्या दवाखान्यात नेण्यात आले. सर्व आप्तमंडळी येथे धावून आली; परंतु फूलचंदजीनी सर्वांना न घाबरण्याबद्दल व स्वत:ला काही झाले नसल्याचे सांगितले. बाहुबली येथे भूनना समाचार समजताच त्या सोलापुरी निघून गेल्या. भूनना पाहताच मामांच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. 'गजाबाई, मला तुझ्याशी पुष्कळ बोलायचे होते. मी तुझे मुरुमच्या जमिनीचे काम प्रयत्नांची शिकस्त करून



करण्याचे ठरवले होते. पण दुर्दैव'. 'तुम्ही पहिले बरे व्हा, मग माझ्या कामाचे पाहू. माझ्या नशिबात असेल तर काम होईल. अन्यथा नाही' असे सांगून भूननी त्यांना शांत केले.

डॉक्टरांनी रात्रंदिवस उपचारांची पराकाष्ठा केली; परंतु समाजाच्या दुर्दैवाने सतत १५ दिवस मृत्यूशी झुंज देत देत त्यांचा अमर व लोकोत्तर आत्मा दि. २२ जून १९६६ रोजी नश्वर देह सोडून निघून गेला. भूनचा एक भक्कम आधारस्तंभ निखळला. त्यांना अतिशय दु:ख झाले. भूनना त्यांचा खूप स्वाभिमान. आजसुद्धा त्या आलेल्या पाहुण्यांपुढे फुलामामांचे मोठेपण मोठ्या स्वाभिमानाने सांगतात की, 'आमच्या फुलामामांकडे देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू दोन वेळा आले होते. पंडित नेहरू मामांना म्हणत 'फूलचंदजी आप दिल्ली चलिए, तुम हम मिलकर देशका उद्धार करेंगे।' एवढ्यावरूनच मामांच्यामध्ये किती मोठी योग्यता होती हे सहज लक्षात येते.

त्यांच्या निधनवार्तेने जितके दु:ख, वेदना त्यांच्या कुटुबियांना झाल्या असतील त्याहून अधिक वेदना जैन समाजातील अनेक संस्थांच्या कार्यकर्त्यांना झाल्या. ते अनेक संस्थांचे आधारस्तंभ व कुशल नि समर्थ सल्लागार होते . मृत्यूपूर्वी पाच वर्षे बारामती कॉलेज, सोलापूर कॉलेज, बाहुबली विद्यापीठ आणि वालचंद ट्रस्ट फंडस् यांचे कुशल नेतृत्व व मार्गदर्शन ते अत्यंत दक्षतेने आणि जिव्हाळ्याने करीत होते. सर्वांना हवाहवासा वाटणारा माणूस काळाने हिरावून नेला.

**बाहुबली परिसराच्या विकासामध्ये भूनची सृजनशीलता–**

बाहुबली महामूर्तीची प्रतिष्ठापना संपन्न झाल्यानंतर बाहुबली परिसराचे वैभव व निसर्गसौन्दर्य वाढविण्यामध्ये भूनची सौन्दर्यदृष्टी व सृजनशीलता कारणीभूत आहे. मूर्तीच्या सभोवती तट बांधून त्यावर नक्षीदार खांब उभे करणे, तटाच्या चारी बाजूला संगमरवरी नक्षीदार छत्र्या उभ्या करणे, मूर्तीच्या समोरील पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला मारबलचे कठडे करून त्यामध्ये नक्षीदार खांब बसवणे, मूर्तीच्यासमोर संगमरवरी नगारखाना निर्माण

मागून गेल्या.

पुढे २० वर्षांनी वालचंद भैय्यांचे त्या खोलीतच शांतपणे देहावसान झाले. येथे आल्यामुळे निदान शेवटचे त्यांचे आयुष्यतरी त्रासाशिवाय समाधानाने व्यतीत झाले. भैय्यांच्या जीवनावरून पुण्यपापाची विचित्र लीला लक्षात येते. कोठे पुण्याच्या उदयाने संपन्न घरामध्ये जन्म, रूप सौंदर्य, प्रचुर बुद्धिमत्ता, घराण्याचा एकुलता एक दीपक; परंतु पापाच्या उदयाने सर्व निरुपयोगी झाले. संपत्तीचा भोग घेऊ शकले नाहीत, पत्नीने सोडल्यामुळे रूपसौन्दर्य निरर्थक झाले, मनावरचा समतोल बिघडल्यामुळे बुद्धी भ्रमिष्ट झाली. म्हणूनच दौलतरामजी म्हणतात –

पुण्यपाप फलमांही, हरख विलखो मत भाई।
यह पुद्‌गल परजाय उपजि विनसै फिर थाई।

शेवटी पुन्हा पुण्याचा उदय आल्यामुळे बाहुबलीसारख्या पवित्र तीर्थक्षेत्री मंगल वास्तव्य करण्याची संधी मिळाली.

**फूलचंद मामांचे देहावसान –**

१९६६ जूनची ७ तारीख. सोलापूर वालचंद कॉलजमध्ये फिजिक्सच्या एका प्राध्यापकांचा इंटरव्ह्यू चालू होता. उत्साह आणि स्फूर्तीचे अधिष्ठान असलेले श्री. फूलचंदजी गांधी काही प्रश्न विचारीत होते. तोच त्यांच्या मेंदूत एकाएकी रक्तस्राव सुरू झाला. त्यांचे प्रश्न घशातच अडखळू लागले. अंग ताठर बनले. त्यांनी पेन मागून प्राध्यापकास एक लेखी प्रश्न विचारला– प्रश्न विचारल्यावर श्री. फूलचंदमामा काहीसे गंभीर बनले. जवळच्या कार्यकर्त्यांना सारा प्रकार लक्षात आला. लागलीच घरी फोन करून त्यांना जवळच असलेल्या डॉ. चिडगुपकरांच्या दवाखान्यात नेण्यात आले. सर्व आप्तमंडळी येथे धावून आली; परंतु फूलचंदजीनी सर्वांना न घाबरण्याबद्दल व स्वत:ला काही झाले नसल्याचे सांगितले. बाहुबली येथे भूनना समाचार समजताच त्या सोलापुरी निघून गेल्या. भूनना पाहताच मामांच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. 'गजाबाई, मला तुझ्याशी पुष्कळ बोलायचे होते. मी तुझे मुरुमच्या जमिनीचे काम प्रयत्नांची शिकस्त करून



करण्याचे ठरवले होते. पण दुर्दैव'. 'तुम्ही पहिले बरे व्हा, मग माझ्या कामाचे पाहू. माझ्या नशिबात असेल तर काम होईल. अन्यथा नाही' असे सांगून भूननी त्यांना शांत केले.

डॉक्टरांनी रात्रंदिवस उपचारांची पराकाष्ठा केली; परंतु समाजाच्या दुर्दैवाने सतत १५ दिवस मृत्यूशी झुंज देत देत त्यांचा अमर व लोकोत्तर आत्मा दि. २२ जून १९६६ रोजी नश्वर देह सोडून निघून गेला. भूनचा एक भक्कम आधारस्तंभ निखळला. त्यांना अतिशय दु:ख झाले. भूनना त्यांचा खूप स्वाभिमान. आजसुद्धा त्या आलेल्या पाहुण्यांपुढे फुलामामांचे मोठेपण मोठ्या स्वाभिमानाने सांगतात की, 'आमच्या फुलामामांकडे देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू दोन वेळा आले होते. पंडित नेहरू मामांना म्हणत 'फूलचंदजी आप दिल्ली चलिए, तुम हम मिलकर देशका उद्धार करेंगे।' एवढ्यावरूनच मामांच्यामध्ये किती मोठी योग्यता होती हे सहज लक्षात येते.

त्यांच्या निधनवार्तेने जितके दु:ख, वेदना त्यांच्या कुटुबियांना झाल्या असतील त्याहून अधिक वेदना जैन समाजातील अनेक संस्थांच्या कार्यकर्त्यांना झाल्या. ते अनेक संस्थांचे आधारस्तंभ व कुशल नि समर्थ सल्लागार होते . मृत्यूपूर्वी पाच वर्षे बारामती कॉलेज, सोलापूर कॉलेज, बाहुबली विद्यापीठ आणि वालचंद ट्रस्ट फंडस् यांचे कुशल नेतृत्व व मार्गदर्शन ते अत्यंत दक्षतेने आणि जिव्हाळ्याने करीत होते. सर्वांना हवाहवासा वाटणारा माणूस काळाने हिरावून नेला.

**बाहुबली परिसराच्या विकासामध्ये भूनची सृजनशीलता–**

बाहुबली महामूर्तीची प्रतिष्ठापना संपन्न झाल्यानंतर बाहुबली परिसराचे वैभव व निसर्गसौन्दर्य वाढविण्यामध्ये भूनची सौन्दर्यदृष्टी व सृजनशीलता कारणीभूत आहे. मूर्तीच्या सभोवती तट बांधून त्यावर नक्षीदार खांब उभे करणे, तटाच्या चारी बाजूला संगमरवरी नक्षीदार छत्र्या उभ्या करणे, मूर्तीच्या समोरील पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला मारबलचे कठडे करून त्यामध्ये नक्षीदार खांब बसवणे, मूर्तीच्यासमोर संगमरवरी नगारखाना निर्माण

करणे इत्यादी सर्व कल्पकता भूनचीच. त्याला लागणारा खर्च दातारांकडून वसूल करणे, कारागिरांकडून कामे करून घेणे, मिरजेला जाऊन सिमेंटच्या खांबाच्या ऑर्डरी देणे इत्यादी कामे भून स्वत: करीत. त्यामुळेच हे होऊ शकले. हे सर्व तयार झाल्यानंतर बाहुबली क्षेत्राला एक वेगळेच सौन्दर्य प्राप्त झाले. आज प्रत्येक येणारा दर्शनार्थी मंदिराच्या प्रवेशद्वारात प्रवेश करताच एका दृष्टिक्षेपात सर्व वैभव पाहून ''वाहवा, बहुत अच्छा, बहुत सुन्दर'' असे उद्‌गार काढीत विस्फारीत नेत्रांनी क्षेत्राची प्रशंसा करतो. येथील स्वच्छ, शांत, प्रसन्न, पवित्र वातावरण व मनोज्ञ विशाल जिनबिम्बाचे दर्शन करून त्याचे मन आनंदी होऊन येथे वास्तव्य करण्याचे भाव त्यास झाल्यावाचून रहात नाहीत. महामूर्ती सभोवतीच्या हिरव्यागार सजीव सृष्टीमुळे त्याचा मनमयूर आनंदित होऊन नाचतो. ही सर्व भूनची किमया आहे.

मंदिरविभागाच्यासमोर डोंगराळ भाग असल्यामुळे ओबडधोबड जमीन होती. तेथे रस्ता करण्यासाठी खालून तट बांधण्यास सुरवात केली. ते पाहून महाराज भूनना म्हणाले. 'गजाबेन, तुमचे काम अघोरी आहे, एवढा मोठा तट बांधायचा तर त्याला खर्च किती येणार? तुम्ही हा नाद सोडून द्या' परंतु भूनने काही ऐकले नाही. ए. बी. पाटीलांना हाताशी घेऊन भूनने बांधकाम चालू ठेवले. काम पूर्ण झाल्यावर एक दिवस ए. बी. पाटील महाराजांना त्या रस्त्याने घेऊन गेले. रस्ता पाहून प. पू. महाराजांना आश्चर्य वाटले.

एकदा ब्र. भीसीकर गुरुजी भूनना म्हणाले ''आम्हाला एका स्वतंत्र कार्यालयाची व निवासव्यवस्थेची आवश्यकता आहे. भूनने लगेच ते काम हाती घेतले. खालच्या मजल्यावर कार्यालय, ग्रंथ भांडार, इत्यादी व वरच्या मजल्यावर सभागृह, गुरुजी व येणाऱ्या पाहुण्यांसाठी निवास व्यवस्था अशी योजना आखून, दान गोळा करून ते काम पूर्ण केले. भीसीकर गुरुजींची इच्छापूर्ती झाली.

ब्र. भूपाल गुरुजी कोठीचे काम पहात होते. ते एकदा भूनना म्हणाले, वर्षाचे धान्य साठविण्यासाठी व दररोजचे धान्य स्वच्छ करण्यासाठी कोठीघर



अपुरे पडते म्हणून एक मोठे कोठीघर पाहिजे. भूनने तत्काल नकाशा काढून घेऊन, दानराशी एकत्र करून सर्व सुविधा युक्त सुंदर, नूतन कोठी घर बांधवून घेतले. त्यामध्ये धान्याचे व मसाल्याचे डबे व बॅरेल ठेवण्यासाठी दोन्ही बाजूला कठडे बांधले, जेणे करून खाली कोणतीही वस्तू न ठेवता स्वच्छता करण्यासाठी सोयीस्कर होते. कचरा राहिला की त्यामध्ये जीवांची उत्पत्ती होते.

भून नेहमी म्हणतात, अहिंसा व सत्य ही दोन व्रते मी पाळते. घरातील भांडी व सिधासामान ठेवण्याची सर्व कपाटे भून रोजच्या रोज पुसायला लावतात. आम्हाला पूर्वी वाटायचे 'धूळ नाही, काही नाही, उगीचच भून पुसायला सांगून काम लावतात; परंतु पुढे जाऊन त्याचे महत्त्व लक्षात आले. कारण, एका धुळीच्या कणामध्ये असंख्यात पृथ्वीकायिक जीवांची उत्पत्ती होते हे शास्त्राधारे समजले. जीवजंतूंची उत्पत्ती झाल्यावर स्वच्छता करून त्यांना मारण्यापेक्षा त्याची उत्पत्तीच न होईल अशी काळजी घेतली तर आपल्या हातून अधिक हिंसा घडणार नाही. गटारी दररोज ब्रशने घासून धुऊन भून स्वच्छ करायला लावीत त्यामुळे त्या आरशाप्रमाणे चकाचक दिसत.

भून एकदा गारगोटी येथे मौनी विद्यापीठ पहायला गेल्या होत्या. तेथे मध्ये रस्ता व त्याच्या दोन्ही बाजूला झाडे पाहून भून खुश झाल्या. त्यांच्या सौन्दर्यप्रिय दृष्टीमध्ये हे दृश्य घर करून बसले. बाहुबलीला येताच येथेही अशाप्रकारची रचना केली तर येथील शोभा वाढेल म्हणून तत्काल ती योजना अंमलात आणली. प्रवेशद्वारापासून विशाल मार्ग तयार करून त्याच्या दोन्ही बाजूला अशोकवृक्षांची रोपे लावली. थोड्याच वर्षात ते वृक्ष बिल्डिंगपेक्षा उंच उंच आकाशात भरारी मारून येणाऱ्या दर्शनार्थ्यांचे स्वागत करीत होते. अलिकडे ती झाडे काढून सप्तपर्णीची झाडे लावली आहेत.

बाहुबली क्षेत्रामध्ये प्रवेश करताना प्रवेशद्वार नव्हते. भूनने अत्यंत अल्पावधीत ए. बी. पाटलांच्या मदतीने भव्य सुंदर प्रवेशद्वार बांधवून घेतले. त्यामुळे क्षेत्राची शोभा वाढली.

साहू श्रेयांसप्रसादजी बाहुबलीला वरचेवर कार्यक्रमाच्या निमित्ताने येत असत; परंतु रात्री मुक्कामाला सांगली किंवा कोल्हापुरला निघून जात असत. ते एकदा म्हणाले ''क्या करे, यहाँपर सर्व सुविधायुक्त गेस्ट हाऊस नही है, इसलिए हमे ठहरने के लिए दूर जाना पडता है, क्षेत्रपर ऐसी सुविधा हो तो अच्छा होगा।'' भून प्रसंगावधान ठेऊन म्हणाल्या, 'ठीक है साहूजी, हम समाजसे भीख मांगेंगे की साहूजी को रहने के लिए सर्व सुविधा युक्त निवास बनाना है, उसके लिए दान दे दो' साहूजींना आपली चूक लक्षात आली. त्यांनी कान पकडले व म्हटले. 'नहीं नही, बेनजी मुझसे भूल हो गयी। गेस्ट हाऊस बनाने के लिए जो खर्चा आयेगा वह मै दूँगा; आप सर्वसुविधायुक्त गेस्ट हाऊस बनाइए।' त्यानंतर सर्व सुविधासंपन्न साहू श्रेयांसप्रसाद अतिथि-भवनाची निर्मिती झाली.

पहाडाच्या पायथ्याशी पायऱ्या नव्हत्या. पायाला खूप खडे टोचायचे. मी दररोज पहाडावर जाऊन येणार. भून खाली पायथ्याशी बसलेल्या असणार. मी भूनना एकदा सहज म्हटले, भून पायाला खूप खडे टोचतात, येथेसुद्धा फरशी असती तर बरे झाले असते. भूननी लगेच मनावर घेतले. स्वत: २५० रूपये मांडले, सर्व शिक्षक-शिक्षिका व कार्यकर्त्यांकडून २५०, २००, १५१ रूपये गोळा करून मिरजेला जाऊन काळ्या दगडाची ऑर्डर दिली व थोड्याच दिवसात सुरवातीच्या पायऱ्या व बाजूचा दगडी परिसर तयार झाला. अशाप्रकारे सर्वांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या भून म्हणजे जणू कल्पवृक्षच आहेत.

**ज्ञानाचा रसास्वाद -**

संस्थेच्या विकासामध्ये जरी भूननी लक्ष घातले तरी त्यांनी कधीही, आपली ज्ञानाराधना सोडली नाही. 'आदहिदं कादव्वं जइ सक्कं परहिदं च कादव्वं' हे महाराजांचे ध्येयवाक्य सतत ध्यानात ठेऊनच त्यांनी आत्महित न सोडता परहिताचे कार्य केले. एवढे कार्य करूनही 'मी केले' अशाप्रकारे कर्तृत्वाचा अहंकार न करता त्या स्वत:मध्ये मग्न राहिल्या. सकाळ, दुपार, संध्याकाळ तिन्ही वेळा अखंडपणे स्वाध्यायाची कास सोडली नाही.



मध्यरात्री जाग आली की भूनच्या हातात शास्त्र असणारच. रात्रीसुद्धा दोन-दोन-तीन-तीन तास शास्त्र वाचून वेळेचा सदुपयोग करीत. मला झोप लागत नाही अशी तक्रार त्या कधीही सांगत नसत. एकदा एखाद्या ग्रंथाचा स्वाध्याय सुरू केला तर आठ पंधरा दिवसात त्याचा फडशा पाडणार. समयसार परमागमाची तर त्यांनी कितीतरी वेळा पारायणे केली आहेत. पंचास्तिकायसंग्रह, प्रवचनसार, नियमसार, परमात्मप्रकाश, मोक्षमार्ग प्रकाशक इत्यादी ग्रंथांचा देखील खूप वेळा स्वाध्याय केला आहे. भून स्वाध्यायामध्ये इतक्या एकाग्र होत असत की आजूबाजूला कोणी आले किंवा बोलले तरी त्यांचे लक्ष विचलित होत नसे. सभा समारंभामध्ये त्या कधीही भाषण किंवा प्रवचन करीत नसत; परंतु ग्रंथ शिकवा म्हटले की भून दिवस असो रात्र असो शिकवायला तयार असणार. त्यांना प्रश्न विचारले की त्यांची अचूक उत्तरे देण्यामध्ये त्या पटाईत होत्या. विद्वान आले की, त्यांच्याशी चर्चा करून त्यांना भंडावून सोडत. हास्य विनोद करून तास न् तास चर्चा रंगत असे.

**आर्यिका सुपार्श्वमती माताजींचा वर्षायोग-**

१९६७ साली बाहुबली येथे प. पू. १०८ मुनिराज श्री सन्मतिसागर व श्री नेमिसागर महाराज व आर्यिका सुपार्श्वमती आदी तीन माताजींचा चातुर्मास वर्षायोग संपन्न झाला. आर्यिका सुपार्श्वमती माताजी विदुषी असून श्रुतामध्ये पारंगत आहेत. माताजींचे नियमही अत्यंत कडक होते. फक्त गुजराती व मारवाडी लोकांच्याकडूनच माताजी आहार घेत. कारण त्यांचा असा समज होता की चतुर्थ, पंचम जैनांमध्ये पुनर्विवाह होतो. अशा परिस्थितीत या प्रांतात व्यवस्था होणे अत्यंत कठीण; परंतु भूनना सर्व काही सहज होते. त्यांनी सोलापूर, अकलूज, बारामती भागातील श्राविकांना बोलावून घेतले व सर्व त्यागीगणांची अत्यंत उत्तम व्यवस्था ठेवली. चातुर्मासात पंडित सिद्धान्तशास्त्री फूलचंदजींचे येथे वास्तव्य होते. पूज्यश्री माताजी व पंडितजींच्या उद्‌बोधक व सुश्राव्य विद्वत्ताप्रचुर प्रवचनांचा सर्वांना लाभ झाला. संघाच्या मुख्य आर्यिका इंदुमतीजी माताजी होत्या. त्यांच्या

शिष्या सुपार्श्वमती माताजी अत्यंत बुद्धिमान; परंतु इंदुमती माताजी त्यांना षट्खंडागम सिद्धान्त ग्रंथ वाचण्याची परवानगी देत नव्हत्या. कारण त्यांची अशी मान्यता होती की स्त्रियांनी सिद्धान्तग्रंथ वाचू नयेत; परंतु भूननी प. पू. समंतभद्र महाराजांना सांगून माताजींना षट्खंडागम वाचण्याची परवानगी द्यायला लावली. 'शास्त्र हे सर्वांना पठन पाठन करण्यायोग्य आहेत व अशा तेजबुद्धिवाल्या लोकांनी जर हे ग्रंथ वाचले नाहीत तर हळूहळू श्रुताचा लोप होत जाईल,' असे महाराजांनी समजावून सांगितले. त्यावेळेपासून माताजींनी षट्खण्डागम वाचण्यास प्रारंभ केला व थोड्याच कालावधीमध्ये त्यामध्ये त्या निष्णात झाल्या. भूनचे हे उपकार त्या नेहमी मानत होत्या.

चातुर्मास समाप्तीच्या अष्टान्हिक पर्वात बृहत् सिद्धचक्रविधान सानंद संपन्न झाले. याच समारंभात कार्तिक शुद्ध १२, दि. १३ नोव्हेंबर १९६७ रोजी सकाळच्या मंगल मुहूर्तावर सोलापूर येथील श्राविका विद्यापीठाच्या सुविद्य व उत्साही कार्यकर्त्या श्री. प्रभावती शहा यांचा 'आर्यिका दीक्षासमारोह प. पू. १०८ श्री गुरुदेवांच्या शुभहस्ते अपूर्व वैभवाने साजरा झाला. दि. २३ नोव्हेंबर १९६७ रोजी ४ माताजींचा येथून विहार होऊन त्या क्रमाने अकलूजला जाऊन पोहोचल्या. अकलूज येथे सुपार्श्वमती माताजींची प्रकृती अचानक बिघडली, थोडेही अन्न पचेना, रक्ताची हगवण लागली. माताजींनी भूनची आठवण केली. भूननी लगेच अकलूजला जाऊन माताजींना औषध देऊन त्यांची सेवा केली. थोड्या दिवसात माताजींची तब्बेत पूर्ववत् झाली.

**प. पू. मुनिश्री श्रेयांससागर महाराजांचा वर्षायोग–**

१९७१ साली बाहुबली येथे प. पू. १०८ मुनिश्री श्रेयांससागर महाराज यांचा संघासहित चातुर्मास निश्चित झाला. ते प. पू. १०८ आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या परंपरेतील द्वितीय पट्टाधीश आचार्यश्री शिवसागर महाराजांचे शिष्य होते. कारंजा येथील महावीर ब्रह्मचर्याश्रमाचे ते माजी विद्यार्थी होते. त्यांच्या संघात तीन आर्यिका होत्या. त्यापैकी पूर्वाश्रमातील त्यांच्या पत्नी व मातु:श्रीनी त्यांच्यासोबतच आर्यिका दीक्षा



घेतली. त्यांची नावे क्रमश: श्रेयांसमती व अर्हत्मती अशी होती. प. पू. महाराजांना भूनजवळ लब्धिसार ग्रंथ शिकावयाचा होता. त्यासाठीच येथे चातुर्मास करण्याचे त्यांनी ठरविले होते. भूननी स्पष्ट सांगितले 'मी शिकविते; परंतु दोन अटी मान्य असतील तर– १) महाराज व आर्यिकांचे निवासस्थान दूर असावे व २) येथे गाव नसल्यामुळे कठीण व्रतपरिसंख्यान घेऊ नये. महाराजांना दोन्ही अटी मान्य होत्या. भून जे बोलायचे ते तोंडावर स्पष्टच बोलत, मग ते कोणीही असो. पाठीमागे कुजबुज करत बसण्याची भूनना सवय नाही. चार्तुमासामध्ये महाराजांनी भरपूर अध्ययन केले. प. पू. गुरुदेव समन्तभद्र महाराजांजवळ समयसार, नियमसार व इष्टोपदेश या ग्रंथांचा स्वाध्याय केला व भूनजवळ लब्धिसार ग्रंथ वाचला. सकाळ, दुपार व रात्री सतत अध्ययन चालू असे. भूननी त्यांची व्यवस्था उत्तम ठेवली होती.

**धर्मपुत्रीला मिळाली धर्ममाता –**

१९८१ साली पू. आर्यिका नंगमती माताजींच्याकडून मी (सुजाता) ब्रह्मचर्यव्रत घेतले होते. माताजींच्या वर माझी एवढी भक्ती बसली होती की त्यांचे चरणसानिध्य सोडून अन्यत्र जाण्याची इच्छा होत नव्हती. अकरावीची परीक्षा संपताच माताजींच्या सानिध्यात आपले संपूर्ण जीवन घालविण्यासाठी थेट कुंथलगिरी गाठली; परंतु इचलकरंजी येथे माताजींचा चातुर्मास ठरल्यामुळे माताजी सोबत कुंथलगिरीहून इचलकरंजीला विहार झाला. घरी परत जायचे नाही या इराद्याने मी आले होते; परंतु घरच्या लोकांचा घरी येण्यासाठी सतत आग्रह चालू होता. एकदा आई वडिलांनी जबरदस्तीने ओढून मला कोल्हापूरला आणले. कोल्हापूरला येताच णमोकार मंत्राचा जाप, मौन व उपोषण मी चालू केले. दोन दिवसानंतर आईला चिंता वाटून तिने एक मार्ग शोधून काढला. ती मला म्हणाली, चल, आपण बाहुबलीला जाऊन प. पू. समंतभद्र महाराजांचा सल्ला घेऊ. ते म्हणतील ते करायला मी तयार आहे.' मलाही हा मार्ग पटला व आपलाच विजय होईल अशी आशा वाटू लागली. १४ जुलै १९८२ रोजी सायंकाळी अतिशय क्षेत्र बाहुबली येथे सौ. शकुंतला शेटे मावशींना घेऊन मी आले. आई दुसऱ्या

दिवशी सकाळी घरातील काम आवरून येणार होती. आई येण्यापूर्वी आपली बाजू महाराजांना सांगितली तर आपल्या बाजूने निकाल लागेल अशी माझी खुळी समजूत होती. महाराज सामायिकाला बसतील तत्पूर्वी त्यांची भेट घ्यावी म्हणून प्रथम प. पू. महाराजांच्याजवळ आले. पू. महाराजांच्याजवळ भून चर्चा करीत बसलेल्या होत्या. मी प. पू. महाराजांचे दर्शन घेतले. प. पू. महाराजांनी माझी विचारपूस केली. मी महाराजांना माझा परिचय दिला. 'मी निपाणीच्या रत्नाक्कांची नात आहे.' महाराजांनी स्मित करीत आश्चर्याने म्हटले. 'अस्स' माझ्या आजींनी स्तवनिधी गुरुकुल काढण्यासाठी व चालविण्यासाठी खूप मदत केली होती ते महाराज अद्यापि विसरले नव्हते.

मी महाराजांना माझ्या मनातील भाव सांगितले. 'मला माताजींच्या सानिध्यात राहण्याची इच्छा आहे; परंतु आई मला सोडत नाही. उद्या आई आल्यावर आपण समजावून सांगावे.' माझे बोलणे संपते न संपते तोच मध्येच भून करारी कडक आवाजात स्पष्ट म्हणाल्या, 'बरोबर आहे तुमच्या आईचे म्हणणे. तरूण महाराज व तरूण माताजींनी एकत्र राहणे योग्य नाही व त्यांच्याजवळ आपण राहणे हे चुकीचे आहे.' माझ्या सर्व आशेवर पाणी फिरले. 'प्रथमग्रासे मक्षिकापात:' या न्यायानुसार प्रथम दर्शनीच भूनचा कडकस्वभाव लक्षात आला. नाराज होऊन माझा चेहरा पडला. महाराजांनी लगेच मधुर भाषेत समजाविले. 'गजाबेन म्हणतात ते बरोबर आहे. तेथे तुमच्या शीलाचे रक्षण होणे कठीण आहे. पाहिजे तर तुम्ही गजाबेनजवळ राहा.' भूनचे मन विषन्न असल्यामुळे भूननी तत्काल नकार दर्शवीत म्हटले. 'महाराज, या वृद्धावस्थेत मला कोणत्याही मुलीची जबाबदारी नको आहे. तुम्ही यांना कारंजाला पाठवा.' मी ताबडतोब उत्तर दिले, 'मी कारंजाला जाणार नाही. कारण तेथे सर्व सोनगढ पंथीयांचे शिक्षण आहे. भूनना माझे बोलणे सहन न होता कडक आवाजात म्हणाल्या, 'कोण म्हणते तेथे सोनगढचे शिक्षण आहे. नाही ते डोक्यात खूळ भरवतात. तेथे आचार्यप्रणीत ग्रंथांचेच शिक्षण दिले जाते. तेथे या भागातील विमलताई वगैरे ५-६ ब्रह्मचारिणी मुली धार्मिक शिकत आहेत. तुम्ही जात असाल तर तुमची तेथे



सोय करू' 'भूनच्या कडक स्वभावाला घाबरून मी पुढे काहीही उत्तर दिले नाही. पू. महाराजांची सामायिकाची वेळ झाली म्हणून आम्ही तेथून उठलो. त्यावेळी पुण्याच्या सौ. ज्योती शहा भूनजवळ धार्मिक शिक्षण घेत होत्या. सासरी काही समस्या असल्यामुळे त्यांनी आपल्या लहान मुलाला सासरीच सोडून बाहुबलीला येऊन भूनचा आश्रय घेतला होता. भून अशा दु:खी महिलांना धीर देऊन अभयदान देत असत. भून ज्योतीताईंना रात्री सिद्धांत प्रवेशिका शिकवीत होत्या. आपणही ऐकावे म्हणून मी त्या तासाला गेले. भूनच्या बंगल्यात प्रवेश करताच एका राजवाड्यात गेल्यासारखे वाटले. तेथील स्वच्छता, टापटीप, दिवाण, बैठकव्यवस्था पाहून माझे डोळे दिपून गेले. तासाला प्रारंभ होताच भूनननी माझी परीक्षा घेण्यास सुरवात केली. 'तुमचे धार्मिक शिक्षण काय झाले आहे? मी सांगितले, 'छहढाला, रत्नकरंड श्रावकाचार, द्रव्यसंग्रह इ. भूनननी लगेच विचारले, 'जीवमजीवं.....या श्लोकाचा अर्थ सांगा. मला जमेल तसा अर्थ मी सांगितला. भूनच्या चेहऱ्यावरून त्यांच्या परीक्षेत पास झाल्याचे समाधान वाटले. प्रवेशिका शिकतानाही माझी ग्रहणशक्ती पाहून भूनना कौतुक वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी आई आल्यावर महाराजांच्याजवळ बैठक होऊन विचारविनिमय झाला. महाराजांनी मला समजावण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु माझे मन तयार होत नव्हते. कारंजाला पाठवण्याचा भूनचा सल्ला कारंजा दूर पडत असल्यामुळे आईला मान्य झाला नाही. मलासुद्धा माताजींना सोडून एवढ्या दूर जाण्याची इच्छा नव्हतीच. पू. महाराज भूनना मला ठेऊन घेण्यासाठी आग्रह करीत होते. 'गजाबेन, हे रत्न आहे. हातात मिळालेले रत्न सोडू नका. तुम्हाला सुद्धा म्हातारपणी यांचा आधार होईल.' दोन दिवस भूनच्या सानिध्यात राहिल्यामुळे भूनननी मला पारखून घेतले होते. त्यामुळे त्यांना थोडी आपुलकी निर्माण झाली होती. त्यांनी महाराजांचे म्हणणे मान्य करून मला ठेवून घेण्याची स्वीकृती दिली. माझी इच्छा नसतानासुद्धा तात्पुरता दुसरा पर्याय नसल्यामुळे नाईलाजस्तव मी होकार दिला. २-४ महिने शिकून पुन्हा माताजींकडे जाता येईल, असा मनात निश्चय केला.

त्यावेळी येथे चौक्यासाठी असलेल्या बायांनी आमच्या आईला शिकविले, 'गजाबेन फार कडक आहेत. तिला येथे सुख लागणार नाही, तिला कारंजाला पाठवा; परंतु आईने उत्तर दिले, 'मुलीला कडक अनुशासन असेल तरच ती व्यवस्थित राहते. मला अशी कडकच बाई पाहिजे.' प. पू. समंतभद्र महाराज हे आईचे लहानपणापासूनचे श्रद्धास्थान. आपल्या श्रद्धास्थानाच्या हाती मला सोपवून आई निश्चिंतपणे निघून गेली. आईवडिलांकडून माझ्या खर्चासाठी एकही पैसा न मागता भूननी स्वखर्चानेच माझे पालन पोषण केले. मला ठेवून घेतलेल्या दिवसापासून त्यांनी मला आपली मानसकन्या होण्याचे सौभाग्य प्रदान केले.

धर्ममातेजवळ माझे धार्मिक शिक्षण सुरू झाले. भांडारकर संस्कृत प्रथम पुस्तक, छहढाला व सिद्धान्त प्रवेशिका हे तिन्ही ग्रंथ ६९ वर्षाच्या भून एकट्याच शिकवीत होत्या. ज्योतीताईंचे मी येण्यापूर्वी संस्कृतचे १५ धडे शिकून झाले होते. त्यांच्या बरोबरीला मला आणण्यासाठी भूननी युक्तिपूर्वक शिकविले व मला शिकण्याची खूप आवड असल्यामुळे दीड महिन्यात संस्कृत प्रथम पुस्तक पूर्ण झाले. माताजींच्याकडे जाण्याची माझी ओढ अद्यापि कमी झाली नव्हती. काहीतरी निमित्त करून कोल्हापूरला जाऊन परभारे कोणालाही न सांगता इचलकरंजीला जाऊन माताजींना भेटून परत बाहुबलीस आले. येथे येऊन भूनना सर्व खरी परिस्थिती सांगितली. त्यामुळे त्या मला रागावल्या नाहीत; परंतु त्यांच्या लक्षात आले की काहीतरी बंधन केल्याशिवाय हिच्यामध्ये स्थिरता येऊ शकणार नाही. ताबडतोब माझ्या आईवडिलांना येण्यासाठी भूननी निरोप पाठविला. अचानक बोलाविण्याचे कारण माहीत नसल्यामुळे आई तत्काल बाहुबलीस आली. भूननी ठामपणे सांगितले, 'येथे ८ वर्षे राहण्याचा नियम घेत असेल तर मी तिला ठेवून घेईन, अन्यथा नाही.' मी नियम घ्यायला तयार नव्हते. शेवटी केस महाराजांच्याजवळ गेली. महाराजांनी मला खूप समजावले, विनवणी केली; परंतु मी कबूल व्हायला तयार नव्हते. भून आपल्या मतावर ठाम होत्या. भूनचे कोणतेही काम कच्चे नव्हते. जे करायचे ते पक्केच. पू. महाराजांनी



आपल्या जीवनातील बहुमूल्य ५-६ तास माझ्या कल्याणासाठी घालवले ते मी कधीच विसरू शकणार नाही. त्यांनी व भूननी जर त्यावेळी मला आग्रह केला नसता तर मी आज कोणत्या कुमार्गामध्ये जाऊन पडले असते ते सांगता येत नाही. शेवटी आईने जबरदस्तीने माझे मस्तक धरून महाराजांपुढे वाकविले व नियम घ्यायला भाग पाडले.

भून स्वभावाने जेवढ्या कडक तेवढ्या मृदूही आहेत. त्यांनी नियम घेतांना हेही कबूल केले की मी तुला जेव्हा माताजींची आठवण होईल तेव्हा माताजींकडे घेऊन जाते. वचन दिल्याप्रमाणे भून मला दोनदा माताजींकडे घेऊनही गेल्या; परंतु भूननी माझ्या डोळ्यात अंजन घातले होते. त्यामुळे सत्य वस्तुस्थिती स्पष्ट दिसू लागली. आगमचक्षूच्याद्वारे वस्तूचे स्वरूप स्पष्ट प्रतिभासित होऊ लागले. हिताहिताचा विवेक जागृत झाला. त्यामुळे श्रद्धेमध्ये परिवर्तन होऊन जीवनाची दिशा बदलली. भूनचे मातृवत वात्सल्य मिळू लागले. महाराजांकडून सुभाषितामृताचे पान करायला मिळू लागले. त्यामुळे मन आपोआपच रमू लागले. पूज्यपाद आचार्यांनी इष्टोपदेशग्रंथामध्ये सांगितलेच आहे-

**यो यत्र निवसन्नास्ते स तत्र कुरुते रतिम्।**
**यो यत्र रमते तस्मादन्यत्र स न गच्छति।।**

जो जेथे राहतो तो तेथे रमतो, जो जेथे रमतो तो तेथून अन्यत्र जाण्याची इच्छा करीत नाही. तशीच माझी गत झाली. महाराजांजवळ भून गेल्या की माझी चर्चा चालू असायची. ती थोडीथोडी माझ्या कानावर यायची. महाराजांच्या व भूनच्या तोंडून आपले कौतुक ऐकून अंत:करणात गुदगुदल्या होत असत, एक प्रकारचा आनंद मिळत असे व आणखी उत्साह वाढत असे. भूनजवळ असणारा वात्सल्याचा खजिना केवळ माझ्यासाठीच भूननी राखून ठेवला असावा. कुणालाही न मिळालेली माया मला मिळाली, भूननी माझ्यावर सख्ख्या मुलीप्रमाणे प्रेम केले व माझे सर्व लाड पुरविले.

३ महिन्यातच भून सम्मेद शिखरजीची यात्रा करण्याकरिता व आर्यिका सुपार्श्वमती माताजींकडून मला व्रतामध्ये स्थिर करविण्याकरिता

घेऊन गेल्या. भून, मी, ज्योतीताई, सुमतिकुमार कोईक, व महावीर पाचोरे असे आम्ही पाचजण शिखरजीस गेलो होतो. ८ दिवस तेथे मुक्काम करून शिखरजी पहाडाच्या तीन वंदना केल्या व आर्यिका सुपार्श्वमती माताजींच्या सदुपदेशाचा लाभ घेतला. माताजींची सांगण्याची शैली मृदू व दृष्टान्तामुळे चित्ताकर्षक होती. माताजींच्या शिष्या आर्यिका सुप्रभा माताजींचे सुद्धा भविष्याच्या दृष्टीने बरेच मार्गदर्शन लाभले. यात्रेमध्ये भून स्वतः सर्व कामामध्ये मदत करून मला जास्त काम पडू नये याची खूप काळजी घेत असत. स्वतः कष्ट करून परहितामध्ये तत्पर असणारे सत्पुरुष या जगात दुर्लभ आहेत, त्यापैकीच भून एक आहेत.

**पहाडावरील धर्मसंकट –**

सन १९८१-८२ साली अतिशय क्षेत्र बाहुबली येथील पहाडावर श्वेतांबरांचा वाद जोरात सुरू होता. पहाडावरील धर्मशाळा व मंदिरावर आपला कब्जा घेण्यासाठी श्वेतांबरांचे प्रयत्न चालू होते. पहाडावरील जिनमंदिरे सुमारे तीनशे वर्षापूर्वीची असून जीर्ण झाल्यामुळे त्यांचा जीर्णोद्धार करणे प्राप्त झाले होते. म्हणून प. पू. गुरुदेवांच्या मंगल प्रेरणेनेच ट्रस्टींनी ही जबाबदारी उचलली होती. सन १९७४-७५ मध्ये जीर्णोद्धार व त्रिकूट मंदिराचे बांधकाम सुरू झाले होते. तेव्हापासूनच लहानमोठे वाद निर्माण करण्यात येऊन त्यात वेळोवेळी अडथळे आणण्यास श्वेतांबरांनी प्रारंभ केला होता; परंतु या सर्व विरोधास समर्थपणे तोंड देत सुरू केलेले बांधकाम अखंड चालूच ठेवून ते शिखरापर्यंत आणले होते. श्वेतांबर गुजराथी धनिक समाजाने हातकणंगले तहशीलदाराकडून पैशांच्या जोरावर ट्रस्टींवर नोटीस बजावण्यास लावली की शिखराचे चालू केलेले बांधकाम त्वरित बंद करण्यात यावे. त्यामुळे मंदिराचे बांधकाम अपूर्णच राहिले होते. भूनना खूप चिन्ता वाटू लागली. कोणतेही काम अपूर्ण सोडणे तर भूनच्या कुंडलीतच नाही. जिद्द व चिकाटी त्यांच्या नसानसात भिनलेली आहे. प्रयत्नांची शिकस्त करून कार्यसिद्धी करणे हा भूनचा जन्मसिद्ध हक्क होता. खूप उपाय शोधल्यावर भूनना एक उपाय सूचला कुप्पानवाडी कोथळी येथील क्षेत्रावर



एलाचार्य विद्यानन्दी महाराजांचा चातुर्मास सुरू होता. दिल्लीच्या राजभवनापर्यंत त्यांचे वजन होते. पंतप्रधान इंदिरा गांधीही त्यांचा शब्द मोडत नसत. एलाचार्यांच्या परमशिष्या सौ. शरयूताई दफ्तरी अत्यंत कर्तबगार महिला आहेत. या सर्व संधीचा फायदा घेऊन आपले कार्य सिद्ध करावे या हेतूने भून कोथळीस गेल्या. एलाचार्य महाराजांना बाहुबली पहाडावरील सर्व परिस्थिती सांगून चातुर्मास संपताच आपण बाहुबलीकडे प्रस्थान करावे असे आमंत्रण देऊन आल्या. महाराजांनी भूनना दिलासा दिला, 'गजाभून, तुम्ही निश्चिन्त रहा. समन्तभद्र महाराजांनी या भागात एवढे मोठे कार्य केले आहे. त्यांच्यावर आलेले संकट आम्ही सहन करू शकणार नाही. मी माझी सर्व शक्ती पणाला लावून धर्मक्षेत्रावर आलेले संकट दूर करीन. तुम्ही काहीही काळजी करू नका.'

**दिव्यावदान समारोह–**

सर्व समाजामध्ये जागरुकता येण्यासाठी एलाचार्यजींनी ट्रस्टींना बोलावून एका कार्यक्रमाचे नियोजन करण्यास सांगितले. ते म्हणाले– प. पू. समन्तभद्र महाराजांनी समाजाला खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन योग्य प्रमाणात झालेले नाही. सर्व समाजाला त्यांच्या उपकाराची जाणीव होऊन समाजामध्ये एक प्रकारचे चैतन्य यावे म्हणून 'दिव्यावदान समारोह' मोठ्या प्रमाणात करा. दि. १८, १९ व २० फेब्रुवारी ही कार्यक्रमाची तारीख निश्चित झाली. संपूर्ण भारतभर या समारोहाचा प्रचार करण्यात आला. त्याचवेळी भारतातील सर्व वयोवृद्ध पंडितांना आमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्याचेही योजिले. यासाठी १० फेब्रुवारी १९८२ रोजी. प. पू. एलाचार्यश्री विद्यानंद महाराजांचे बाहुबलीस भव्य स्वागतपूर्वक शुभागमन झाले.

कार्यक्रमास उपस्थित त्यागी, पंडित व प्रमुख पाहुण्यांच्या भोजनव्यवस्थेची जबाबदारी भूननी आपल्या शिरावर घेतली होती. मी बाहुबलीला आल्यानंतर हा पहिलाच मोठा समारोह होता. भूनची व्यवस्था तर आमच्या बुद्धीचा विषयच नाही. त्यांचे सर्व नियोजन पाहून मी थक्कच

झाले. कार्यक्रमाच्या ४ दिवस अगोदर कारंजाहून मंजाताई, विजुताई इत्यादी महिला मंडळाला व सोलापूरहून सौ. शुभांगी भाभी, सौ. माधवी भाभी, श्री. कस्तुरचंद भाई इत्यादींना बोलावून कार्यक्रमाची जय्यत तयारी चालू होती. प्रत्येकावर कामाची जबाबदारी सोपविली होती. पंडितांच्या भोजनाची व्यवस्था आपल्या बंगल्याच्या पाठीमागील बगीच्यामध्ये मंडप घालून केली होती. काम करून घेण्याची कला भूनजवळ उपजतच आहे. समंतभद्र महाराज नेहमी म्हणत, 'योजकस्तत्र दुर्लभ:' काम करणारे पुष्कळ जण असतात. परंतु तेथे योजना करणाराच दुर्लभ आहे. ही कला सर्वांना जमत नाही. एखाद्या पंडिताला सांभाळणे व त्यांच्या मर्जीनुसार व्यवस्था करणे कठीण कार्य, पण भून आलेल्या सर्व पंडितांना सांभाळण्याचे कार्य सहज करीत होत्या.

दिव्यावदान समारोहाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध उद्योगपती सेठ लालचंद हिराचंद, स्वागताध्यक्ष साहू श्रेयांसप्रसादजी व कार्याध्यक्षा सौ. शरयूताई दफ्तरी होत्या. दि. १८ फेब्रुवारी रोजी समारोहाचा शुभारंभ भारतवर्षीय दि. जैन महासभेचे अध्यक्ष श्री निर्मलकुमारजी सेठी यांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाला. त्यानंतर शत्रुंजय आदी आठ सिद्धक्षेत्रांच्या प्रतिकृतींचे उद्‌घाटन झाले व दुपारी दिल्लीचे सुविख्यात हिंदी लेखक जैनेन्द्रकुमार यांच्या अध्यक्षतेखाली 'गुरुकुल स्नातक सम्मेलन' संपन्न झाले. प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज कोणत्याही सभेत कधीही जात नसत; परंतु प. पू. एलाचार्य महाराज व शरयूताईंच्या प्रेमपूर्ण आग्रहास्तव ते सभेमध्ये गेले व त्यांनी आशीर्वादपर भाषण अतीव हृदयस्पर्शी व प्रेरणादायी केले. कधीही ऐकायला न मिळणारी गुरुदेवांची दुर्मिळ अमृतमय वाणी ऐकून उपस्थित श्रोतागण मंत्रमुग्ध व भाव विभोर झाले. १९ फेब्रुवारीला वीर सेवा दलाचे नैमित्तिक अधिवेशन आयोजित केले होते. समारोहाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे २० फेब्रुवारीला संकल्पित नूतन सिद्धान्त भवनाचा शिलान्यास सेठ लालचंद हिराचंद यांच्या हस्ते होता; परंतु त्यांच्या प्रेमाग्रहास्तव तो भूनच्या शुभहस्ते झाला. सौ. शरयू दफ्तरी यांनी आपल्या मातोश्री सौ. ललिताबाई लालचंद यांच्या



प्रीत्यर्थ संस्थेस ३२ हजार रूपयांची शीघ्र वाफेवर अन्न शिजविणारी उपकरणे प्रदान केली. त्यांचे व 'सिद्धान्नपूर्णा' या नामफलकाचे उद्‌घाटनही भूनच्या हस्तेच करण्यात आले.

गेल्या १०-१२ वर्षांपासून पू. समंतभद्र महाराज व भूनच्या मनात अनेकांत शोधपीठाची संकल्पना घोळत होती त्यासाठी दरबारलालजी, फूलचंद्र पंडितजी इत्यादींना यापूर्वी अनेकदा प्रेरणा केली होती. ती संकल्पना सिद्ध होण्याचा सुयोग आज आला होता. पं. डॉ. नेमिचन्द जैन, इन्दौर, खुशालचंदजी गोरावाला, पं. कैलाशचन्दजी, पं. दरबारीलालजी, पं. राजारामजी, पं. हरीन्द्रभूषणजी, डॉ. देवेन्द्रकुमार, डॉ. सुरेन्द्र बारलिंगे इत्यादी विद्वान या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. विद्वानांनी आपल्या भाषणांमध्ये संस्थेच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाबद्दल विशेष प्रसन्नता व्यक्त केली. या भागात अशा शोधपीठाची नितान्त गरज होती. यावेळी भूनच्या प्रेरणेने व पाहुणचाराने प्रेरित होऊन सेठ लालचंदजीनी ५१ हजार, तीर्थक्षेत्र कमेटी ट्रस्टतर्फे, संदर्भग्रंथ व कपाटांसाठी प्रत्येकी २५ हजार घोषित केले. त्याचप्रमाणे अनेक धर्मप्रेमी दातारांनी यथाशक्ती दानाचा वर्षाव केला.

२० तारखेला दुपारी जयपूरचे श्रेष्ठी श्री. ज्ञानचन्दजी खिन्दुका यांच्या अध्यक्षतेत व महाराष्ट्र राज्य विधानसभेचे सभापती मा. श्री. जयवन्तराव टिळक, ऊर्जामंत्री कल्लाप्पाण्णा आवाडे दादा यांच्या प्रमुख उपस्थितीत 'दिव्यावदान समारोहाचा' कार्यक्रम संपन्न झाला. या सभेत ही प. पू. एलाचार्य महाराज व प. पू. गुरुदेव यांची उत्स्फूर्त भावस्पर्शी प्रवचने झाली ती ऐकताना सर्वांची अंत:करणे हर्षोत्फुल्ल होत होती. 'समाजावर आमचे उपकार होण्यापेक्षा समाजाचेच या सर्व गुरुकुलसंस्था व परिवारावर अगणित उपकार झाले आहेत. समाजातील प्रेमी हितचिंतक व उदारधी दातारांच्या उत्कट प्रेम, जिव्हाळा व अखंड दानसिंचनानेच जागोजाग ह्या संस्था सुरू झाल्या, वाढल्या व सेवा करू शकल्या. ते नसते तर हे कधीच शक्य नव्हते. म्हणून त्यांचेच आम्ही सारे कृतज्ञ आहोत. त्यांनी आपले प्रेम असेच वर्धिष्णु ठेवावे' असे उद्‌गार जेव्हा प. पू. गुरुदेवांनी काढले तेव्हा तर सर्वांची

अंत:करणे हेलावली, आदराने नत झाली. 'केवढी ही विशाल व मौलिक दृष्टी असे उद्‌गार जो तो काढीत होता. प. पू. समन्तभद्र महाराजांनी गेली ६५ वर्षे आत्मकल्याणासाठी केलेली तपश्चर्या व तिच्या जणू उछ्‌वासाद्वारे झालेले लोककल्याण याचे हे अभूतपूर्व दृश्य यावेळी पहावयास मिळाले.

समारोहाच्या शेवटी श्रीमान साहूजींनी उपस्थित जनसमूहाच्या वतीने सर्व गुरुकुल कार्यकर्त्यांच्या सेवाभावनेबद्दल गौरवाचे उद्‌गार काढून प्रमुख कार्यदर्शी म्हणून ब्र. माणिकचंद चवरे (गुरुजी) व माणिकचंद भीसीकर यांना 'गुरुकुलगौरव' व सर्व विद्यार्थी एवं कार्यकर्त्यांवर मातृसदृश वात्सल्यभाव ठेवणाऱ्या भूनना **'गुरुकुल वत्सला'** या उपाधीने गौरवान्वित केले. त्यांना याची पूर्वकल्पना नव्हती. नाहीतर त्यांनी हा कार्यक्रम होऊच दिला नसता. देणाऱ्यांनी उपाधी दिली; परंतु घेणाऱ्यांनी ती घेतली नाही. भूननी उपाधी न स्वीकारता निरूपाधिस्वरूपच आपले जीवन व्यतीत केले. भूनच्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन साहू श्रेयांसप्रसादजी म्हणाले 'हम आपको सर्व संस्थाका मुख्य पद प्रदान करते है। सबपर अनुशासन करनेकी आपमें ताकत है।' परंतु भूननी मुख्य पद तर जाऊ दे, दुसरे कोणतेही पद स्वीकारले नाही. कोणत्याही पदावर अधिष्ठित न होता त्यांनी सर्वांच्यावर राज्य केले. संचालकापासून ते खालच्या शिपायापर्यंत सर्वजण भूनना पद नसतानाही सर्वेसर्वा मानत होते.

१५ जून १९८३ रोजी पावनपर्व श्रुतपंचमीच्या सुमुहूर्तावर 'अनेकान्त शोधपीठाच्या' कार्याचा शुभारंभ डॉ. विलास संगवे यांच्या अध्यक्षतेखाली सोत्साह संपन्न झाला. सुरवातीस प. पू. गुरुदेव समन्तभद्र महाराजांनी या विभागाच्या प्रमुख कार्यकर्त्यांना शुभाशीर्वाद देत सांगितले की 'विघ्नै: पुन:पुनरपि प्रतिहन्यमाना: प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति।' उत्तम पुरुष विघ्नांद्वारे पुन्हा पुन्हा अडथळे आले तरी प्रारंभ केलेले कार्य सोडत नाहीत. आपले कार्य शुक्लेन्दुवत् वर्धिष्णु राहो. उज्जैन येथील संस्कृतप्राकृतचे विद्वान महामहोपाध्याय डॉ. हरीन्द्रभूषण जैन यांनी निदेशकपदाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. पंडितजी स्वभावाने अत्यंत सरळ होते. वयाच्या ७० व्या वर्षीसुद्धा भून त्यांच्याकडून न्याय



शिकत होत्या. आम्हीपण त्यांच्याबरोबर पंडितजीकडून परीक्षामुख शिकत होतो. शिकताना प्रश्न विचारून विषयाचा अधिक खुलासा करून घेण्याची भूनची पद्धत अजब आहे. भूनच्या प्रश्नांनी पंडितजीसुद्धा कोड्यात पडत. येथील हवा व खानपान न मानवल्यामुळे एका वर्षातच त्यांना बाहुबली सोडून जावे लागले. काही वर्षे उज्जैन येथे राहूनच ते अनेकांत शोधपीठाचा कार्यभार सांभाळत होते.

**पहाडावरील मंदिरांच्या जीर्णोद्धाराचे कार्य –**

ज्या मुख्यहेतूने पू. विद्यानंदी महाराजजींना बाहुबली येथे आमंत्रित केले होते ते कार्य सिद्ध करण्यासाठी एलाचार्य विद्यानंदी महाराजांचा १९८३ सालचा वर्षायोग बाहुबली येथे झाला. २० जुलै रोजी वाद्यांच्या स्वरात आश्रमवासीयांनी त्यांचे येथे भव्य स्वागत केले. २३ जुलै रोजी शांतिसागर प्रवचन हॉलमध्ये प. पू. समंतभद्र महाराज, प. पू. एलाचार्य महाराज, क्षु. वीरभद्र, क्षु. चारित्रभूषण, क्षु. ज्ञानभूषण, व क्षु. धर्मानन्दी अशा ६ त्यागींच्या चातुर्मास स्थापनाविधीचा सोहळा मोठ्या प्रमाणात संपन्न झाला.

सर्व त्यागींच्या व्यवस्थेची जबाबदारी अनधिकृतपणे भूनकडेच होती. दररोज सकाळी व दुपारी समयसार ग्रंथाचा सामूहिक स्वाध्याय, सायंकाळी प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या मंगल सानिध्यात प्रसन्न मनाने तत्त्वचर्चा, रात्री स्वाध्याय, रविवारी दुपारी ३ ते ४ सर्वसामान्य श्रावकांसाठी एलाचार्यजींचे उद्‌बोधक सुश्राव्य प्रवचन अशारीतीने चातुर्मासात कार्यक्रम चालू होता.

परस्परात बंधुभावना जागृत करणाऱ्या पवित्र रक्षाबंधन पर्वदिनी शरयूताई दफ्तरी यांनी आपल्या अहिंसा प्रसारक ट्रस्टतर्फे नेज येथील ग्रामस्थांना नारळ, लिंबू, पेरू इत्यादींची रोपे वाटली व २०० हरिजन महिलांना भूनच्या हस्ते साडी वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. शरयूताईंनी हरिजनांच्या केलेल्या निस्वार्थ सेवेमुळे व पू. महाराजांच्या सदुपदेशामुळे प्रभावित होऊन विजया दशमीच्या दिवशी ७५ हरिजन पुरुष व महिलांनी मद्य व मांसत्यागाचे व्रत स्वयंस्फूर्तीने स्वीकारले.

पू. विद्यानंदी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली जीर्णोद्धाराच्या अपूर्ण राहिलेल्या बांधकामास प्रारंभ झाला. शिखराच्या बांधकामासाठी विटा, वाळू, सिमेंट इत्यादी साहित्य खालून वर न्यावे लागे. पू. एलाचार्यजींच्या सत्प्रेरणेमुळे प्रत्येक दर्शनार्थी पहाडावर चढताना आपल्याला शक्य होतील तेवढ्या विटा उचलून नेत होता. त्यामुळे स्वतंत्र कामगारांची गरज भासली नाही. श्वेतांबरांचा विघ्न आणण्याचा खटाटोप चालूच होता. शिखराचे बांधकाम जोमाने सुरू असतानाच 'बांधकाम बंद करण्यात यावे व झालेले बांधकाम काढून घेण्यात यावे.' अशी तहशीलदाराकडून नोटीस बजावण्यात आली. ट्रस्टीतर्फे त्या नोटीसाला रीतसर उत्तर देण्यात येऊन बांधकाम चालू ठेवण्यात आले. हरिजन व मराठा लोकांना उठवून बसवून दिगंबरांना त्रास देण्याचा प्रयत्नही केला गेला. दिगंबरांच्या मालकी वहिवाटीतील जागेत छ. शिवाजीचा पुतळा बसविण्यासाठी शासनाकडे परवानगी मागण्यात आली. दिगंबर जैनांची 'पंडित निवास' ही धर्मशाळा काही लोकांनी बळकावली. संस्थेच्या आवारातील झाडे तोडणे इत्यादी उपद्रवही सुरू झाले. पोलीस व अन्य शासकीय अधिकाऱ्यांचे पक्षपाती व छळवादी धोरण एलाचार्यजींना सहन झाले नाही. त्यांनी अधिकाऱ्यांना समजावून सांगितले; परंतु त्याचा उपयोग झाला नाही. त्यांच्या दृष्टीत व धोरणात थोडाही बदल झाला नाही. त्यामुळे १० ऑक्टोबर १९८३ रोजी उपोषणाचा अहिंसक लढ्याचा सत्याग्रही मार्ग एलाचार्य यांना स्वीकारावा लागला. 'प. पू. वयोवृद्ध गुरुदेवश्री समन्तभद्र महाराज, संस्थेतील सेवाभावी कार्यकर्ते तथा क्षेत्र व क्षेत्राचे विश्वस्त प्रबंधक यांच्यावर होणारे उपसर्ग, अन्याय नि अत्याचार कोणत्याही परिस्थितीत थांबले पाहिजेत. या पवित्र क्षेत्रावर शान्ती व सौजन्याचे मंगलमय वातावरण जे यापूर्वी वर्षानुवर्षे टिकून होते ते पुन्हा प्रस्थापित झाले पाहिजे असे प. पू. एलाचार्यजींना उत्कंटपणे वाटत होते.

एलाचार्यजींच्या बरोबर क्षु.१०५ चन्द्रभूषण महाराज व क्षु. वीरभद्र महाराज यांनीही उपोषण सुरू केले. प. पू. गुरुदेव स्वत: उपोषण करतील म्हणून त्यांच्या कानावर ही गोष्ट जाऊ दिली नव्हती, पण दुसऱ्या दिवशी



त्यांना बातमी कळताच त्यांनीसुद्धा अन्न वर्ज्य केले. अनेकांनी या सत्याग्रहात सहभागी होण्याचे भाव व्यक्त केले. वरील मुनिजनांच्या उपोषणाचे हे वृत्त वाऱ्यासारखे सर्व देशभर पसरले. दिल्लीहून काँग्रेसचे पार्लमेंट सेक्रेटरी खासदार जे. के. जैन व केन्द्रीय गृहमंत्री प्रकाशचंद्र सेठी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा यांना खास संदेश पाठविला– 'बाहुबली येथील प्रकरणी ताबडतोब जातीने लक्ष घालून हरप्रयत्नाने मुनिमहाराजांचे उपोषण थांबवा. अन्यथा देशभर त्याचे गंभीर परिणाम होतील. वसंतदादांनी आपले खास प्रतिनिधी म्हणून गृहराज्यमंत्री ना. शिवाजीराव देशमुख व कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. कल्लाप्पाण्णा आवाडे यांना तातडीने पाठवून सर्व परिस्थिती समजून घेऊन मुनिमहाराजांना उपोषण मागे घेण्यासाठी आपल्यातर्फे विनंती करण्यास सांगितले'. त्याप्रमाणे मंत्रीद्वय दि.१३ ऑक्टोबर रोजी बाहुबलीस आले. सौ. शरयूताईंनी व बाहुबली विद्यापीठाचे अध्यक्ष नानासाहेब नांद्रेकर यांनी त्यांना सर्व वस्तुस्थिती नमूद केली. मंत्र्यांनी सर्व प्रकरण समजून घेऊन मंदिर बांधकामासंबंधी देण्यात आलेली बेकायदा नोटीस मागे घेण्यास व ७-१२ चा उतारा दुरुस्त करण्यास मामलेदारांना योग्य आदेश दिले. ना. श्री. देशमुख यांनी लागलीच दुरूस्त होऊन आलेला ७/१२ चा अधिकृत उतारा महाराजांकडे सुपूर्त केला व त्यांना उपोषण मागे घेण्यासंबंधी प्रार्थना केली. अखेर महाराजांनीही त्यांच्या सद्भावनापूर्ण प्रयत्नाबद्दल समाधान व्यक्त करून उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले.

दरम्यानच्या काळात भून सांगली येथे जाऊन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांची त्यांच्या निवासस्थानावर भेट घेऊन, 'आपण बाहुबलीला एकदा येऊन समक्ष वस्तुस्थिती पहा. म्हणजे आपल्याला सत्य परिस्थितीची जाणीव होईल.' असे अधिकृतवाणीने सांगून आग्रहाचे आमंत्रण दिले होते. दादांनी ही भूनचे म्हणणे अत्यंत आदराने व प्रेमाने ऐकून घेऊन येण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार ६ नोव्हेंबर १९८३ रोजी सायंकाळी ५ वाजता मुख्यमंत्री वसंतदादांनी क्षेत्रास खास भेट देऊन एलाचार्य महाराजांशी

मुक्तमनाने वार्तालाप केला. विगत दोन-तीन वर्षातील झालेल्या शासकीय अत्याचारांची तपशीलवार माहिती ऐकून त्यांना अतिशय दुःख झाले. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन त्यांनी येथील तक्रारी लवकरात लवकर दूर करण्याचे आश्वासन दिले.

**बाहुबली मूर्तीवर उपद्रव –**

त्यानंतर १५ नोव्हेंबरच्या रात्री एक दुर्दैवी घटना घडली. सांगली विभागात पोटसभेची निवडणूक होऊन त्यात सौ. शालिनीबाई पाटील विजयी झाल्या त्याचे निमित्त करून १५ नोव्हेंबरच्या रात्री ११ च्या सुमारास नेज, कुंभोज व कोल्हापूरच्या काही उपद्रवी लोकांनी दुर्गादेवी दर्शनासाठी म्हणून बाहुबली क्षेत्रावर जमावाने येऊन येथील महामूर्तीवर व प.पू. गुरुदेवांच्या निवासस्थानावर अकारण दगडफेक केली. असंख्य फटाकडे उडवून त्यातील काही मूर्तीवरही फेकले. यामुळे सर्वांच्या आंतरिक भावना दुखावल्या गेल्या. आपल्या आराध्य देवतेचा अपमान कोण सहन करणार? परिणामतः दि. १६ नोव्हेंबरपासून एलाचार्यजींनी पुन्हा उपोषणास प्रारंभ केला. समस्त विद्यार्थी, गुरुकुलवासी व कार्यकर्तागण यांनी देखील एक दिवस पूर्ण उपोषण केले. हे दुःखद वृत्त वाऱ्यासारखे सर्वत्र पसरले. गावोगावचे धर्मबांधव येथे धावत येऊन आपल्या तीव्र भावना व्यक्त करू लागले. कधी घडला नव्हता असा अश्लाघ्य व निंद्य प्रकार घडला होता. या प्रकारानंतर समाजात एक आगळे चैतन्य जागृत झाले. या निंद्य दुर्घटनेबद्दल महाराष्ट्रातच नव्हे तर कर्नाटक, मध्यप्रदेश, राजस्थान व दिल्ली वगैरे अनेक ठिकाणी सर्वधर्मीय जनतेतून तीव्र असंतोष व्यक्त करण्यात आला व जागोजाग निषेधाचे उत्स्फूर्त मूकमोर्चे निघाले.

विधानसभेतही या दुर्घटनेवर चर्चा झाली. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी व महाराजांना उपोषण सोडण्याविषयी विनंती करण्यासाठी दि.११ डिसेंबर १९८३ रोजी महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. एन्. एम्. कांबळे आदी ५-६ मंडळींनी बाहुबली क्षेत्रास भेट दिली. या दरम्यान बाहुबली आश्रमास पूर्वीच प्रवेशद्वार बांधलेले



होते; परंतु त्यास फाटक लावलेले नव्हते. वरील १५ नोव्हेंबरच्या दगडफेकीच्या प्रकारानंतर संरक्षणासाठी दोन दरवाजे लावण्यात आले. या गोष्टीचा विपर्यास करून श्वेतांबर बंधूनी व मराठा महामंडळांनी खोटा प्रचार केला व कांबळे यांना याच बंद गेटमधून आत जाण्यास भाग पाडायचे असे ठरवून दंगलीची पूर्व योजना आखली. श्री. कांबळे आल्यावर रस्त्यावर त्यांना अडवून याच बंद गेटमधून आत जाण्याचा आग्रह धरला. त्या दरम्यान बाहेरच्या विरोधी मंडळींनी मोकळ्या वाटेने आत शिरून दगडफेकीस सुरवात केली. शरयूताईंनी यावेळेस झाशीच्या राणीप्रमाणे एका वीर महिलेची भूमिका बजावली. सर्व लोकांना स्पीकरवरून शांतता राखण्यास सांगून लोकांना मंडपाकडे घालविले. त्यादिवशी चार पाच हजार लोक महाराजांचे प्रवचन ऐकण्यासाठी एकत्र जमले होते. पाहुण्यांनी डोंगरावर जाऊन सर्व पाहणी केली व एलाचार्यजींशी चर्चा करून सर्व परिस्थिती समजून घेतली व त्यांना अन्न ग्रहण करण्याबद्दल विनंती केली.

पुढे १६ डिसेंबर १९१९ रोजी क्षेत्रसंरक्षणासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी सहा सातशे पोलीसांचा प्रबंध केला असल्याचे सांगितले. रात्री बारानंतर एकाएकी गेटचा नवीन दरवाजा उखडला जात असल्याचा आवाज येऊ लागला. जवळचे लोक जागे झाले; परंतु प्रत्येकांच्या घरास व खोलीस बाहेरून कडी घातलेली, रस्त्यावर व सर्वत्र पोलिसांचा कडक पहारा, कोणासही गेटकडे फिरकू द्यायचे नाही अशी वरिष्ठ अधिकाऱ्यांची सक्त ताकीद होती. गुरुकुलातील मुले मोठ्याने आवाज करू लागली तर पोलिसांनी लागलीच बंदूका रोखून दमदाटी देत दहशत निर्माण केली. सर्व झाल्यावर कळाले की कलेक्टर, प्रांत ऑफिसर, तहसीलदार. डी.एस्.पी. यांनीच पोलीसांच्या अफाट बंदोबस्तात दरवाजे काढून नेले आहेत. तसेच बाहुबली पहाडावरील तारेचे कुंपणसुद्धा उपटून टाकले आहे.

सदरची घटना सकाळपर्यंत मुंबई, दिल्ली, जयपूर, इंदौर आदी ठिकाणी पोहोचली होती. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यापर्यंतही प्रस्तुत बातमी पोहचली. त्यांनी लागलीच दि.२१ डिसेंबर १९८३ रोजी

दिल्लीहून खासदार भिकुराम जैन, खासदार श्री. जे. के. जैन इत्यादी चार खासदारांचे शिष्टमंडळ चौकशीसाठी बाहुबलीस पाठविले. त्यांनी एलाचार्यजींशी चर्चा करून आवश्यक ती माहिती घेतली. झालेल्या दुर्घटनेबद्दल गुरुदेवांची क्षमायाचना केली. येथील स्थिती व समस्या इंदिराजींच्या कानावर घालून त्या योग्य रीतीने सोडवून येथे स्थायी शान्ती प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने जरूर प्रयत्न होतील असे आश्वासन दिले व महाराजांना अन्न ग्रहण करण्यासंबंधी विनंती केली. पू. एलाचार्य महाराजांनी आपले उपोषण मागे घेण्याचे कबूल केले. दुसऱ्या दिवशी बुधवार दि. २२ डिसेंबर १९८३ रोजी ३६ दिवसांच्या अन्न त्यागानंतर महाराजांचा प्रथम आहार भूनच्या घरी निरंतराय झाला.

अशाप्रकारे अनेक संघर्षांना तोंड देत पहाडावरील जीर्णोद्धाराचे कार्य पूर्ण झाले. हे कार्य सिद्धीस नेईपर्यंत भूननी किती कष्ट झेललें व मेहनत घेतली हे मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहे. महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या ज्येष्ठ पाहुण्यांची व्यवस्था करणे, या प्रकरणानिमित्ताने येणाऱ्या मंत्र्यांच्या पाहुणचाराची व्यवस्था करणे, वेळोवेळी मुंबई, सांगली, इचलकरंजी येथे जाऊन राजकर्त्यांना भेटणे, शिवाय एवढे करून दोन वेळा स्वाध्याय करणे कधी चुकले नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर भूननी समयसूचकता दाखवून ही गोष्ट मनावर घेतली नसती व एलाचार्यजींना बोलाविले नसते तर बाहुबलीचे काय झाले असते देव जाणे. कदाचित आजची डोंगरावरील भव्य जिनमंदिरे पाहायला मिळाली नसती. भूननी संस्था व पहाडावरील ट्रस्ट यामध्ये कधीही भेदभाव केला नाही. संस्था ही आपली व पहाडावरील क्षेत्रही आपलेच आहे असे मानून सर्व काही केले. या ८-१० वर्षातच पहाडावरील ट्रस्ट वेगळा आहे, हे आम्हालाही लक्षात आहे. नाहीतर आम्ही खालचा व वरचा एकच ट्रस्ट आहे असे समजत होतो. त्यावेळी रात्र-रात्र भूनला झोप येत नव्हती. सतत कार्यसिद्धीचाच ध्यास होता.

**पंतप्रधान इंदिरा गांधींची भेट–**

त्या जीर्णोद्धारित मंदिरात व नवनिर्मित त्रिकूट मंदिरात विराजमान



व्हावयाच्या जिनमूर्तींचा पंचकल्याणक महोत्सव ८ मार्च ते १५ मार्च १९८४ पावेतो करण्याचे निश्चित झाले. वर्षभरात घडलेल्या घडामोडीमुळे क्षेत्राचा सर्वत्र प्रचार झाल्यामुळे जनता प्रचंडसंख्येने उपस्थित होणार म्हणून या प्रतिष्ठेची जय्यत तयारी सुरू झाली. पंतप्रधान इंदिराजींच्या सत्प्रयत्नाने वाद मिटून क्षेत्रावर शांती प्रस्थापित झाली. त्याकरिता इंदिरांजीचे या क्षेत्रावर शुभागमन व्हावे व त्यांनी हे क्षेत्र पहावे म्हणून भून, भीसीकर गुरुजी व शरयूताई प्रतिष्ठेचे आमंत्रण देण्यासाठी विमानाने दिल्लीला गेले होते. श्रीमती इंदिराजी विधान सभेतून बाहेर पडून गाडीत बसण्यासाठी निघाल्या होत्या. त्याचवेळी संधी साधून या तिघांनी त्यांची भेट घेऊन चांदीचा कळस त्यांना भेटस्वरूप देऊन प्रतिष्ठेचे आमंत्रण दिले. त्यावेळी भूननी पायातील पादत्राणे काढून भारतीय पद्धतीनें त्यांना अभिवादन केले. तेव्हा इंदिराजी म्हणाल्या. 'ओहो, माताजी, पावमेंसे जूते मत निकालो, यहा बहुत ठंड है।' भूननी त्यांचा शब्द खाली न पडू देता हजरजबाबीपणाने उत्तर दिले. 'आप क्या समझे, हम दिगंबर जैन हैं।' दिशाही जिसका वस्त्र है उसे दिगंबर कहते है।' इंदिराजी खुदकन हसल्या व भूनचे आमंत्रण स्वीकारून निघून गेल्या. पंतप्रधानजींना ही ज्या बोलायला घाबरल्या नाहीत त्या भूनची शक्ती किती मोठी होती हे लक्षात येते. प्रसंगावधानाने समोरच्या व्यक्तीला उत्तर देण्याचीसुद्धा एक कला आहे. ती कला भूननी या वृद्धावस्थेतसुद्धा जोपासली आहे. बोलण्यामध्ये त्यांनी स्वत:चा पराभव कधीच पत्करला नाही.

त्यानंतर राजीव गांधींची ही भेट घेऊन त्यांना येथील परिस्थितीची सर्व कल्पना देऊन त्यांनाही प्रतिष्ठेचे आमंत्र दिले.

ठरल्याप्रमाणे दि. ८ ते १५ मार्च १९८४ या कालावधीत पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव अत्यन्त धर्मोल्लासपूर्वक उत्साहात संपन्न झाला. जीर्णोद्धारित मंदिरात खाली चार, शिखरामध्ये चार व निटवे बिल्डिंगवर नवनिर्मित त्रिकूट चैत्यालयात तीन अशा एकूण अकरा जिनप्रतिमांची पंचकल्याणक प्रतिष्ठा सानंद पार पडली. त्याचवेळी ८२८ वर्षीय प्राचीन भ. बाहुबली जिनप्रतिमेचा महामस्तकाभिषेक सोहळाही

आनंदात साजरा झाला. या प्रतिष्ठा समारोहाप्रसंगी १०८ एलाचार्य विद्यानंद महाराज, प. पू. १०८ आर्यनंदी महाराज व प. पू. १०८ महाबल महाराज इत्यादी मुनिगणांचे आशीर्वाद व मार्गदर्शन लाभले. इच्छित शुभकार्य पूर्ण झाल्यामुळे भूनना अत्यानंद झाला. शेवटी कष्टाचे गोड फळ चाखायला मिळाले म्हणून श्रम सार्थक झाल्याचा अनुभव आला.

**साधकसमाधिसहयोग –**

कित्येक साधकांचे समाधिमरण साधण्यासाठी भूननी मोलाचे योगदान दिले आहे. कोल्हापूरनिवासी वसुदेव यशवंत कराडे यांनी १० ऑक्टोबर १९८१ रोजी कोल्हापूर येथे संभवसागर महाराजाजवळ स्वेच्छेने तीन वर्षांचे 'सल्लेखना व्रत' ग्रहण केले होते. अर्थात तीन वर्षानंतर यमसल्लेखना घेऊन समाधी साधण्याचा निश्चय केला होता. त्या साधनेसाठी प्रापंचिक मोह दूर करून उर्वरित जीवन पवित्र धर्मक्षेत्री व्यतीत करावे असा विचार करून दि. २८ फेब्रुवारी १९८२ रोजी ते सपत्नीक बाहुबली क्षेत्री आले. त्यांच्या पत्नीचा एक पाय उंदराची विषबाधा होऊन कापावा लागल्यामुळे त्या अपंग होत्या. त्यामुळे त्यांच्या सोयीसाठी खालच्या धर्मशाळेत त्या उभयतांचे वास्तव्य होते. संस्थेतील प्रत्येक कामाची जबाबदारी भून स्वेच्छेने स्वीकारीत असत. कारण त्यांनी संस्था हे आपले घरच मानले होते. त्यामुळे प्रत्येक काम आपलेच आहे असे त्यांना वाटे. हे तर धार्मिक कार्य होते. या सल्लेखनेची सर्व जबाबदारी भूननीच स्वीकारली होती. भून वरचेवर त्यांच्याकडे जाऊन चौकशी करीत व त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करीत. अन्न त्याग करण्यापूर्वी त्यांची कोणतीही इच्छा राहू नये म्हणून भूननी त्यांच्या आवडीचे सर्व पदार्थ करून त्यांना खाऊ घातले. त्यांना १० ऑक्टोबर पर्यंत आपले जीवन संपवावयाचे होते म्हणून जुलै १९८४ मध्ये त्यांनी अन्नाचा त्याग केला. त्यावेळी त्यांची साधना सुलभ व्हावी म्हणून भूननी आपल्या जवळच्या एका खोलीमध्ये त्यांना आणले. त्यांना क्रमाने कांजी, दूध, ताक, लिंबूचे सरबत व मनुक्याचे पाणी यांचा त्याग करीत पर्युषण पर्वात केवळ नारळाचे पाणी तेही दिवसातून एकदाच दिले जाई. ही



सर्व व्यवस्था भून स्वतः आत्मीयतेने करीत होत्या. पर्युषण पर्वानंतर ११ सप्टेंबरपासून फक्त गरम पाणी सोडून सर्व आरंभ, परिग्रह व अन्नाचा त्याग करविला. १७ सप्टेंबर रोजी प.पू. गुरुदेवांजवळ त्यांनी १० व्या अनुमति-त्याग प्रतिमेचा सानंद स्वीकार केला. डोळे काहीच काम देत नसल्याने ११ वी प्रतिमा घेता आली नाही. या प्रतिमा ग्रहणप्रसंगी त्यांचे नाव त्यांच्याच संकेतावरून 'परमानंद' ठेवण्यात आले. त्यांच्या भावना विशुद्धीसाठी पाळीपाळीने सल्लेखनासमयीचे सुंदर मंत्रपाठ, भावपूर्ण भक्तिगीते, वैराग्यवर्धक शास्त्रवाचन आदरणीय भून, श्री. जडे गुरुजी, मी व अन्य गुरुजन करीत असू. प. पू. गुरुदेवांचे प्रेरणादायी प्रबोधन दररोज चालू होते. विजया दशमीपासून चार दिवस पाणीही न घेतल्यामुळे दि. ८ ऑक्टोबर रोजी प. पू. गुरुदेवांनी त्यांना यमसल्लेखना दिली. ऑक्टोबरची १० तारीख उजाडण्यापूर्वी आपण कदाचित् गेलेले असू असा अप्रत्यक्ष संकेत त्यांनी अगोदर बोलताना व्यक्त केला होता. त्यांचे ते शब्द अखेर खरे ठरले. १० तारखेची पहाट उजाडण्यापूर्वीच दि. ९ ऑक्टोबर १९८४ रोजी रात्री पावणेबारा वाजता णमोकार महामंत्राच्या प्रसन्न श्रुतिमधुर गजरात शान्तपणे त्यांचे प्रयाण झाले. त्यांची सल्लेखना निराकुल व निर्विघ्नपणे पार पाडण्यात भूनचा मोठा सहयोग होता. प्रार्थना, भक्तिगीते, बारा भावना, 'शुद्धचिद्रूपोऽहं' आदी मंत्रघोष इत्यादींनी वातावरण अखेरपावेतो धर्ममय, प्रसन्न व शांत ठेवले जात असे. खरोखर त्या भव्यात्म्याचे सातिशय पुण्यच की अन्त्यसमयी आत्मजागृती टिकून राहण्यास हा सर्व सुयोग त्याना मिळाला व त्यांनीही त्याचा पुरेपूर उपयोग करून आपले जीवन कृतार्थ केले.

**समाधीचा दुसरा प्रसंग–**

संस्थेच्या प्रारंभी शिकावयास आलेल्या पाच विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी डॉ. सुमतिकुमार आदाप्पा कोईक यांना स्वाध्यायाची व धार्मिक अध्ययनाची अत्यंत आवड. ते इचलकरंजी येथे लोकप्रिय डॉक्टर होते. इचलकरंजीस शासकीय सेवेत राहून शेवटी १९८४ मध्ये सेवानिवृत्त झाले. ब्र. वालचंद गुरूजींचे ते प्रथमपासूनचे प्रिय शिष्य होते. तेव्हापासून

बाहुबलीस वरचेवर येऊन सेवायोग देऊन बहुभाग वेळ स्वाध्यायात घालवीत. १९८२ साली आमच्याबरोबर ते शिखरजीच्या यात्रेसाठी आले होते. पुढे सप्टेंबर १९८७ साली त्यांना कर्करोगाने घेरले. जावई डॉक्टर, त्यामुळे त्यांनी त्यांना औषधोपचार करून घेण्यास प्रवृत्त केले. जावयाचे मन कसे मोडायचे म्हणून त्यांनी एक इंजेक्शन घेतले. त्यामुळे त्यांचे रक्त कमी होऊन त्यांना खूप अशक्तपणा आला. डोक्यावरचे सर्व केस गळाले. त्यांनी मुलाला घेऊन सरळ बाहुबलीला येऊन गुरुदेवांचे दर्शन घेतले व त्यांनी गुरुदेवांना सांगितले, 'आता मला औषधोपचार नको, मला समाधिमरण साधावयाचे आहे.' भूननी त्यांचा शब्द उचलून धरला व म्हणाल्या 'सुमतिकुमार तुझी मी सर्व व्यवस्था व सेवा करते. तू माझ्याजवळ रहा.' बस मातेची ममता मिळाल्यानंतर काय पाहिजे? त्यांनी पक्का निर्णय घेतला. जावई, मुलगी, मुलगा नको म्हणत असतानाही त्यांचे न ऐकता मातेच्या छत्रछायेत आले. नियम सल्लेखनेपूर्वक स्वाध्याय, भक्तिगीतांचे श्रवण व मंत्रपाठ यात बहुभाग वेळ घालवू लागले. अन्नाचा पूर्ण त्याग केला. दुर्धर रोगाच्या तीव्र वेदना होत होत्या. तथापि धैर्याने व शान्तीने ते सहन करीत होते. तत्त्वज्ञानाचा अवलंब घेऊन ज्या वीरवृत्तीने उदयागत असाता कर्माशी ते लढा देत होते. ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटत होते. दररोज प. पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराज व प. पू. महाबल महाराज व क्षु. वीरभद्र महाराज यांचा प्रेरणादायी उपदेश त्यांना लाभत होता. तसेच आदरणीय भून, श्री. जडे गुरुजी, मी व अन्य काही कार्यकर्ते व त्यांच्या परिवाराने रात्रंदिवस त्यांच्या सेवेत राहून त्यांच्या समाधिसाधनेत सहयोग दिला.

त्यांनी आपल्या नजरेसमोरील कपाटावर समयसारमधील एक कलश लिहून ठेवायला सांगितला होता व ते नित्य त्या कलशाचे मनन, चिंतन व वाचन करीत होते. तो कलश पुढीलप्रमाणे–

**चिच्छक्तिव्याप्तसर्वस्वसारो जीव इयानयम्।**
**अतोऽतिरिक्ताः सर्वेऽपि भावाः पौद्‌गलिका अमी।।**

**अर्थ** – चैतन्यशक्तीने व्याप्त ज्याचे सर्वस्व-सार आहे, असा हा



जीव केवळ एवढाच आहे. या चैतन्यशक्तीने रहित जे हे भाव (विभाव भाव) आहेत ते सर्व पुद्‌गलजन्य आहेत. अनेक परिचित लोक भेटण्यास येत व हा आगळा मृत्युमहोत्सव पाहून आश्चर्य व समाधान व्यक्त करीत. डॉक्टर कोईकही मधुर स्मित करीत हात जोडून सर्वांची क्षमा मागत व आपणही क्षमाभाव व्यक्त करीत. त्याशिवाय एक शब्दही ते आलेल्या परिवारास किंवा पाहुण्यांच्याबरोबर बोलत नसत. त्यांना मुनिदीक्षा घेण्याचे खूप भाव होते. त्याचा ते पूर्वी अभ्यासही करीत होते. प. पू. गुरुदेवांजवळ त्यांनी त्यांची भावना व्यक्त केली. त्यांच्या वेदना व त्रास पाहून त्यांना दीक्षा देण्याचे धाडस होत नव्हते. अखेर त्यांची तीव्र भावना पाहून गुरुदेवांनी दुसऱ्या दिवशी दीक्षा देण्याचे निश्चित केले. वाळलेले गवत वगैरे आणून त्याची पूर्ण तयारीही केली; परंतु त्याचदिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर १९८७ रोजी सायंकाळी साडे पाच वाजता त्यांचे अचानक प्राणपखेरू उडून गेले. प. पू. गुरुदेव व प.पू. महाबल महाराज २ तास जवळ बसून णमोकार मंत्र म्हणून संबोधन करून नुकतेच गुंफेकडे गेले होते. मी व भून त्यांच्याजवळ बसलो होतो. भून त्यांना सांगत होत्या 'सुमतिकुमार मी तुझी सर्व इच्छा पूर्ण करते. आज सर्व तयारी केली आहे, उद्या तुला मुनिदीक्षा देऊ' या भूनच्या वाक्यांनी आनंदी होऊन 'बर, बर' म्हणून आपला प्रतिसाद देत असतानाच त्यांचे डोळे फिरले व श्वास बंद झाला. प्रत्यक्षात मुनिदीक्षा झाली नसली तरी मी मुनी होणार या भावनेच्या आनंदातच त्यांना मरण आले. असे आदर्श वीरमरण त्यांनी अतिशय धैर्य व शान्तिपूर्वक साधून इहलोकीचे जीवन सार्थक नि सफल केले. मरणापूर्वी त्यांनी आपल्या उर्वरित इस्टेटीपैकी एक लक्ष रूपयाचा 'वीतराग विज्ञान' नावाचा धर्मादाय ट्रस्ट करून त्याचे उत्पन्न वीतराग देव, सिद्धान्त शास्त्र व निर्ग्रन्थ गुरू यांची उपासना व प्रभावना करण्यासाठी वापरावे असे भाव नमूद केले.

**वृक्षवल्लींची करुणा–**

भूनना वृक्षवल्लींवर अतिशय प्रेम आहे. त्यांनी आपल्या बंगल्याच्या आजूबाजूला आंबा, नारळ, लिंबू, सीताफळ, रामफळ इत्यादी फळांची व

मोगरा, चाफा, जाई जुई इत्यादी फुलांची झाडे लावून रम्य परिसर निर्माण केला आहे. निरनिराळ्या झाडांची रोपे आणून लावणे, त्याला खत पाणी घालून त्याची वाढ करणे, त्याच्या चोहो बाजूंनी सुंदर आळे तयार करणे इत्यादी कामे भून स्वत: आवडीने करीत. झाडावर कोठे रोग पडलेला दिसला की लगेच उपाय योजना करून त्याला जीवनदान देत. वृक्षाचे पुत्रवत् संगोपन करीत. दररोज भून सर्व झाडांकडे जातीने लक्ष देतात. त्यांची नजर अत्यंत तीक्ष्ण आहे. कोणतीही गोष्ट त्यांच्या नजरेआड होत नाही. झाडांना काही इजा पोहोचली तर त्यांना अत्यंत दु:ख होते.

१९८५ सालची घटना असावी. भूननी एक दिवस गडी माणसांकडून झाडाची आळी स्वच्छ करून घेतली, घराच्या पाठीमागील लंगड्या जातीच्या आंब्याच्या झाडाखाली मोठे मोठे दगड होते ते काढून घेतले खुरप्याने माती खुरपली, त्यांना भरपूर पाणी घातले. दिवसभर भूनचे काम करून घेणे चालू होते. सायंकाळी ५ वाजता गडी माणसे काम संपवून निघून गेले. मी व भून संध्याकाळचे जेवण घेण्यासाठी बसलो. अर्धे जेवण झाले असेल तोपर्यंत काहीतरी हळूच पडल्याचा आवाज आला. जेवण लगबगीने उरकून जाऊन पाहतो तर भले मोठे 'लंगडा' आंब्याचे झाड मूळासकट खाली पडले होते. ते पाहून भूनच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. या झाडाच्या नाशाला मीच कारण झाले असे त्यांना वाटू लागले. दिवसभर बसून त्याच्या मुळाच्या आजूबाजूचे दगड काढले. त्यामुळे झाडाचा आधार नष्ट झाला, माती खुरपून पाणी घातल्यामुळे झाडाच्या मुळ्या जमिनीपासून वेगळ्या झाल्या. त्यामुळे झाड पडले. बाहुबलीत ५ मिनिटात सर्वत्र वार्ता पसरली. सर्व लोक गोळा झाले. भूननी मुळांची पाहणी केली, भून करके गुरुजींना म्हणाल्या, 'अजितकुमार, हे झाड पुन्हा उभा करू. मुळ्या जीवंत असतील तर झाड टिकेल. गुरुजी म्हणाले, 'भून तुमचे काम अजबच असते. एवढे मोठे झाड उचलणे कसे शक्य आहे व ते जिवंत राहील तरी कसे? परंतु भूननी एकदा जे मनात घेतले ते पूर्ण केल्याशिवाय त्या सोडत नाहीत. प्रायश्चित्त म्हणून दुसऱ्या दिवशी भूननी पूर्ण उपवास केला. गड्यांना बोलावून



झाडाच्या सर्व फांद्या कापायला लावल्या व तीन बाजूंनी दोर बांधून ते झाड ओढून उभे करायला लावले. तिन्ही दोर तिन्ही बाजूच्या खांबांना बांधले. झाड उभे झाले; परंतु ते जगेल याची कुणालाही शाश्वती वाटत नव्हती. तथापि आश्चर्य हे की लवकरच त्या झाडाला नवीन पालवी फुटली. झाड जोमाने वाढू लागले व दुसऱ्यावर्षी झाडाला आंबेसुद्धा लागले. भूनना अतिशय आनंद झाला. भूननी केलेल्या उपकाराला न विसरता ते झाड गेल्या २५ वर्षांपासून आजपर्यंत गोड गोड फळे देऊन भूनना संतृप्त करते. ही आहे भूनची चिकाटी व झाडांवरचे खरे प्रेम.

**श्री कुन्दकुन्द सिद्धान्त भवनाची उभारणी –**

अनेकान्त शोधपीठाची स्थापना गुरुकुल दिव्यावदान समारोहाप्रसंगी सोत्साह करण्यात आली होती व पुढे श्रुतपंचमीच्या शुभ दिनी १५ जून १९८३ रोजी शोधपीठाच्या कार्याचा शुभारंभ सुद्धा झाला होता; परंतु हे कार्य प्रगतिपथावर आणण्यासाठी पुस्तकांची संग्रहात्मक लायब्ररी, आलेल्या शोधार्थ्यांसाठी स्वतंत्र खोल्या, निदेशकांना स्वतंत्र कार्यालय इत्यादींसाठी एका स्वतंत्र इमारतीची गरज होती. त्याची पूर्ती करण्यासाठी दोन मजली इमारतीचा नकाशा तयार करण्यात आला. तिच्या खालच्या मजल्यात संस्थेत येणाऱ्या अतिथींच्या भोजनादिकांची व्यवस्था व वरच्या मजल्यात सिद्धान्तभवन अर्थात 'अनेकान्त शोधपीठाचे विशाल ग्रंथालय, शोधार्थ्यांसाठी अध्ययन कक्ष, कार्यालय आदी करण्याची योजना झाली. या बृहत्योजनेची सफलता पैशाशिवाय होणे शक्य नाही व दानसंकलन केल्याशिवाय पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. या दानसंकलनाची जबाबदारी भून व भीसीकर गुरुजींच्यावरच होती. आपण प्रथम दान मांडले तर दुसऱ्यांना हक्काने सांगू शकतो 'आधी केले मग सांगितले' या उक्तीनुसार भूननी प्रथम ५००० रूपयांची देणगी प्रस्तुत इमारतीसाठी दिली व भीसीकर गुरुजी, करके गुरुजी, मुख्याध्यापक बेडगे गुरुजी या प्रत्येकांना पाच-पाच हजार रूपये दान मांडण्याची प्रेरणा केली. त्यानंतर येणाऱ्या अतिथींकडून दान मागायला सुरवात केली. या भवनासाठी अनेक उदारधी दातारांनी यथाशक्ती दान

स्वीकृती दिली. इमारतीच्या बांधकामाला सुरवात झाली. भूननी एखादा आकडा सांगितला आणि दातारांनी तो नाकारला असे क्वचितच घडले असावे. भूनच्या शब्दाला मान होता. त्यांच्या शब्दात खूप ताकत होती; वजन होते. ५ फेब्रुवारी १९८७ रोजी संस्थेचे माजी स्नातक व शून्यातून पुढे आलेले ठाणे येथील नवोदित साहसी उद्योजक श्री. बापूसाहेब मलगोंडा पाटील, माणगांवकर बाहुबली येथे क्षेत्रदर्शन व गुरुदेवांचे दर्शन घेण्यास आले होते. गुरुदेवांचे दर्शन घेऊन भूनची भेट घेण्यासाठी आले असता भूननी त्यांना दानाची सहज प्रेरणा केली. भूनना ते म्हणाले तुम्ही सांगाल तेवढी रक्कम देण्यास मी तयार आहे. तेव्हा भूनच्या सांगण्यावरून त्यांनी उदार अंत:करणाने पाच लक्ष रूपयांची बृहद्देणगी स्वीकृत केली. गुरुदेवांजवळ त्यांचे हे भव्य भाव सांगितल्यावर त्यांनाही आश्चर्य वाटले. संस्थेच्या इतिहासात एका व्यक्तीकडून व तीही येथील माजी विद्यार्थ्यांकडून उदारतापूर्ण दान स्वीकृती प्राप्त झाल्याचे हे पहिलेच आदर्श उदाहरण होते. बापूसाहेब पाटील म्हणाले 'संस्थेच्या व प. पू. गुरुदेवांच्या मंगल आशीर्वादानेच मी शून्यातून वर आलो आहे. संस्थेच्या या महान ऋणातून अल्पांशाने का होईना मुक्त होण्याचा हा माझा प्रयत्न आहे. तसेच भूनच्या सत्प्रेरणेने या नूतन भवननिर्मितीसाठी सुप्रसिद्ध उद्योगपती पद्मभूषण साहू श्रेयांसप्रसादजी जैन व साहू अशोककुमारजी जैन यांनी आपल्या 'दि टाइम्स रिसर्च फाउण्डेशन' तर्फे एक लक्ष रूपयांची उदारतापूर्ण देणगी दिली.

अशाप्रकारे उदारधी दातारांकडून एकूण १६ लाख रूपयांची देणगी या सिद्धान्त भवनासाठी प्राप्त झाली व गुरुदेवांच्या डोळ्यादेखत हे कार्य जवळ जवळ पूर्ण झाले.

**श्री कुसुमबाई मोतीचंद शहा ग्रंथालय–**

याचवर्षी दुसरे एक बृहद्दान लाभले. संस्थेच्या माजी कोषाध्यक्षा श्री. कुसुमबाई मोतीचंद शहा, मुंबई यांच्या कन्या जया, आणि सौ. रजनी पटेल, त्यांचे पती श्री. शिरीष पटेल, संस्थेचे अध्यक्ष शेठ लालचंद हिराचंद, त्यांच्या पत्नी ललिताकाकी या सर्वांचे भूनच्या वारंवार आग्रहपूर्ण



आमंत्रणामुळे दि. १२ सप्टेंबर १९८७ रोजी संस्थेत आगमन झाले. त्यांनी संस्थेच्या एकंदर प्रगतीचे व विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांचे निरीक्षण करून अत्यंत समाधान व्यक्त केले. भूननी केलेला अत्यंत प्रेमपूर्ण आतिथ्य सत्कार पाहून ते भारावून गेले व त्यांनी अतिशय प्रसन्नता व्यक्त केली. धर्ममाता भूनच्या वात्सल्ययुक्त प्रेरणेवरून आपल्या स्व. पिताश्रींच्या नावाने सुरू असलेल्या विद्यामंदिराच्या विकासयोजनेत सहर्ष सहभागी होऊन त्यांनी स्व. मातोश्रींच्या नावाने स्वतंत्र शालेय ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय बांधविण्यासाठी साडे तीन लक्ष रूपयांची उदारतापूर्ण बृहद्देणगी उत्स्फूर्तपणे स्वीकृत केली. श्री. मोतीचंद गौतमचंद व श्री. कुसुमकाकी दोघांनाही प. पू. गुरुदेवासंबंधी, भूनसंबंधी व त्याच्या एकंदर कार्यासंबंधी नितान्त आदर नि आस्था होती. मोतीचंदभाईंची प्रथम पत्नी भूनची बहिणच होती. तिला त्यांनी सोडचिठ्ठी दिली होती व कुसुमताई वालचंद दोशी यांच्याशी त्यांनी दुसरा विवाह केला होता; परंतु मोतीचंद भाईंनी भूनकडे द्वेषदृष्टीने कधीच पाहिले नाही. उलट भूनचा ज्येष्ठ भगिनीच्या नात्याने आदर व स्नेह करीत. कुसुमकाकींनाही त्यांनी ताकीद दिली होती, गजाबेनकडे सवतीची बहीण या दृष्टीने कधीही पाहू नकोस. त्यांचे व्यक्तिमत्त्व या सांसारिक नात्याहून भिन्न आहे. भूनच्या प्रत्येक विनंतीला मान देऊन त्यांची इच्छा त्यांनी पूर्ण केली. अशाप्रकारे या बृहत्दानातून विद्यालयाच्या दाराशी अत्यंत सुंदर आकर्षक दोन मजली ग्रंथालय उभे राहिले.

**गुरुदेवांचा चिरवियोग–**

३७ वर्षापासून मुनि–अवस्थेमध्ये गुरुदेवांची आत्मसाधना अव्याहतपणे निर्विघ्न चालू होती. वयाच्या ९७ व्या वर्षीसुद्धा गुरुदेवांच्या मुनिचर्येचे पालन व्यवस्थितरीत्या होत होते. एवढ्या जराजर्जर वयातही त्यांची ज्ञानोपासना व ध्यानधारणा अविच्छिन्नपणे चालू होती. उठताना, बसताना, आहाराला उभे राहताना कोणाचाही आधार न घेता सर्व क्रिया ते करीत होते. २८ जुलै १९८८ रोजी बाहुबली येथे पू. गुरुदेव प. पू. महाबल महाराज व क्षु. वीरभद्र महाराज यांच्या चातुर्मासाची स्थापना झाली.

चातुर्मास स्थापनेनंतर दोन दिवसात वीरशासन जयंती होती. या वीर शासन जयंतीपासून एक वर्षभर साऱ्या भारतभर 'आचार्य कुन्दकुन्द द्विसहस्राब्दी महोत्सव' साजरा करण्यात यावा अशी प. पू. राष्ट्रसन्त विद्यानंद महाराजांची हार्दिक मनीषा व संयोजना होती. कुप्पानवाडी कोथळी येथील शान्तिगिरीवर त्यांचा चातुर्मास होता. ३० जुलै रोजी वीरशासनजयन्तीस त्यांच्या पावन सानिध्यात या महोत्सवाचा शुभारंभ झाला. त्यानिमित्ताने देशभरातील सर्व दिग्गज विद्वानांना आमंत्रित करून दोन दिवस विद्वत्संगोष्ठी व अन्य कार्यक्रम आयोजित केले होते. या कार्यक्रमास विश्वविख्यात प्रवक्ता डॉ. हुकुमचन्द भारिल्ल, डॉ. बलभद्र जैन, राजाराम जैन, भरतकुमार काला इत्यादी विद्वान् व साहू श्रेयांसप्रसादजी, साहू अशोककुमारजी, बाबूलालजी पाटोदी इत्यादी श्रेष्ठीगणांचे मंगल आगमन कोथळी येथे झाले होते. ही सर्व मंडळी तेथून बाहुबली येथे तीर्थक्षेत्राचे दर्शन व गुरुदेवांचे मंगल आशीर्वाद घेण्यासाठी आली होती. त्यांच्याबरोबर गुरुदेवांची हसतमुखाने अत्यंत मुक्तपणे चर्चा झाली. १५ दिवसानंतर काही अकल्पित घटना घडेल असे गुरुदेवांच्या प्रकृतीकडे पाहून कोणालाही वाटले नाही. डॉ. हुकुमचन्द भारिल्ल यांनी ८ ऑगस्टपासून जयपूर येथे सुरू होणाऱ्या आध्यात्मिक शिक्षण शिबिराचे भूनना व सर्व कार्यकर्त्यांना सादर आमंत्रण दिले. गुरुदेवांना या वयात सोडून जाण्याचे भूनना साहस होत नव्हते; परंतु गुरुदेवांनीच सांगितले की 'तुम्ही बेलाशक जा. माझी प्रकृती बरी आहे. माझी काळजी करू नका.' गुरुदेवांच्या या वचनानी निर्धास्त होऊन शिबिराचा लाभ घेण्यासाठी मी, भून व काही मंडळी जयपूरला गेलो. आम्ही निघून गेल्यावर १० ऑगस्टपासून गुरुदेवांना ताप यायला सुरवात झाली. सतत ३-४ दिवस ताप उतरत नव्हता, त्यात गुरुदेवांनी चतुर्दशीचा उपवास केला. त्यामुळे खूप अशक्तपणा जाणवत होता. तसे जयपूरला जाताना भूननी सौ. चतुरमावशी, आमची आई सौ. सुलोचना रोटे, विमलाक्का मार्ले व पणदरे येथील महाराजांचे पट्टशिष्य आनंदभाई यांच्यावर गुरुदेवांच्या सेवेची जबाबदारी सोपविली होती. भूनच्या गैरहजरीमध्ये गुरुदेवांची ही अवस्था पाहून सर्वजण घाबरले. भीसीकर



गुरुजींनाही भून नसल्यामुळे चिंता वाटू लागली. एरव्ही भून गुरुदेवांची काळजी घेत असल्यामुळे ते निश्चिंत असायचे. गुरुदेवांनी त्यांना सांगितले, 'गजाबेनना किंवा इतर कोणालाही काहीही कळवू नका. तरीसुद्धा न राहवल्यामुळे भीसीकर गुरुजींनी १४ ऑगस्ट १९८८ रोजी जयपूरला टेलिफोन करून भूनना गुरुदेवांचा समाचार कळविला व रात्री पुन्हा फोननी कळवतो असे म्हणाले. समाचार समजताच एका क्षणाचाही विलंब न करता जयपूरहून आम्ही रवाना झालो. त्यावेळी कॉम्प्युटर, ई मेल वगैरेची सोय नसल्यामुळे तत्काल रिझर्वेशन मिळणे अवघडच होते; परंतु कशाचीही पर्वा न करता आग्र्यामार्गे झेलम एक्सप्रेसने १५-८-१९८८ ला पुण्याला येऊन पोहचलो. तेथे जेवण वगैरे उरकून सह्याद्रीने निघून १६ तारखेस पहाटे बाहुबलीला सुखरूप येऊन पोहोचलो. गुरुदेवांचे दर्शन घेतल्यावर मनाला समाधान वाटले. गुरुदेव एक शब्दही कोणाबरोबर बोलले नाहीत. भूननाही काही विचारले नाही. १६ तारखेस गुरुदेवांना आहार दिला. तापामुळे व कफामुळे घशात चिकटपणा झाल्यामुळे गिळता येत नव्हते. कोणाचाही आधार न घेता त्यांनी उभे राहून आहार घेतला. आहारानंतर भूननी त्यांना जीभ व घसा गरम पाण्यांनी स्वच्छ करायला लावले व दुपारी एनिमा दिला. त्यामुळे त्यांना समाधान वाटले. १७ तारखेला महाराज आहाराला उठतील म्हणून वाट पाहिली; परंतु ते आहाराला उठण्यास तयार होईनात. प. पू. महाबल महाराजांनी सांगून पाहिले, आग्रह केला तरी मौन धरून आपल्या आत्मसाधनेतच लीन राहिले. शेवटी प. पू. महाबल महाराजांनी विचारले. 'आज आपण उपवास करणार आहात काय? तेव्हा गुरुदेवांनी होकार दिला व त्यांच्या साक्षीने चारी प्रकारच्या आहाराचा त्याग केला. १७ तारखेस कारंजाहून महाराजांचे प्रिय शिष्य ब्र. तात्याजींचे आगमन झाले. ते गुरुदेवांच्या दर्शनास गेल्यावर त्यांच्याशीसुद्धा ते काहीही बोलले नाहीत. नेहमी आल्यानंतर प्रश्न विचारून संस्थेची चौकशी करणारे गुरुदेव आज गप्प कसे याचेही त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी पोटावर काळी माती ठेवण्याचा प्रयत्न केला, पण महाराजांनी त्यास नकार दिला. प्रकृतिस्वास्थ्यावरून

आपला अंतकाळ जवळ आला आहे हे त्यांनी जाणले असावे. म्हणूनच त्याची कोठेही वाच्यता न करता, सर्व संस्था व शिष्य परिवाराचा मोह दूर सारून स्वत:मध्ये राहून अंतिम समाधिमरण साधण्याचे त्यांनी मनामध्ये निश्चित केले असावे. १७ तारखेस ताप नव्हता; परंतु अशक्तपणा जाणवत होता. डॉक्टरांनी नाडी पाहून सांगितले, यांना आता कोणताही आजार नाही. उद्या पाणी घेतले की बरे वाटेल. ते ऐकून आम्ही रात्री निश्चिंतपणे झोपी गेलो. सकाळी अंथरूणातून उठण्यापूर्वीच आनंदभाईनी हाक मारली. जाऊन पाहतो तर गुरुदेव नश्वर शरीर शवासनामध्ये सोडून आमच्यातून निघून गेले होते. ज्यांच्या सेवेसाठी आपल्या आयुष्याची ४।। तपे व्यतीत करून आपले सर्वस्व समर्पण केले होते त्या गुरुदेवांचा वियोग भूनना असह्य होता; परंतु तो व्यक्त न करता धैर्य धरून शांती ठेवण्याचा त्यांनी पूर्ण प्रयत्न केला. त्यांनी इच्छिले होते तसे शान्त समाधिमरण त्यांना लाभले एवढेच समाधान. वर्तमान काळातील एक युगप्रवर्तक, चिन्तनशील विचारक, गुरुकुल प्रणालीचे प्रभावी प्रवर्तक, मानवतेचे थोर उपासक व आम्हा सर्वामागची एक तेजस्वी प्रेरणादायी चेतना निघून गेल्यामुळे सर्व वातावरण उदास झाले होते.

गुरुदेवांच्या स्वर्गवासाचे वृत्त नभोवाणी व दूरध्वनीवरून वाऱ्यासारखे प्रसृत होताच लोकांची प्रचंड रीघ बाहुबलीकडे लागली. मिळेल त्या वाहनाने अगर चालत त्यांचे अन्त्यदर्शन घडावे या भावनेने प्रत्येकजण येण्याची घाई करीत होता. हजारो लोक दर्शनार्थ आले होते. बरोबरच आहे जो कीर्तीपासून दूर पळतो त्याच्या पाठीमागेच कीर्ती लागते. २५ डिसेंबर १९७३ रोजी त्यांनी आपल्या एका डायरीत अन्तिम सल्लेखनेसंबंधी आन्तरिक भाव लिहून ठेवले होते हे रात्रंदिवस त्यांच्या सेवेत असणाऱ्या क्षु. वीरभद्र महाराजांना तेवढेच माहीत होते. त्यांनी गुरुदेवांच्या स्वर्गवासानंतर सर्वांना दाखविले 'त्याचा भाव असा की- सल्लेखनेवेळी अधिक माणसे गोळा करू नयेत. ४-५ माणसेच असावीत. सुखपूर्वक वीरमरण जनसमाज गोळा करून साधणार नाही.'

त्यांच्याजवळ शेवटी त्यांच्या इच्छेनुसार चारच माणसे होती- क्षु.



वीरभद्र, आनंदभाई, श्रीधर अण्णा व भूपाल अण्णा.

'उर्ध्वक्रियासुद्धा साध्यारीतीने करावी, मिरवणूक विमान, अभिषेक सवाल आदी अवडंबर काही करू नये. स्वतंत्र स्मारक उभारू नये. गुरुकुल हेच महाराजांचे स्मारक आहे.' हे ही त्यात नमूद केले होते. त्यांच्या इच्छेप्रमाणेच दुपारी ३-३० वाजता त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गुरुदेव गेले; परंतु त्यांची ओंकारध्वनी आजसुद्धा कानात घुमते. व्यक्ती गेल्या तरी त्याच्या स्मृतिमात्र मानसपटलावर अंकित होतात. खरचं गुरुदेवांनी आग्रहाने येथे ठेवून घेतले नसते तर ही अज्ञबालिका कोठे भटकली असती याची कल्पनाच करवत नाही. त्यांच्या उपकाराचे स्मरण झाल्यावर मस्तक त्यांच्या चरणी नतमस्तक झाल्याशिवाय राहत नाही. भूनसुद्धा नेहमी म्हणतात, मी माझ्या शीलाच्या रक्षणासाठी संस्थेचा व गुरुदेवांचा आश्रय घेतला. गुरुदेवांसाठी मी येथे राहिले नाही तर स्वत:च्या कल्याणाच्या स्वार्थापोटीच मी येथे राहिले. आता रडत बसून उपयोग नाही. गुरुदेवांनी लावलेल्या गुरुकुलवृक्षाचे संगोपन व संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. ते कर्तव्य पार पाडले तर त्यांना खरी श्रद्धांजली वाहिल्यासारखे होईल.

**वेरूळ येथील पार्श्वनाथ गुरुकुलास योगदान –**

प. पू. महाराजांनी स्थापन केलेल्या सर्व गुरुकुलासंबंधी भूनना आत्मीयता होती व सर्व गुरुकुलवासीसुद्धा भूनना गुरुकुल माता मानत होते. जेथे अडचणी निर्माण होतील तेथील लोक सरळ मातेच्या चरणी शरण येत असत. माताही वात्सल्याने त्यांच्या अडचणी दूर करीत असे. वेरूळचे संचालक पन्नालालजी गंगवाल यांच्यावर असहिष्णू लोकांनी अनेक खोटे आरोप केले. त्यावेळी भूननी खंबीरपणे त्यांची बाजू घेऊन त्यांची निर्दोषता सिद्ध केली. वेरुळ गुरुकुलाच्या विकासामध्ये भूनचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

१८ व १९ फेब्रुवारी १९८९ रोजी वेरूळ येथे प. पू. तीर्थरक्षाशिरोमणी १०८ आर्यनंदी महाराजांच्या पावन सानिध्यात भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

पन्नालालजींनी भूनना खास बोलाविले होते. याप्रसंगी भारतातील बरीच प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता श्री साहू श्रेयांसप्रसादजींच्या शुभहस्ते संस्थेच्या नूतन विद्यामंदिर इमारतीचा कोनशिला समारंभ व साहू अशोकजींच्या हस्ते श्री चुन्नीलाल साहूजी आरोग्यधामाचे उद्‌घाटन झाले. मुलामुलींचे कवायतीचे प्रेक्षणीय कार्यक्रम झाले. दोरीवरील आसनांची व लेझीम आदींची प्रात्यक्षिके बहारदार होती.

मंचावर सर्व प्रतिष्ठित मान्यवर अभ्यागत विराजमान होते. भून एकेकांच्याजवळ जाऊन काहीतरी कानामध्ये कुजबुजत होत्या व ते त्यांना होकारार्थी मान हालवत होते. हे दृश्य समोरील श्रोतृवृंद पहात होता. एवढ्यात मंचावरून श्री पार्श्वनाथ गुरुकुलाच्या विकास योजनेतील नूतन दुमजली छात्रावास व विद्यामंदिराच्या भवननिर्माणासाठी दानघोषणा ऐकू येऊ लागल्या. अध्यक्ष श्री. साहू अशोकजी यांच्याकडून अडीच लाख, साहू श्रेयांसप्रसादजी यांच्यातर्फे एक लक्ष, श्री. रतनलालजी गंगवाल यांच्याकडून दीड लक्ष, श्री. अरविंद दोशींच्याकडून एक लक्ष, श्री. जयचंदजी लोहाडेमार्फत तीन लक्ष, बाबूलालजी पहाडेकडून दोन लक्ष इत्यादी दानाचा वर्षाव होऊ लागला. तत्काल लक्षात आले की अचानक दानवृष्टी पाडण्याची किमया भूनचीच. १० ते १५ मिनिटात १६ लाख रूपयांची दानस्वीकृती प्राप्त झाली. सर्व गुरुकुल वासीयांना अतिशय आनंद झाला व भूनच्या शब्दामध्ये किती सामर्थ्य आहे याची सर्वांना प्रचीती झाली.

भूनचे कोणतेही काम मोघमात असत नाही. स्पष्टपणे बोलून ताबडतोब प्रकरण निकालात काढण्याची त्यांची सवय ही प्रथमदर्शनी लोकांना अरुचिकर वाटत असली तरी त्याचा लाभ नंतर समजत असे.

**भगवान बाहुबली महामूर्तीचा रौप्यमहोत्सवी मस्तकाभिषेक –**

प. पू. समंतभद्र महाराजांच्या हयातीत बाहुबली बृहन्मूर्तीचा महामस्तकाभिषेक सोहळा १९८९ साली करण्याची योजना आखली होती. १९६३ साली बृहन्मूर्तीची स्थापना होऊन आता २५ वर्षे पूर्ण झाली होती. त्यामुळे हा रौप्यमहोत्सवी अभिषेक करण्याचे निश्चित झाले होते. अचानक



१८ ऑगस्ट १९८८ साली गुरुदेवांचा स्वर्गवास झाला. त्यांच्या अनुपस्थितीत एवढे मोठे कार्य कसे पार पडणार असा प्रश्न कार्यकर्त्यांच्या पुढे होता; परंतु भूननी पुढाकार घेतला व त्या म्हणाल्या 'गुरुदेवांच्या उपस्थितीत योजलेले मंगल कार्य आपण उत्तमरीतीने पार पाडू. गुरुदेव गेले म्हणून धर्मकार्य थांबवायचे नाही.' पंचवीस वर्षानंतर हा महामस्तकाभिषेक असल्यामुळे लाखो लोकांची गर्दी होणार. लोकांची भोजनव्यवस्था व निवासव्यवस्थेसाठी ४–५ लाख रूपयांचा खर्च येईल असा अंदाज होता.

भूननी मुंबई, पुणे, बेळगाव, सांगली, कोल्हापूर येथे दौरा काढला व ११०००, ५०००, २५०१, १००१ रू.चे कलश खपवून ३ लाखावर दानराशी गोळा केली. मुंबईचे सेठ शशिकांत वालचंद शहा व त्यांच्या धर्मपत्नी ब्रह्मा यांच्यावर अभ्यागत प्रतिष्ठित पाहुण्यांची व्यवस्था व येणारा खर्च दोन्ही कामे सोपविली. शरयूताई दफ्तरी संस्थेच्या अध्यक्षा असल्यामुळे त्यांनीही पुढाकार घेऊन हा महोत्सव यशस्वी पार पाडण्यास पूर्ण सहकार्य केले.

२१ ते २३ एप्रिल १९८९ पर्यंत आचार्य विद्यानंद महाराजांच्या तत्त्वावधानात व प. पू. समंतभद्र महाराजांचे शिष्य प. पू. महाबल महाराज, क्षु. वीरभद्र महाराज आदी त्यागीगणांच्या उपस्थितीत हा महोत्सव संपन्न झाला. २२–४–१९८९ रोजी सकाळी ९ वाजता बाहुबली मंदिरासमोरील मानस्तंभस्थित जिनबिंबाचा २५ वर्षानंतर महाभिषेक १०८ कलशांनी करण्यात आला. त्याच दिवशी दुपारी आचार्य कुन्दकुन्द द्विसहस्राब्दी निमित्त विद्वत्संगोष्ठी आयोजित करण्यात आली होती. २३ तारखेला दुपारी महामूर्तीचा १००८ कलशांनी मस्तकाभिषेक प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत संपन्न झाला. मोठ्या मूर्तीचा दररोज अभिषेक करणे कठीण असते, म्हणून त्याच्यावर चढलेली धूळ साफ करून मूर्ती स्वच्छ व्हावी व त्यानिमित्ताने लोकामध्ये जागृती होऊन जिनशासनाची प्रभावना व्हावी, या हेतूने दर १२ वर्षांनी मोठ्या मूर्तीचा अभिषेक करण्याची प्रथा पडली असावी.

**प. पू. समन्तभद्र महाराजांच्या चरणपादुकांची स्थापना –**

प. पू. समंतभद्र महाराजांच्या निर्याणानंतर त्यांचे स्मारक उभे करावे

अशी बऱ्याच लोकांची सूचना होती. प. पू. महाराजांनी आपल्या डायरीमध्ये लिहून ठेवले होते. की 'महाराजांचे स्वतंत्र स्मारक उभे करू नये. सारी गुरुकुलेच महाराजांची स्मारके आहेत.' तरीसुद्धा येणाऱ्या भक्ताला महाराजांचे दर्शन घेण्याचे भाव होणारच. त्यासाठी काहीतरी करावे म्हणून भूनी एक योजना आखली. जेथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आला तेथे लाल दगडांनी नेहरूजींच्या शान्तिस्थलीसारखे स्थान निर्माण करावे की ज्या निसर्गरम्य शांत वातावरणात बसून दर्शनार्थी भक्त ध्यान धारणा, प्रार्थना इ. करू शकेल व महाराजांना जे ग्रंथ आवडत होते व ज्यांचा ते नित्यपाठ करीत होते ते ग्रंथ संगमरवरी फरशीवर उत्कीर्ण करून तेथे बसवावेत अर्थात एक आगममंदिरच निर्माण करावे व त्याठिकाणी मध्यभागी कमलासनावर गुरुदेवांच्या चरण पादुकांची स्थापना करावी. त्यासाठी भूनी प्रथम स्वत: दान मांडून सर्व संस्थेतील कार्यकर्ते, शिक्षक, माजी विद्यार्थ्यांकडून दान गोळा केले.

कृतसंकल्पानुसार कामाला सुरवात झाली. घडीव लाल दगडाने चबुतरा व लाल दगडाचेच प्रवेशद्वार निर्माण झाले. भूनी स्वत: जातीने लक्ष घालून काम करवून घेतले. कमलासन व पादुकाही लाल दगडाच्याच निर्माण करायला सांगितल्या होत्या. त्या तयार होऊन आल्या; परंतु भूना त्या पसंत पडल्या नाहीत. कारण त्यात रेखीवता व सौंदर्य नव्हते. मग दुसऱ्या काळ्या पाषाणाच्या करून आणल्या त्याही पसंत पडल्या नाहीत. शेवटी भानूभाई कारागिराला गुजरातमध्ये पाठवून स्वत:च्या मनासारखे सुंदर कमल व चरणपादुका करवून आणण्यास सांगितले. कामाला वेळ लागला तर चालेल; परंतु केवळ काम उरकून टाकणे भूना पसंत नव्हते. आगम खोदण्यासाठी दीर्घकाळ लागणार होता. म्हणून 'गुरुचरणपादुका प्रतिष्ठापनेचा' मंगल समारोह प. पू. आचार्य विद्यानन्दी महाराज, प. पू. महाबल महाराज, प. पू. जयभद्र महाराज यांच्या उपस्थितीत २६ ते २८ मे १९९० या तीन दिवशी आयोजित करण्यात आला. समाधि शान्तिस्थळीच्या शेजारीच समंतभद्र स्मृतिमंदिर ही तयार करण्यात आले. प. पू. गुरुदेवांच्या नित्य वापरातील वस्तू तसेच विविध काळातील त्यांची दुर्मिळ छायाचित्रे या स्मृतिमंदिरात ठेवण्यात आली असून दर्शनार्थ्यांना ती एकत्र पाहावयास



मिळावी व त्यातून त्यांचे जीवनचरित्र व कार्य लक्षात यावे अशी सोय तेथे करण्यात आली.

हे स्मृतिमंदिर भूनच्या सत्प्रेरणेने संस्थेतील जिव्हाळ्याच्या सेवाशील महिला ध. श्री. विमलाक्का दिग्गे यांनी आपले दिवंगत पती गुरुकुलाच्या पहिल्या पिढीतील स्नातक स्व. विमलकुमार उर्फ धनपाल दिग्गे यांच्या स्मरणार्थ बांधून दिले. विवाहानंतर अवघ्या तीन वर्षातच कॅन्सरने त्यांचा वियोग झाला होता. तेव्हापासूनच श्री. विमलाक्कांनी आपले जीवन धर्माराधना व गुरुसेवेत शांतिपूर्वक व्यतीत केले. आपल्याजवळील अल्पधनाचा विनियोग गुरूंच्या स्मृतीसाठी खर्च करून त्यांनी ते सार्थकी लावले आहे. विमलाक्कांच्या वडिलांनी शेवटी जाताना भूना म्हटले, 'विमलला मी तुमच्या ओटीत घालत आहे. तिला तुम्ही सांभाळा' भूनी त्यांना तसे वचन दिले. दिलेल्या वचनाप्रमाणे भूनी त्यांना आपली मुलगी समजून शेवटपर्यंत सांभाळले. त्यांच्याजवळ तुडूक मूडूक असलेले चांदी व सोने विकून त्यांच्या नावावर पैसे ठेवून त्यांना स्वावलंबनाने जगता यावे अशी सोय करून दिली. २० मार्च २००७ ला येथेच त्यांचा नियम सल्लेखनेपूर्वक स्वर्गवास झाला.

याच गुरुचरणपादुका प्रतिष्ठापनेप्रसंगी २८ मे रोजी श्रवणबेळगोळ व मूडबिद्री येथील मठाधीश स्वस्तिश्री चारूकीर्ती भट्टारकद्वयांच्या करकमकले 'सिद्धान्त भवन व अनेकान्त' शोधपीठ या नूतन वास्तूचे उद्‌घाटन करण्यात आले.

गुरुदेवांच्या उपस्थितीत योजलेल्या सर्व कार्यांची पूर्तता भूनी केली याचे सर्वांना समाधान वाटले. भून कोणतेही कार्य करताना ख्याती, पूजा, लाभाची अपेक्षा न ठेवता नि:स्पृह भावनेने संस्थेच्या सेवेत रत राहिल्या.

**स्तवनिधी गुरुकुलामध्ये योगदान -**

१९३४ साली क्षु. चंद्रसागर महाराजांनी स्थापन केलेली ही संस्था अधिक सुचारूरूपाने चालण्याकरिता १९३८ साली बाहुबली ब्रह्मचर्याश्रम संस्थेत अंतर्भूत करण्यात आली. समंतभद्र महाराज क्षुल्लक अवस्थेत असताना अधून-मधून येथे चक्कर टाकीत असत. हळूहळू संस्थेचा विकास होत गेला. मुनिदीक्षेनंतर भाग्योदयाने सन १९६० च्या फेब्रुवारीमध्ये

महाराजांचे या संस्थेत शुभागमन होऊन सुमारे एक महिना वास्तव्य होते. या काळात स्वतंत्र श्री सहस्रफणी पार्श्वनाथ जिनमंदिर बांधण्याच्या मंगल कार्याचा शुभारंभ झाला. याचवेळी संस्थेला स्थायी स्वरूप प्राप्त होण्याच्या दृष्टीने ध्रुवनिधीची योजना आखण्यात आली. भून व शांतिकुमार गुरुजींनी गावोगाव फिरून अवघ्या वीस दिवसात त्याकाळी दीड लाखाची दानस्वीकृती या निधीसाठी मिळविली. पुढेही वेळोवेळी संस्थेच्या उत्कर्षामध्ये भूननी हातभार लावला आहे.

श्री अतिशय क्षेत्र स्तवनिधी येथे श्री. पार्श्वनाथ भगवंतांची महामूर्ती स्थापन करावी अशी गणपतराव रोटे व नेमिनाथ रोटे यांच्या वृद्ध मातोश्रींची आंतरिक इच्छा होती. १९७० साली प. पू. देशभूषण महाराजांच्या शुभाशीर्वादाने ही मूर्ती प्राचीन क्षेत्राच्या मागील पहाडावर उभी करण्याची योजना आखण्यात आली; परंतु प. पू. देशभूषण महाराजांचा उत्तरेकडे विहार झाल्यामुळे या कामाला गती मिळाली नाही. पुढे १९८० साली समंतभद्र महाराजांनी पत्राद्वारे रोटे बंधूद्वयांना ही मूर्ती पुणे, बेंगलोर रोडवर गुरुकुलाच्या हद्दीत बसविण्याची प्रेरणा केली. यामुळे मूर्तीचे संरक्षण होईल व येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना महामूर्तीचे दर्शनही घडेल. हे पत्र देशभूषण महाराजांना दाखवून त्यांची संमती घेतली. १९८२ साली मूर्ती तयार करण्यास ऑर्डर दिली. १९८३ साली मूर्ती तयार होऊन स्तवनिधीकडे आणण्यात आली. मार्गात वठारहून पेठ वडगावमार्गे महामूर्ती प्रथम बाहुबलीस आणण्यात आली. तेथे प. पू गुरुदेवांनी मूर्तीचे निरीक्षण केले व तिची एकंदर सुंदर घडण व मनोज्ञता पाहून अत्यन्त समाधान व्यक्त केले. गुरुकुलाला लागून असणारी गव्हाण येथील जैनापुरे बंधूंची जागा मूर्ती उभी करण्यासाठी खटपट करून मिळविली. ४ मे १९८४ मध्ये चंदगडे अण्णांच्या हस्ते पाया खोदण्यात आला. भूनच्या प्रेरणेने धर्मस्थळचे धर्माधिकारी वीरेन्द्र हेगडे व त्यांच्या मातोश्री रत्नाम्मा हेगडे पाया भरणी समारंभासाठी लाभले. ११ मे १९८४ रोजी पायाभरणी समारंभ संपन्न झाला. या दोन्ही कार्यक्रमास भूननी उपस्थित राहून पाहुण्यांचे योग्य आदरातिथ्य केले. ११-२-१९८५ रोजी शुभमुहूर्तावर विधिपूर्वक मूर्ती उभी करण्यात आली. भून व गुरुदेवांच्या



प्रेरणेवरून रोटे बंधूंनी महामूर्ती भोवती कमलासन करून देण्याचे सहर्ष मान्य करून त्यासाठी ५१ हजार रू.ची देणगी दिली. याप्रमाणे प्रस्तुत कार्याला गती मिळाली. मूर्तीच्या सभोवती मोठा तट बांधणे, पायऱ्या बांधणे, जागा व्यवस्थित करणे या सर्व कार्यासाठी ३-४ वर्षे लोटली. १८ ऑगस्ट १९८८ रोजी गुरुदेवांचा स्वर्गवास झाला; परंतु तत्पूर्वी त्यांनी महामूर्तीच्या प्रतिष्ठापनाची जबाबदारी प. पू. विद्यानन्दी महाराजावर सोपविली होती.

महाराजांची प्रेरकशक्ती गेल्यामुळे भून न खचता अपूर्ण राहिलेले कार्य पूर्णत्वास नेण्याकरिता कटिबद्ध होत्या. वरचेवर स्तवनिधीला जाऊन कामाची पाहणी करून योग्य तो सल्ला देणे, कार्यकर्त्यांना कार्य करण्यासाठी प्रोत्साहित करणे, दान संकलन करणे इत्यादी कार्ये त्यांनी आत्मीयतेने केली. ही सर्व एकाच बापाची लेकरे आहेत यामध्ये भूननी कधीही दुजाभाव केला नाही. रोटे आण्णासुद्धा कार्यकर्ते ऐकत नसतील तर भूनकडे येणार व म्हणणार आक्का तुम्ही सांगितले तर हे काम होते. रोटे बंधूंना सौधर्म इन्द्रपद देण्यासाठी कार्यकर्त्यांना समजावून सांगण्याचे काम भूनचेच. कार्यकर्त्यांमध्ये वादविवाद निर्माण झाला तर त्यांच्यामध्ये सामंजस्य व समन्वय करण्याचे काम भूनचेच. भीसीकर गुरुजींना महाराज गेले तरी या मोठ्या भगिनीचा मोठा आधार होता.

२८ जानेवारी १९९० ते ३ फेब्रवारी १९९० या काळात पार्श्वनाथ महामूर्तीचा पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव वैभवपूर्ण सोहळ्यात सानंद संपन्न झाला. समंतभद्र महाराजांच्या मंगल आदेशाचे पालन व्हावे या हेतूने आचार्यश्री विद्यानन्दी महाराज तसेच प. पू. महाबल महाराज व प.पू. जयभद्र महाराज यांचे दि. २७ जानेवारीलाच स्तवनिधी येथे शुभागमन झाले व त्यांच्या अधिनेतृत्वात ही प्रतिष्ठापना विविध धार्मिक उपक्रमपूर्वक संपन्न झाली. भूनचे ८ दिवस येथेच वास्तव्य होते. ही प्रतिष्ठापना निर्विघ्न पार पाडण्यासाठी त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याचवेळी श्री पार्श्वनाथ गुरुकुलाला ५० वर्षे झाल्यामुळे त्याचा सुवर्ण महोत्सवही साजरा करण्यात आला.

**कंकुबाई श्राविकाश्रमाच्या उन्नतीमध्ये सिंहाचा वाटा –**

प. पू. समंतभद्र महाराज नेहमी म्हणत, 'श्रेयांसि बहुविघ्नानि' कोणतेही एखादे चांगले काम करायचे म्हटले की त्यामध्ये विघ्ने येतातच. अनेक काटे टोचल्याशिवाय गुलाबाचे फूल प्राप्त होत नाही. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.' तद्वत् मुलींच्या कल्याणासाठी रात्रंदिवस झटत असतांना मंजुताईंना अनेक संकटाचा सामना करावा लागला. मुलांच्या शेकडो संस्था सांभाळणे सोपे आहे; परंतु मुलींची एक संस्था चांगली सांभाळणे सोपे नाही. महाराजांनी मुलांची १२ गुरुकुले स्थापन केली; परंतु मुलींचे एकच आश्रम स्थापन केले. यावरूनच ही गोष्ट लक्षात येते. घरी दोन महिला असतील तर त्यांचे एकमेकीशी जमणे कठीण असते. आश्रमात तर शंभर गावच्या महिला एकत्र आलेल्या, कार्यकर्त्या महिलांची, स्वयंपाकीण बायांची व मुलींची तऱ्हा सांभाळून संस्था चालविणे म्हणजे तारेवरची कसरत असते. शांतस्वभावी, सहन शीलतेची मूर्ती असणाऱ्या मंजाताई सर्वांचे दोष पोटात घालून सर्वांना जमवून घेत होत्या; परंतु माणसाच्या सहनशीलतेलाही काही मर्यादा असतातच. शाळेतील एका शिक्षिकेच्या त्रासाने त्रस्त होऊन भांडणाच्या भीतीने त्यांच्या अंगाचा थरकाप उडून त्यांना कंपवाताचा त्रास सुरू झाला. त्याही अवस्थेत मंजाताई तसेच काम रेटत होत्या; परंतु त्यांनी स्वत:च्या प्रकृतीची कधीही तक्रार सांगितली नाही. भूनना मात्र आपल्या या धाकट्या भगिनीचे हाल पाहवत नव्हते. शाळेची मुख्य शिक्षिकाच संस्थेच्या विरोधी झाल्यामुळे निकालावर त्याचा परिणाम झाला. शाळेचे निकाल खूप कमी लागू लागले. त्यामुळे दिवसेंदिवस ताईंचा आजार वाढत चालला होता.

प. पू. महाराजांच्या स्वर्गवासानंतर भूनना कारंजाला एक महिना राहण्याचा अवकाश मिळाला. श्राविकाश्रमाचे होत असणारे अध:पतन पाहून भूनचा जीव कळवळला. यातून काही ना काही मार्ग काढलाच पाहिजे. संस्थेच्या विकासासाठी व दीर्घ जीवनासाठी आताच प्रयत्न केले नाहीत तर एक दिवस संस्था बंद करण्याची वेळ येईल. आपल्या जीवात जीव असेपर्यंत हे होऊ द्यायचे नाही. त्यांनी गावातील होतकरू व सुशिक्षित तरुण महिलांची



मिटिंग बोलावली व त्या मिटिंगमध्ये सर्वांपुढे प्रस्ताव मांडला, 'मुलींना सुशिक्षित व सुसंस्कारित करणे ही आजच्या काळाची गरज आहे, एक मुलगी सुधारली तर ती दोन घरे सुधारू शकते. हे अतिशय लोकोपकारी महान कार्य आहे. स्त्रीचा विकास झाल्याशिवाय समाजाच्या व देशाच्या विकासाचे स्वप्न पाहणे निरर्थक आहे. आता मंजाताई आजारामुळे कार्य करण्यास असमर्थ झाल्या आहेत. तरी तुम्ही सर्व महिलांनी मिळून ही त्यांची कार्यधुरा आपल्या खांद्यावर घेऊन त्यांना निश्चिन्त करावे.' केवळ प्रस्ताव मांडून भून शान्त राहिल्या नाहीत. तर प्रत्यक्ष कार्य करण्यास त्यांनी प्रारंभ केला. एकूण कार्यांची यादी करून व त्या कार्यांची विभागणी करून त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुसार प्रत्येकांवर जबाबदारी सोपविली. कारंजासारख्या ठिकाणी भूनचा शब्द म्हणजे गुरुदेवांच्या आज्ञेच्या तोडीचा मानला जातो. प. पू. समन्तभद्र महाराज, ब्र. माणिकचंद चवरे (तात्याजी) व भून ही तीन कारंजावासीयांची श्रद्धास्थाने आहेत. भूनबद्दल आदरयुक्त भीतीही आहे. त्यामुळे त्यांचा शब्द उल्लंघण्याचे साहस कोणामध्येही नव्हते. सर्वांनी भूनना सहर्ष स्वीकृती देऊन कार्यास प्रारंभ केला. त्यामध्ये सर्वात अग्रस्थानी होत्या सौ. प्रज्ञाताई डोणगावकर. यांच्यावर भूनचा अधिक विश्वास आहे. दोन्ही घराण्याचा खानदानीपणा लाभलेली, कुशाग्र बुद्धिशाली, कार्यकुशल, सामंजस्याने समन्वय साधणारी, सहनशील, धीर, गंभीर प्रज्ञा आपली मनीषा पूर्ण करेल यात त्यांना संशय नव्हता. भूनची आज्ञा शिरोधार्य मानून प्रज्ञाताईही श्राविकाश्रमाच्या उन्नतीसाठी कार्यरत झाल्या. आपल्या संसाराचा प्रपंच सांभाळून श्राविकाश्रमाच्या विकासाची एक-एक पायरी पुढे चढत राहिल्या. हळूहळू शाळेचा निकालही उंचावत गेला.

आता माध्यमिक शाळेमध्ये मुलींची भरती वाढल्याने तुकड्या वाढणे साहजिकच होते. त्यामुळे शाळेची इमारत अपुरी पडू लागली. यापूर्वी १९८६ मध्ये शाळेच्या पाठीमागील मोकळ्या जागेमध्ये इमारतीचा पायाभरणी समारंभ भूनच्या हस्तेच संपन्न झाला होता. थोड्याच दिवसात अनेक दातारांनी उदार अंत:करणाने दिलेल्या निधीतून प्राथमिक विभागाच्या

४ वर्ग खोल्या बांधण्यात आल्या. प्राथमिक विभाग नूतन इमारतीमध्ये स्थानांतरित झाल्यामुळे तेवढी जागा माध्यमिक विभागास उपलब्ध झाली.

आश्रमातील मुलींचे भोजनगृह अत्यंत अरुंद, अव्यवस्थित व अंधुक प्रकाशयुक्त होते. या लहानशा भोजनशाळेत संस्थेने ५० वर्षे विद्यार्थिनींना गोड घास करून घातले. तसेच मुलींचे वसतिगृहही असुविधायुक्त व अप्रशस्त होते. स्वच्छताप्रिय व सौंदर्यप्रिय भूनच्या दृष्टीला हे सारे रुचत नव्हते. सर्व सुविधायुक्त प्रशस्त भोजनगृह व वसतिगृहाची अत्यंत गरज होती; परंतु विकास करावा म्हटले तर संस्थेची जागा अपुरी पडत होती. संस्थेला लागून दुसऱ्यांच्या मालकीची सरस्वती भवनाची जागा होती. भूनची तिकडे दृष्टी गेली. त्यावेळी त्या जागेची किंमत दीड लाख रूपये सांगितली गेली. संस्थेकडे एवढी रक्कम उपलब्ध नसल्यामुळे ट्रस्टी व कार्यकर्ते जागा खरेदी करण्यास तयार होईनात; परंतु भून हट्टाला पेटल्या. काहीही करून ही जागा विकत घेतलीच पाहिजे. त्यासाठी आपण दान मिळवू. इच्छा नसतानाही भूनच्या आग्रहास्तव दीड लाखाला ती जागा खरेदी केली. आज तेवढ्या नुसत्या जागेची किंमत ५० लाख झाली आहे. भून जेव्हा कोणत्याही कामासाठी आग्रह धरायच्या तेव्हा सर्वांना त्याचे महत्त्व समजत नसे. पुढे त्याची फलश्रुती दिसू लागल्यावर भूनचा आग्रह योग्य वाटायचा.

जुने भोजनगृह व सरस्वती मंदिर पाडून त्याठिकाणी तीन मजली बिल्डिंगचा नकाशा तयार करण्यात आला. इंजिनिअरनी नकाशा काढल्यानंतर त्यामध्ये योग्य तो बदल करण्याची चाणाक्ष बुद्धी भूनजवळ होती. नकाशा तर तयार झाला; परंतु कार्य-पूर्तीसाठी २०-२२ लाख रूपयांची आवश्यकता होती. कुणावरही विसंबून न राहता स्वतःच्या प्रयत्नाने काम पूर्ण करण्याची भूनची चिकाटी असायची. याच कालावधीमध्ये अर्थात १९९२ साली श्राविकाश्रमाने ५० व्या वर्षामध्ये पदार्पण केले होते. त्यानिमित्ताने सुवर्ण महोत्सव साजरा करून, मोठमोठ्या संपन्न धनिकांना आमंत्रण देऊन त्यांच्यापुढे ही योजना प्रस्तुत करून कार्याला



दिशा मिळेल या हेतूने ७ व ८ फेब्रुवारी १९९२ रोजी महोत्सव संपन्न करण्याचे निश्चित झाले. भून व तात्याजी या दोघांचा उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सर्व पंडित व धनिकांचा घनिष्ठ संबंध होता.

या दोघांच्या विनंतीवरून या महोत्सवास कलकत्ता येथील सुविख्यात उद्योगपती, दि. जैन महासमितीचे अध्यक्ष श्री. रतनचंदजी गंगवाल हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. तसेच विशेष अतिथी म्हणून वालचंद उद्योगसमूहाचे मान्यवर प्रमुख विश्वस्त व भा. दि. जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे उपाध्यक्ष श्री. अरविंद रावजी दोशी, अहिंसा प्रसारक ट्रस्टच्या माननीय अध्यक्षा सौ. शरयूताई दफ्तरी व त्यांचे पती ख्यातनाम उद्योजक श्री. अरविंद दफ्तरी हे लाभले होते.

याप्रसंगी येथील अडचणी दूर होऊन संस्थेचा विकास व्हावा यासाठी सौ. शरयूताईंनी अहिंसा प्रसारक ट्रस्टतर्फे ५१ हजार रूपयांची तसेच त्यांचे पती श्री. अरविंद दफ्तरी यांनी स्वतःतर्फे ५१ हजार रू,ची औदार्यपूर्ण देणगी जाहीर केली. यानंतर अध्यक्ष श्री. रतनलालजी गंगवाल यांनी संस्थेच्या तातडीच्या गरजा लक्षात घेऊन समाजाने तनमनधनाने सहकार्य करावे असे कळकळीचे आवाहन केले. 'कार्यकर्त्यांनी जीवन समर्पित केले, आपण फक्त त्यांना पाठिंबा व प्रोत्साहन द्यायचे आहे, असे ते म्हणाले व स्वतः आपल्या मातोश्री श्रीमती गोगीबाई यांच्या नावाने एक लक्ष रू.चे औदार्यपूर्ण दान घोषित केले. प्रेरणादायी भाषणाचा व भावनांचा प्रभाव श्रोतृवृंदावर होऊन त्यांच्याकडून उत्स्फूर्त दानस्वीकृतींचा वर्षाव सुरू झाला. माणिकचंद चवरे यांनी 'सर्व मंगल प्रतिष्ठान तर्फे २५००० रू., ब्र. माणिकचंद भीसीकर यांनी स्व. मातोश्री मैनाबाई जयवंतसा भीसीकर यांच्या निधीतून ११००० रू., नाशिकचे श्री. रतनचंद मेहता यांनी दहा हजार रू. तर अकोल्याचे श्री. बिलाला यांनी २१ हजारांची सानंद स्वीकृती दिली. याशिवाय अनेकांनी पाच, दोन, एक हजार रू. चे. दान घोषित केले. यामुळे अल्पावधीत सुमारे पाच लाखापर्यंत दानाची स्वीकृती मिळाली. सर्वांचा आनंद व उत्साह वृद्धिंगत झाला.

या सर्व अनपेक्षित व अपूर्व घटनेमागे जी प्रेरक शक्ती काम करीत होती ती संस्थेच्या मातृतुल्य हितचिंतका धर्मवत्सला भून यांची. त्यांनी पाहुण्यांना सकाळपासून संस्थेच्या कार्याची सर्व माहिती देऊन विद्यमान अत्यावश्यक गरजा त्यांच्यापुढे मांडल्या. प्रेमपूर्वक समागत सर्व पाहुण्यांचे आदरातिथ्य केले. अन्यही समागत जिव्हाळ्याच्या पुरुष व महिलांना एकेकास गाठून कार्याचे महत्त्व पटविले होते. संस्थेची दत्तक योजना सांगून एकेक दिवसाचे आहारदान देण्यास त्यांना प्रवृत्त केले होते. त्यामुळे सभेत हा वात्सल्यपूर्ण दानाचा ओघ दिसून आला.

अध्यक्षीय भाषणानंतर संस्थेच्या परमहितैषी भून, वयोवृद्ध संचालिका श्रीमती मंजुळाताई रुईवाले व बालकमंदिरच्या संचालिका शांताताई कान्हेड यांचा समाजातर्फे सौ. शरयूताई दफ्तरी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व शास्त्रदान देऊन सत्कार करण्यात आला. भूनना आपला सत्कार करून घ्यायला कधीच आवडले नाही.जबरदस्तीनेच त्यांचा सत्कार करावा लागे.

दानराशी उपलब्ध झाल्यामुळे मुलींच्या वसतिगृह व भोजनगृहाच्या बांधकामास सुरवात तर झाली; परंतु ५ लाखामध्ये एक मजलासुद्धा पूर्ण होऊ शकत नव्हता. त्यासाठी आणखीन १७-१८ लाख रू रक्कमेची आवश्यकता होती, एवढी मोठी रक्कम कारंजा गावातून किंवा विदर्भातून गोळा होणे शक्य नव्हते. ८० व्या वर्षात पदार्पण केलेल्या भूननी त्यासाठी दौरा काढला. मुंबई, पुणे, सांगली, जयसिंगपूर, कोल्हापूर, विदर्भामध्ये अकोला, वाशिम, वर्धा व नागपूर येथे दातारांच्या घरोघरी जाऊन दानाची मागणी केली. भून आपल्या घरी आल्या हाच पुष्कळांना आपला पुण्योदय वाटायचा व या म्हातारवयात संस्थेसाठी एवढे कष्ट घेतात हे पाहून स्वत:चीच लाज वाटायची. भून म्हणतील तेवढी रक्कम देऊन त्यांचा सन्मान ते करीत असत. मुंबई येथील कंकुमावशींची नात सौ. रजनी पटेल यांना भून भेटल्या व त्यांना म्हटले 'तुझ्या आजीच्या स्मरणार्थ तुझ्या मातापित्यांनी संस्थेला बृहद्दानराशी अर्पण करून संस्थेच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा उचलला. आता तू तुझ्या मातोश्रीच्या स्मरणार्थ मुलींचे वसतिगृह बांधून दे. त्यांनी



लगेच होकार दिला व प्रत्येक वर्षी १ लाख रूपये असे ७ वर्षात ७ लाख रू. देण्याचे कबूल केले. अशारीतीने सर्व बांधकामाची तरतूद होऊन पुन्हा १८-२० लाखाचा ध्रुवफंडसुद्धा करून दिला. केवळ पैसाच गोळा केला नाही तर प्रत्येक वर्षी १-१ महिना राहून बांधकामाचे निरीक्षण करून मार्गदर्शनही केले. आम्ही भूनना चेष्टेने म्हणत असू. 'तुम्ही गेल्या जन्मी इंजिनिअर होता असे वाटते. त्यांची बांधकामाविषयी एवढी सूक्ष्मदृष्टी होती की बारीक सारीक दोष त्यांच्या लगेच दृष्टिपथात येत व त्यांच्या सौन्दर्यप्रिय दृष्टीमध्ये ते रुचले नाही तर झालेले बांधकाम पाडून पुन्हा बांधायला लावत. भूनचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी मंजाताईंचे सुपुत्र आश्रमचे सेक्रेटरी श्री. गजकुमार भाऊंनी खूप मेहनत घेतली. भूनना कोणताही विरोध न करता भून म्हणतील त्याप्रमाणे व्यवस्था करण्याचे त्यांनी काम केले. दिवसभर थांबून उभे राहून बांधकामाची देखरेख करणे, मुलींच्या भोजनासाठी उत्तमोत्तम माल आणून देणे, सर्व जमाखर्च पाहणे इत्यादी कामे त्यांनी मन लावून केली. त्यामुळेच भूनही श्राविकाश्रमाच्या उद्धाराचे कार्य करण्यासाठी समर्थ झाल्या.

वसतिगृहाचे बांधकाम चालू असताना श्री. मंजाताई अंथरुणावर खिळून होत्या. गजकुमार भाऊ स्वत: आईची सेवा करून आईच्या कार्याची धुरासुद्धा समर्थपणे सांभाळत होते. अधून-मधून मंजाताईंना घेऊन येऊन श्राविकाश्रमाची बांधत असलेली इमारत दाखवत असत. भूनच्या कर्तृत्वाबद्दल मंजाताईंना खूप अभिमान वाटे. त्या म्हणायच्या 'गजाबेन तुम्ही स्त्रीच्या वेशातील पुरुषच आहात. तुमच्यासारखे साहस आमच्यामध्ये नाही.' त्यांनी कधीही भूनचा द्वेष, ईर्ष्या, मत्सर केला नाही. शेवटपर्यंत मोठ्या बहिणीचा मान दिला. भून जेवायला बसल्या की मंजाताई त्यांच्याजवळ येऊन बसणार व मायेने दोन घास खाऊ घालणार. श्राविकाश्रमाची आपल्या डोळ्यादेखत झालेली उन्नती पाहून मंजाताईंना समाधान वाटले. त्यांचा आत्मा तृप्त झाला व अखेर २ मे १९९५ रोजी शांतपणे त्यांच्या देहाचे विसर्जन झाले. सख्या बहिणीपेक्षा अधिक माया लावणाऱ्या बहिणीच्या प्रेमाला भून मुकल्या, पारख्या झाल्या.

या बांधकामाबरोबर दुसरे कार्यही भूननी हाती घेतले ते म्हणजे 'चैत्यालय जीर्णोद्धाराचे.' आश्रम स्थापन झाल्यापासून आश्रमामध्ये एका हॉलमध्ये छोट्याशा चांदीच्या वेदीवर ६ इंचाची भगवंतांची मूर्ती होती. येथेच पूजा, आरती, सामायिक, शास्त्रवाचन इत्यादी मुलींचे धार्मिक कार्यक्रम पार पडत होते. ६०-७० मुलींना छोटी मूर्ती दिसू शकत नव्हती. त्यामुळे एक सुसज्ज भव्य जिनालय व त्यामध्ये भव्य प्रतिमा असावी असे भूनना पुष्कळ दिवसापासून वाटत होते. मनातील विचाराने आता साकार रूप धारण केले व भूननी तात्याजींच्या कानावर ही गोष्ट घातली. तात्याजींनी तत्काल महावीर ब्रह्मचर्याश्रमाच्या जुन्या मंदिराच्या तळघरात संगमरवरी वेदी पडून होती ती दाखविली व याचा आपण सदुपयोग करावा असे सांगितले. भूनना तेच पाहिजे होते. भून बाहुबलीहून कारागीर भानुभाई त्रिवेदी यांना घेऊन कारंजास गेल्या व महावीर ब्रह्मचर्याश्रमातील संगमरवरी वेदी अगदी हळूवारपणे काढून कंकुबाई श्राविकाश्रमाच्या चैत्यालयामध्ये नेऊन बसविली. भानुभाईकडून मंदिराच्या दरवाजामध्ये पोरबंदर पाषाणाची नक्षीदार सुंदर कमान करवून घेतली. त्यामुळे मंदिराची अधिकच शोभा वाढली व स्वत: जयपूरला जाऊन स्वखर्चाने आपल्या पसंतीने पांढरी शुभ्र २१ इंची अतिमनोज्ञ महावीर भगवंतांची प्रतिमा आणून त्याची प्रतिष्ठापना केली. मूर्ती व मूर्तीच्या वर संगमरवरी दगडाची तीन छत्रे यांची रक्कम स्वत:ची चांदीची भांडी विकून दानरूपाने दिली. त्याचप्रमाणे शेगाव येथे जाऊन तेथील कारागीरांकडून शास्त्र व कुंदकुंद आचार्यांचा फोटो ठेवण्यासाठी स्वतंत्र दोन संगमरवरी वेदी बनविल्या. त्यामुळे जिनमंदिर विशाल व आकर्षक वाटू लागले. या वयातील भूनची चिकाटी व धडपड पाहून आमच्यासारख्या तरुणांना लाज वाटे.

अखेर सर्व इच्छित कार्य पूर्णत्वास जाऊन १५-१०-१९९७ रोजी नवनिर्मित वसतिगृह, सभागृह व ग्रंथालयाचा उद्घाटन समारोह संपन्न झाला. भूनच्या आग्रहपूर्ण आमंत्रणाला मान देऊन मुंबई येथील शेठ सुमनभाई दोशी, मा. शेठ मुकुंदभाई खारा, मा. शेठ कांतिलालभाई मोटानी, मा. शेठ अरविंद



दोशी, श्री. प्रवीणभाई व्होरा इत्यादी मान्यवर व्यक्ती या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. सर्वांनी संस्थेच्या आजवरच्या प्रगतीबद्दल अत्यंत समाधान व्यक्त केले. तसेच अतिथीकडून एक लक्ष रू.चे दानही प्राप्त झाले. यावेळी सोलापूर श्राविकाश्रमाच्या संचालिका ब्र. विद्युल्लताभूनही आवर्जून आल्या होत्या. त्यांचे लहानपण आईसोबत याच आश्रमात गेले. त्या भूनच्या प्रथम शिष्या, त्यांच्या मातोश्री माणिकभून यांनीही कंकुबाई श्राविकाश्रमामध्ये सेवायोग दिला व शेवटी त्या जयपूर येथे शांतिसागर महाराजांचे शिष्य वीरसागर महाराजांकडून भगवती आर्यिकादीक्षा ग्रहण करून आर्यिका चंद्रमती माताजी बनल्या. ब्र. विद्युल्लताभूननी आश्रमासंबंधी कृतज्ञता म्हणून चंद्रमती माताजींच्या नावाने ग्रंथालयासाठी दान दिले. त्या ग्रंथालयाचे उद्घाटन याच प्रसंगी मा. शेठ अरविंद दोशींच्या हस्ते झाले. ग्रंथालयाचे नाव 'चंद्रमती ग्रंथालय' असे ठेवण्यात आले.

भूननी दान गोळा करून अचेतन इमारती उभ्या करणे एवढेच कर्तव्य न मानता आश्रमातील चेतनमूर्तींच्या विकासाकडेही आपले लक्ष केन्द्रित केले. मुलींच्यावर देखरेख व त्यांना सुसंस्कारित करण्यासाठी बाहुबलीहून कु. उज्वला पाटील व सावित्री या दोन महिलांना पाठविले. त्यांनी ९ वर्षे सेवायोग दिला. गावातील महिलांना त्या दोघींना व मुलींना धार्मिक शिकविण्यासाठी प्रेरित केले. त्याप्रमाणे मुलींना आवश्यक त्या सर्व सुख सुविधा निर्माण करण्यामध्ये भून तत्पर असत. मुलींना भोजनातून पुरेसे जीवनसत्त्व मिळून त्यांचे आरोग्य उत्तम करण्याकडेही त्यांचे लक्ष असे. आज वयाच्या ९९ व्या वर्षीसुद्धा कारंजाहून येणाऱ्या पाहुण्यांना 'श्राविकाश्रम कसे चालू आहे.' हा प्रश्न विचारून त्याचा उत्कर्ष ऐकण्यासाठी उत्सुक असतात. २०% असणारा निकाल आज तेथील कार्यकर्त्यांच्या दक्षतेमुळे व शिक्षिकांच्या मेहनतीने १००% झाला आहे हे पाहून भूनना आपले श्रम सार्थक झाल्यासारखे वाटतात.

**प. पू. आचार्य वर्धमानसागर महाराजांचा चातुर्मास वर्षायोग –**

१९९३ सालचा श्रवणबेळगोळ येथील महामस्तकाभिषेक सोहळा

पार पाडून आचार्य वर्धमानसागर महाराजांचा हुबळी, बेळगाव मार्गाने कर्नाटक व महाराष्ट्र भागात ससंघ विहार झाला. १९९५ साली धर्मस्थळच्या बाहुबलीची प्रतिष्ठा संपन्न झाल्यावर स्तवनिधी येथे त्यांचे शुभागमन झाले. त्यानंतर कोथळीचे दर्शन करून ७ मे रोजी आचार्य शांतिसागर महाराजांची जन्मभूमी भोज येथे त्यांचेच पंचम पट्टाधीश वर्धमानसागर महाराजांचा मंगल प्रवेश झाला. तेथे त्यांचे १५-२० दिवस वास्तव्य होते. आचार्यश्रींच्या जन्मभूमीमध्येच यंदाचा चातुर्मास करण्याचा त्यांचा मानस होता; परंतु दरम्यानच्या काळात संघातील ब्रह्मचारी व ब्रह्मचारिणीगण श्री बाहुबली क्षेत्राचे दर्शन करण्यासाठी आले होते. त्यांना या क्षेत्रातील प्रसन्न व धर्ममय वातावरण पाहून अतिशय आनंद झाला. येथील सुरम्य, स्वच्छ, विशाल परिसर त्यांच्या मनात भरला. त्यांच्यातील प्रमुख ब्रह्मचारिणी भावनाबेन यांनी भूनना म्हटले 'आचार्यश्रींचा चातुर्मास बाहुबली येथे करा. आपण जर आचार्यश्रींना विनंती केली तर ते येथे येतील. अद्यापि त्यांनी या क्षेत्राचे दर्शन घेतले नाही.' प्रथमपासूनच भूनच्या ठायी स्पष्ट वक्तेपणा आहे. कोणी पंतप्रधान असला तरी मनातील भाव स्पष्ट बोलायला कधी त्या घाबरल्या नाहीत. त्या म्हणाल्या 'येथे श्रावकांची वस्ती थोडी आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या संघाची कशी काय व्यवस्था होऊ शकणार?' भावनाबेन म्हणाल्या, 'तुम्ही काही काळजी करू नका. आम्ही सर्व मदत करू. राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेशातून पुष्कळ भक्त येथे येतील. त्यामुळे क्षेत्राचासुद्धा विकास होईल. भूननी भीसीकर गुरुजींना घेऊन भोज येथे जाऊन आचार्यश्रींना बाहुबलीला येण्याचे आमंत्रण दिले. पूर्वी भून म्हणजे अंतिम कोर्ट होते. कुणाशीही सल्ला मसलत न करता निर्णय घेण्याची व घेतलेला निर्णय पूर्ण करण्याची त्यांच्यात क्षमता होती. १ जून १९९५ रोजी समस्त संघासहित आचार्यश्रींचे बाहुबली येथे प्रथमच शुभागमन झाले. येथील विशालकाय बाहुबली महामूर्ती व अन्य सर्व परिसर व जिनमंदिरे पाहून त्यांनी अतिशय प्रसन्नता व्यक्त केली. ३ जून रोजी श्रुतपंचमीच्या दिवशी संस्थेतर्फे व आजूबाजूच्या परिसरातील श्रावकगणातर्फे यंदाची चातुर्मासिक योगधारणा



बाहुबली क्षेत्री व्हावी अशी विनंती करण्यात आली. तीन दिवसांच्या विचारानंतर प. पू. आचार्यश्रींनी याबाबतीत शुभसम्मती प्रदान केली. भूननी प्रथमच अट स्पष्ट केली होती. चातुर्मासातील वेळ स्वाध्याय व ध्यान करण्यात घालवावा. पूजा-विधान इत्यादी किंवा सभा समारंभ इ. लौकिक कार्यक्रमामध्ये वेळ घालवू नये. आचार्यश्रींना ही हे मान्य होते. एक महिना समीपवर्ती गावातून संघाचा विहार होऊन चातुर्मासासाठी ५ जुलै १९९५ रोजी सकाळी ८ वाजता संघाचे बाहुबलीस पुनरागमन झाले. ११ जुलै रोजी चातुर्मासाची स्थापना सानंद संपन्न झाली. संघामध्ये ६ दिगंबर मुनी, ११ आर्यिका व १ क्षुल्लक महाराज विद्यमान होते.

चातुर्मासाची स्थापना होताच भूननी स्वाध्यायाच्या वेळा ठरवून घेतल्या. त्यांच्या संघातील आर्यिका पवित्रश्री माताजींची लब्धिसार ग्रंथ शिकण्याची खूप वर्षापासूनची मनीषा होती. त्यांना शिकवायला कोणी मिळत नव्हते. येथे चातुर्मास निश्चित झाल्यावर माताजींनी भूनना लब्धिसार शिकविण्यासाठी बांधून घेतले. भूनचे ८२ वर्षाचे वय. त्यामुळे शिकविण्याची जबाबदारी माझ्यावरच आली. सकाळी ७ ते ८।। लब्धिसार, दुपारी १ ते २ लब्धिसार, २ ते ३।। कर्मकाण्ड, ३।। ते ४।। प्रवचनसार. रात्री ७ ते ८ सर्व लोकांसाठी व ब्रह्मचारिणीसाठी बृहद्द्रव्यसंग्रह अशाप्रकारे संपूर्ण दिवस ज्ञानाची अखंड आराधना चालू होती. कर्मकांड व बृहद्द्रव्यसंग्रह. धर्मबंधु जडे गुरुजी घेत होते. सकाळी संघाचा अष्टपाहुड ग्रंथाचा स्वाध्याय आचार्यश्री घेत होते. त्यामुळे अन्य अशुभ विकल्पांना थारा मिळत नव्हता. सुरवातीला तीन आठवडे आम्हाला शास्त्री परीक्षा देण्यासाठी अलवरला जावे लागले. त्यामुळे शिक्षणात खंड पडू नये म्हणून भूननी पंडिता विजयाताई भीसीकर यांना कारंजाहून बोलावून घेतले. त्यांनी आम्ही येईपर्यंत लब्धिसार, कर्मकांड इ. ग्रंथांचा स्वाध्याय घेतला. भून स्वत: ब्र. राजू विजयभैय्यांना ब्रह्मचारिणींना शिकण्याची प्रेरणा करून कर्मकांड शिकवित होत्या. प्रत्येक रविवारी व पर्युषण पर्वामध्ये आचार्यश्रींची आध्यात्मिक मंगल प्रवचने होत होती. आजूबाजूच्या परिसरातील लोकांची

बहुसंख्येने उपस्थिती असायची.

संघाच्या या चातुर्मासिक पुण्य वास्तव्यात संघास आहारदान देण्यासाठी सभोवतालच्या व अन्यही बऱ्याच ठिकाणच्या श्रावक-श्राविकांनी सोयीनुसार काही दिवस येथे राहून आहारदान देऊन पुण्यसंपादन केले. बाहेर गावाहून एका गावातर्फे एक असे १२-१५ चौके नित्य लागत होते. भूनच्या मार्गदर्शनानुसार बेडगे गुरुजी व इतर कार्यकर्ते दूध, पाणी, भाजी, फळे इ. लागणाऱ्या साहित्याची चोख व्यवस्था करीत होते. भून दररोज आचार्यश्रींच्या आहाराची काळजी घेत असत. त्यागींना आग्रहाने खूप खाऊ घालणे म्हणजे त्यांची भक्ती नाही तर त्यांना प्रकृतीला योग्य अविरोधी (परिमित) प्रमाणशीर निर्दोष आहार देऊन त्यांच्या ज्ञानध्यानामध्ये सहाय्यभूत होणे हीच खरी त्यांची भक्ती आहे असे भूनचे मत होते. भून स्वत: जेथे आचार्यश्रींचा आहार होईल तेथे जाऊन श्राविकांवर नियंत्रण ठेवीत होत्या. कुणाला वाईट वाटले तरी भून त्याची पर्वा करीत नसत. आचार्यश्रींचे स्वास्थ्य निरोगी राहणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने भून प्रयत्न करीत असत.

खरोखरच ठरल्याप्रमाणे संपूर्ण संघाचा बहुमोल वेळ स्वाध्याय, अध्ययन, ध्यानधारणा व तत्त्वचर्चा आदी गोष्टीत चांगल्या रीतीने व्यतीत झाला. चातुर्मास अत्यन्त आनन्दात सफलतेपूर्वक पार पडल्यानंतर ६-११-१९९५ रोजी संघाचा पिंछी परिवर्तनाचा समारोह विशेष प्रभावनेसह संपन्न झाला. सदरप्रसंगी श्रवणबेळगोळचे स्वस्तिश्री कर्मयोगी चारूकीर्ती भट्टारक खास उपस्थित होते. १ लक्ष अठरा हजार रू.चे चढावे झाले. ही दानराशी विद्यार्थ्यांच्या ज्ञानदानासाठी देण्यात आली .

दुसऱ्या दिवशी ७-११-१९९५ रोजी दुपारी श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ संस्थेचा ६१ वा वार्षिकोत्सव प. पू. आचार्यश्रींच्या पावन सान्निध्यात सानन्द संपन्न झाला. त्यावेळी अंतिम प्रवचनात प. पू. आचार्यश्री आपले भाव व्यक्त करताना म्हणाले. 'एका महान व्यक्तीच्या कार्यक्षेत्रावर यंदाचा वर्षायोग व्यतीत करण्याचा सुयोग लाभला. त्यामुळे अत्यन्त समाधान होत आहे. आत्मविकासाला येथील पवित्र वातावरण



अतिशय अनुकूल आहे. येथे शिकणारे विद्यार्थी भाग्यवान आहेत. गेल्या २७ चातुर्मासांपैकी यंदाचा चातुर्मास अभूतपूर्व झाला आहे. येथे जी आमची व संघाची ज्ञानाची आराधना झाली ती अन्यत्र कठीण आहे. भूनची शिकविण्याची तळमळ, व्यवस्था, स्वच्छता व सेवाभाव सर्व अत्यंत प्रशंसनीय आहे.' दुसऱ्या दिवशी ८-११-१९९५ रोजी रथोत्सव झाल्यानंतर आचार्यश्रींचे संघासह नेज येथे प्रयाण झाले. तेथून आळते, हेर्ले मार्गे दि.१२ रोजी संघ कोल्हापुरी पोहोचला.

कोल्हापूर येथे लक्ष्मीसेन मठात १३ ते १९ नोव्हेंबर पर्यंत 'आचार्यश्री वर्धमानसागर महाराजांच्या मंगल सान्निध्यात 'सर्वतोभद्र आराधना महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी आचार्यश्रींचे संघासहित ८-१० दिवस येथे वास्तव्य होते. बाहुबली चातुर्मासाच्या प्रारंभी सुरू केलेल्या लब्धिसार ग्रंथातील 'चारित्रमोहक्षपणा' नामक अंतिम अधिकारातील काही भागाचे वाचन शेष राहिले होते. भूनच्या मनात त्याबद्दल असमाधान होते. त्यांनी मला ८ दिवस कोल्हापूरला पाठवून तो ग्रंथ पूर्ण करून येण्यास सांगितले. कोठेही कधीही एकटीला दोन दिवससुद्धा न पाठविणाऱ्या भून ८ दिवस परवानगी देतात हे पाहून मला आश्चर्य वाटले. यावरून त्यांना शिक्षण देण्याची किती रुची व तळमळ होती, हे लक्षात येते. कधीही कोणीही शिकायला आले तर भून तयारच असतात. त्यांनी शिकविण्यासाठी किंवा शिकण्यासाठी 'नाही' हा शब्द कधीच उच्चारला नाही. ८ दिवसात शेष राहिलेला लब्धिसार ग्रंथ पूर्ण झाला. माताजींना खूप आनंद झाला व भूनला ही त्यांची इच्छापूर्ती केल्याचे समाधान वाटले.

**समन्तभद्र निलयनिर्मिती –**

क्षेत्रावर दर्शनार्थी यात्रेकरूंना राहण्यासाठी आधुनिक निवासव्यवस्था नव्हती. आचार्य वर्धमानसागर महाराजांच्या चातुर्मासप्रसंगी याची उणीव तीव्रतेने जाणूव लागली. भूनना पाहुण्यांची अव्यवस्था झालेली सहन होत नव्हती. संस्थेच्या आवारात जुन्या व्यायामशाळेच्या जीर्ण

इमारतीच्या जागी नवे सर्व सोयींनी युक्त असे 'अतिथिगृह' बांधावे असे भूननी मनात घेतले. भूनच्या मनात आले की कृतीत यायला वेळ लागत नव्हता. इंजिनिअरना बोलावून त्यांनी आपल्या इच्छेनुसार प्लॅन काढायला लावला. २४ खोल्यांच्या भव्य भवनाचा नकाशा तयार झाला. आचार्यश्रींच्या वास्तव्यातच ८-११-१९९५ रोजी सकाळी ८ वा. श्रवणबेळगोळ मठाधीशांच्या उपस्थितीत ध. सौ. सरिताबेन महेन्द्रकुमार जैन मद्रास यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी या नव्या अतिथिनिवासाचे नाव 'समन्तभद्रनिलय' ठेवावे असे चारुकीर्ती स्वामीजींनी सुचविले व त्यांनी एका ब्लॉकसाठी देणगी देण्याचीही स्वीकृती दिली. तसेच सरिताबेन मद्रास यांनीही सव्वा लाख रूपये देण्याचे कबूल केले, अन्यही २-३ दातारांनी स्वीकृती दिली; परंतु या वास्तूसाठी सुमारे २५-३० लाख रू.खर्च येणार होता. एवढे पैसे कोणी व कोठून गोळा करावयाचे?

बाहुबली विद्यापीठाच्या विश्वस्तांची मिटिंग झाली. त्यामध्ये पैशाच्या अभावात हे काम स्थगित करण्यात यावे असा ठराव झाला. भून कधीही मिटिंगला जात नव्हत्या. भून ऑफिसजवळ झाडाखाली बसलेल्या होत्या. अध्यक्षांनी भूनना नमस्कार करून वरील ठराव झाल्याचे सांगितले. भूनचा स्वाभिमान जागृत झाला. भून म्हणाल्या, 'तुम्ही काय समजलात? संस्थेच्या ध्रुवफंडातील एक नवा पैसा न घेता हे काम करून दाखवते.' भूनपुढे मिटिंगच्या ठरावाचा काहीही परिणाम झाला नाही. दुसरीकडून ही अनेक अडथळे आणण्याचे प्रयत्न झाले. ती जागा चांगली नाही. दिशा चुकीची आहे इ. सर्वांवर मात करून भवननिर्मितीचे काम चालू झाले. भून मुंबईला गेल्या. मी त्यांच्यासोबत होतेच. शशिकांत वालचंद शहा यांच्याकडे उतरून ४-५ दिवस मुक्काम करून दान गोळा करण्याची मोहीम चालू ठेवली. शेठ बाहुबली गुलाबचंद यांच्याकडे गेलो असता त्यांनी हसतमुखाने भूनचे स्वागत केले. लहानपणी भूनच्या अंगाखांद्यावर खेळलेल्या बाहुबली शेठजींना भूनना पाहिल्यावर मातेला भेटल्याचा आनंद झाला. भूननी त्यांच्यापुढे 'समन्तभद्र निलय' चा प्रस्ताव मांडला. भूननी



मागणी करताच शेठ बाहुबली म्हणाले 'माझे एक लाख रूपये घ्या.' त्यावर भून म्हणाल्या 'भूनना या या काय म्हणतोस, जा म्हण की' बाहुबली शेठजींनी विचारले 'माझे काय चुकले?' भून म्हणाल्या, 'तुझ्यासारख्या शेठकडून मोठी अपेक्षा आहे. तुझ्या आई वडिलांचे नाव अद्यापि कोठेही झाले नाही. तरी त्यांच्या नावाने एका हॉलसाठी पाच लाख रूपये द्यावेस अशी आमची अपेक्षा आहे. एका मिनिटात बाहुबली शेठ म्हणाले. 'भून मी तुमच्या शब्दाच्या बाहेर नाही. तुम्ही जे म्हणाल ते मी द्यायला तयार आहे.' खरोखर बाहुबली शेठजींनी पाच लाख रूपयांची बृहत् देणगी पाठवून दिली. भूनच्या चिकाटी व प्रयत्नाने एक-दोन वर्षातच सर्व रक्कम गोळा झाली व 'समंतभद्र निलय'ची बिल्डिंग उभी राहिली. भूननी केलेल्या अथक परिश्रमाचे चीज झाले. भूननी फक्त दानच गोळा केले असे नाही तर दररोज बांधकामाचे निरीक्षण करणे, त्यांना मार्गदर्शन करणे. त्यामध्ये सौन्दर्य व व्यवस्थितपणा कसा येईल याकडे त्यांचे अधिक लक्ष असे. येणाऱ्या पाहुण्यांची सर्व प्रकारची सोय व्हावी. याचीही दक्षता त्या घेत होत्या.

२६ जुलै १९९९ रोजी सकाळी १० वाजता 'टाईम्स ऑफ इंडिया ग्रुपचे प्रमुख संचालक व भारत दिगम्बर जैन तीर्थक्षेत्र कमेटीचे अध्यक्ष श्रीमान् साहू रमेशचंद्रजी जैन यांच्या करकमले 'समंतभद्र निलय' भवनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांच्याच हस्ते भूनना प्रशस्ती पत्रही देण्यात आले. परंतु भूनना ते अजिबात आवडले नाही. कधीही त्यांना कर्तृत्वाचा अहंकार शिवला नाही. समयसारच्या कर्तृकर्माधिकाराचे अनेकवेळा पारायण केल्यामुळे त्यांच्या जीवनावर त्याचा परिणाम होता. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीही करू शकत नाही. आम्ही फक्त आपले विकल्प शांत करण्यासाठी परद्रव्यामध्ये व्यर्थ उठाठेव करण्याचे काम करतो असे भून म्हणत असत.

**साधर्मीबांधवांवरील ममता-**

भूननी ५५ वर्षे प. पू. समन्तभद्र महाराजांची तन-मन-धनाने सेवा केली. त्याचबरोबर गुरुकुलासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या तात्याजी

आदी ब्रह्मचारी धर्मबंधूंचीसुद्धा मनोभावे सेवा केली. ब्र. माणिकचन्द चवरे (तात्याजी), ब्र. वालचंद गुरुजी, ब्र. माणिकचन्द भीसीकर गुरुजी, ब्र. माणिकचंद मोहोळकर गुरुजी, ब्र. अजितकुमार करके गुरुजी, ब्र. भूपाल गुरुजी इ. ब्रह्मचारीगण प. पू. महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सेवारत होते. माणूस कितीही मोठा असला तरी तो आजारपणी गर्भगळित होतो, त्याला आईवडिलांची व घरच्या मंडळींची आठवण होते व त्यावेळी आपल्याजवळ कोणीतरी असावे असे वाटते. घरदार सोडून आलेल्या धर्मबंधूंचे गुरुकुलात कोणीही आप्तेष्ट नसले तरी प. पू. महाराज व भूनच्या स्नेहछत्रामुळे त्यांना कधीही याची जाणीव झाली नाही.

प्रत्येकांच्या आजारप्रसंगी भूननी मातेची ममता देऊन सेवाशुश्रूषा केली. त्यांना २-४ दिवस घरी ठेवून घेऊन योग्य आहार पाणाची व्यवस्था व औषधोपचार स्वतःच्या देखरेखीखाली केली. वाफारा देणे, मातीचे प्रयोग करणे, गरम पाण्याने शेकणे इत्यादी कष्टसाध्य निसर्गोपचार व आयुर्वेदिक औषधे देऊन त्यांचा रोग बरा केला. त्यांना ही भूनवर श्रद्धा असल्यामुळे ते श्रद्धेने भूनची औषधे घेत असत. त्यांना निरोगी करूनच भून त्यांना आपल्या खोलीकडे पाठवत होत्या.

तात्याजी महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा संस्थेचे संचालक असल्यामुळे कारंजा हे त्यांचे निवासस्थान होते; परंतु दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत प. पू. महाराजांच्या सहवासात राहण्यासाठी ते दोन महिने बाहुबली येथे वास्तव्य करीत असत. त्यांच्या येथील वास्तव्यात भून त्यांच्या भोजनाची व्यवस्था आपल्या घरीच आत्मीयतेने करीत असत. शरीरासाठी व धर्मसाधनेसाठी पोषक आहार त्यांना खाऊ घातल्यामुळे त्यांची तब्बेत सुधारत असे. तात्याजीसुद्धा भूनची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांचा शब्द ओलांडत नसत. १९९३ साली तात्याजींची तब्बेत गंभीर झाली. तेव्हा भून व मी कारंजालाच होतो. नागपूर येथे तात्याजींना नेऊन त्यांची तपासणी केली असता त्यांच्या प्रोस्टेड ग्लँडचे ऑपरेशन तातडीने करण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. भूननी स्वतः त्यांच्याबरोबर १० दिवस नागपूरला राहून त्यांची सेवा



शुश्रूषा केली. प्रोस्टेड ग्लँडचे ऑपरेशन झाल्यावर त्रास थोडा कमी झाला असला तरी अद्याप, तो संपुष्टात आला नव्हता. मे महिन्यात बाहुबलीला आल्यावर सांगली येथे जाऊन चोपडे डॉक्टरांच्याकडे तपासणी केली. डॉक्टरांनी तपासणी केल्यावर कॅन्सरचे निदान केले. ते ऐकून तात्याजींच्यावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही; परंतु भून चिन्तित झाल्या. डॉक्टरांचे मत होते की रोग पहिल्या स्टेजवर असल्यामुळे ऑपरेशन केल्यावर बरे वाटेल. भूनच्या आग्रहास्तव तात्याजी ऑपरेशनास तयार झाले. चोपडे डॉक्टरांनी मुंबईहून २-३ डॉक्टरांना मदतीला बोलावून ऑपरेशन यशस्वीपणे पार पाडले. भूननी सांगलीला जाऊन त्यांची उत्तम व्यवस्था केली. ऑपरेशन झाल्यावर अजून भूलमध्ये असताना तात्याजी समयसारच्या गाथा म्हणत असत. यावरून त्यांच्यावर समयसारचे किती संस्कार होते हे लक्षात येते. त्यानंतर २-३ वर्षे तात्याजींचे स्वास्थ्य व्यवस्थित होते. १९९७ साली ऑगस्ट महिन्यात श्राविकाश्रमाच्या कामानिमित्त भून व मी कारंजाला गेलो होतो. तेथे आमचे १ महिना वास्तव्य होते. तात्याजी दररोज दोन वेळा स्वाध्याय करण्यासाठी श्राविकाश्रमात येत होते. अचानक ३१ ऑगस्ट १९९७ रोजी झोपेतच पहाटे त्यांना ब्रेन हेमरेज झाले. दिवसभर आम्ही सर्वजण त्यांच्याजवळ बारा भावना, मंत्रोच्चार, भक्तीगीते म्हणत बसलो होतो. मंत्रघोष चालू असतानाच सायंकाळी ६ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. प. पू. महाराजांच्या नंतरचा भूनचा एक आधारस्तंभ निखळला; परंतु भूननी दुःख करीत न बसता संस्थेचे संरक्षण व संवर्धन करण्याकडे आपले लक्ष वेधले. जगदीश डोणगावकर, प्रमोद चवरे इत्यादी तरूण मंडळींना बोलावून संस्थेची जबाबदारी सोपविली.

ब्र. भीसीकर गुरुजी, करके गुरुजी, भूपाल गुरुजी, श्रीधर आण्णा इत्यादी ब्रह्मचारी लोकांची भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र भोजनगृह बांधून सर्व व्यवस्था करून दिली. सर्व निस्वार्थी सेवाभावी कार्यकर्त्यांना स्वतःच्या खर्चासाठी कोणाकडे हात पसरायला लागू नये म्हणून नेमचंद बाबा, जम्बूसावजी चवरे इत्यादी महानुभावांकडून दान

मिळवून गुरुकुल सेवा मंडळाची स्थापना केली व या रकमेच्या व्याजातून विनामूल्य सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांना दरवर्षी मानधन देण्याची व्यवस्था केली. यावरून भूनची किती चौफेर दृष्टी होती हे लक्षात येते. त्या एक कुशल नियोजिका आहेत.

तात्याजींच्यानंतर १७ जुलै २००० रोजी करके गुरुजी, २० ऑगस्ट २००२ रोजी मोहोळकर गुरुजींचाही वियोग झाला.

ब्र. भीसीकर गुरुजींना भूनचा मोठा आधार होता. ते आपल्या गावापासून दूर असल्यामुळे भून त्यांच्या आवडीचे पदार्थ करून त्यांना पाठवून देत असत. आजारपणी त्यांना आपल्या जवळ ठेवून त्यांची सेवाशुश्रूषा करीत असत. संस्थेच्या प्रत्येक कार्यात पुढाकार घेऊन ते कार्य यशस्वी करणे, येणाऱ्या त्यागींची व अतिथींची व्यवस्था करणे, इत्यादी कामे भून स्वत: करीत असल्यामुळे भीसीकर गुरुजी निर्धास्त होते. शेवटच्या ४-५ वर्षात त्यांनाही व्याधीने घेरले. त्यांना फीट येण्याचा त्रास सुरू झाला. त्यानंतर त्यांच्या ह्दयाच्या रक्तवाहिन्या ७०% बंद झाल्या. त्यामुळे चालताना दम लागत असे. भूननी त्यांना आपल्या घराजवळील साधना मंदिरामध्ये ठेऊन घेतले व त्यांचे पथ्यपाणी व्यवस्थित सांभाळले. त्यांना पोषक असा आहार दिला. भून स्वत: जातीने लक्ष घालीत होत्या. मुंबईच्या डॉक्टरांनी फक्त ५-६ महिन्याची त्यांना गॅरंटी दिली होती; परंतु भूनच्या योग्य वैय्यावृत्त्याचा परिणाम असा झाला की गुरुजी पुढे ४-५ वर्षे राहिले. ऑक्टोबर २००२ साली त्यांचे प्रोस्टेड ग्लँडचे सांगली येथे ऑपरेशन झाले. इन्फेक्शन होत होते. त्यामुळे मृत्यूपूर्वी ६ महिने त्यांच्या प्रकृतीमध्ये चढउतार होत होता. १९ एप्रिल २००३ रोजी त्यांना ताप आला. त्यांना शेवटी सल्लेखना घेण्याची खूप इच्छा होती. १२ वर्षाची नियमसल्लेखना घेतली होती. परंतु २० एप्रिलला पहाटे ५.१५ वाजता णमोकार मंत्राचे उच्च स्वरामध्ये पाठ म्हणता म्हणताच त्यांचा स्वर्गवास झाला. मरणापूर्वी अर्धा-पाऊण तासापर्यंत ते स्वत: णमोकार मंत्राचा घोष करीत होते. महाराजानंतरचा भूनचा आणखी एक आधारस्तंभ निखळला. भूनना पूर्णत: एकाकीपणाची



जाणीव होऊ लागली. आता आपलेही अंतिममरण सुधारले पाहिजे. या जीवनाचा भरवसा नाही ही गोष्ट त्यांना लक्षात आली. म्हणून त्यांनी संस्थेतून आपले लक्ष काढून टाकले व प्रवासही कमी केला. त्यांनी सुद्धा २१-११-२००८ रोजी स्वत:च्या जन्मदिनी वैराग्यभावना भावून स्वेच्छेने भगवंतासमोर १२ वर्षांचे नियमसल्लेखना व्रत घेतले आहे.

**दातृत्व-**

भून केवळ दान मागतात असे नाही. तर त्या स्वयं आपल्या प्राप्त व्याजातून दान देतात सुद्धा. संस्थेच्या प्रत्येक कार्यात भून सर्वप्रथम दान देत असत. त्यानंतर दुसऱ्यांना मागत असत. अक्कलकोट येथे मंदिरामध्ये त्यागींना राहण्याची सोय नव्हती म्हणून तेथे एक खोली बांधण्यासाठी भूननी २०,००० रूपयांचे दान दिले. प्राणिमित्र विलास शहा माढेकर जीवदयाचे कार्य करीत होते. जेथे देवीपुढे अनेक मूक प्राण्यांची हत्या केली जात होती तेथे विलासभाई जाऊन त्यांना हत्येपासून रोखून त्या जीवांचे प्राण वाचवत होते. विलासभाई येथे येऊन सर्व हकीकत भूनना सांगत असत. ते ऐकून भून भावविह्वल होत असत. त्यांनी स्वयंस्फूर्तपणे एक वर्षी १५,००० व दुसऱ्यावर्षी २५००० रू.अशी दानराशी आपल्या मुदलातून दिली. यावरून भूनना अहिंसेसंबंधी किती आस्था होती हे लक्षात येते.

कारंजा येथे १९९५ साली कंकुबाई श्राविकाश्रमामध्ये जिनालयाचे नूतनीकरण करण्याचे कार्य चालू होते तेव्हा तेथे तीर्थंकर भगवान महावीरांची संगमरवरी मूर्ती व त्याच्यावर संगमरवरी छत्रत्रय व भामण्डल करण्यासाठी ४६,००० रूपयांचे दान स्वयंप्रेरणेने दिले. मुलींच्या शिक्षणाची भूनना अतिशय तळमळ असते. कंकुबाई श्राविकाश्रमामध्ये जवळजवळ ९० जैन मुली वसतिगृहात राहून शिक्षण घेतात. वऱ्हाड प्रांतामध्ये लोकांची परिस्थिती फारशी संपन्न नाही. त्यामुळे ते आपल्या मुलीचा पूर्ण खर्च देऊ शकत नाहीत. वर्षाकाठी प्रत्येकी १५००, २०००, २५०० पर्यंतच फी भरतात. तेवढ्या रकमेमध्ये आश्रमाचा खर्च चालू शकत नाही. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून त्याची पूर्ती करावी लागते. म्हणून भूननी ५-६

वर्षापूर्वी आपल्या संपत्तीतून १,००,०००/- एक लाख रूपयांचे दान देऊन गरीब मुलींच्या शिक्षणासाठी हातभार लावला आहे.

आपल्या भावाचा धाकटा मुलगा सुधीर याचा अल्पवयात अचानक स्वर्गवास झाला. त्याला दोन मुले व एक मुलगी होती. वडील गेल्यामुळे मुलांच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला. त्यापैकी मोठा मुलगा मनोज बुद्धीने हुशार व प्रयत्नशील होता. त्याला इंजिनिअर होण्याची इच्छा होती; परंतु पैशाच्या अडचणीमुळे तो चिन्तित होता. भूनी त्याला आश्वस्त केले 'तू काही काळजी करू नकोस. मी तुझ्या शिक्षणासाठी लागेल तो खर्च देईन. तुला जेवढे शिकायचे आहे तेवढे शिक. सांगलीला वालचंद कॉलेजमध्ये त्याला ॲडमिशन मिळाले. ४ वर्षे भूनी त्याला लागेल तेवढे पैसे दिले. वर्षाकाठी जवळजवळ ९००० रू. खर्च येत असे. बिन बापाचा मुलगा म्हणून भूना त्याची खूप दया येत होती.

त्याचप्रमाणे कोणीही दान मागायला आले तर त्यांना भूनी कधीही रिकामे पाठविले नाही. पंचकल्याणक प्रतिष्ठा असो; जीर्णोद्धाराचे कार्य असो अथवा मुलामुलींच्या शिक्षणाचे कार्य असो प्रत्येक ठिकाणी भूनी आपल्या शक्तीनुसार दान दिले आहे.

**माझ्या ज्ञानविकासामध्ये भूनची भूमिका –**

मी येथे वास्तव्य केल्यानंतर सुरवातीला २ वर्षे भूनी स्वत: सिद्धान्त प्रवेशिका, छहढाला, द्रव्यसंग्रह, रत्नकरंड श्रावकाचार, तत्त्वार्थसूत्र इत्यादी धार्मिक ग्रंथ शिकविले. तसेच संस्कृत व्याकरण शिकल्याशिवाय आचार्यप्रणीत ग्रंथातील तत्त्वज्ञानाचा रसास्वाद घेता येत नाही म्हणून भांडारकर रचित संस्कृत प्रथम पुस्तक शिकविले. संस्कृतचा अनुवाद करता येऊ लागल्यामुळे शास्त्र वाचण्यात आणखीन आनंद वाटू लागला. सकाळच्या स्वाध्यायामध्ये कुंदकुंदाचार्यप्रणीत समयसार ग्रंथाची आत्मख्याती टीका लावण्याचे काम भूनी माझ्यावर सोपविले. स्वाध्यायापूर्वी स्वत: टीका वाचून अर्थ लावून तयारी करून सर्वांसमोर सांगायचे. मी माझ्या परीने तयारी करून जायची; परंतु सुरवातीला सराव



होईपर्यंत अडखळतच सांगता येत होते; परंतु भून 'वा वा' म्हणून कौतुक करीत. त्यामुळे मला आणखीन उत्साह येई. त्यावेळी स्वाध्यायाला उपस्थित असणाऱ्या करके गुरुजी, जडे गुरुजी इत्यादी गुरुजणांनी माझ्यासारख्या अज्ञ बालिकेचे तोतरे व बोबडे बोल धीरतेपूर्वक ऐकून घेतले. त्यामुळेच मला प्रोत्साहन मिळून संस्कृत टीका व श्लोकांचा अर्थ लावण्याचा सराव वाढत गेला. शास्त्राचे मर्म समजले की नाही हे तपासून पाहण्यासाठी भून अधून मधून प्रश्न विचारत. कारण संस्कृत भाषेमध्ये पारंगत होण्यासाठी आपण संस्कृत शिक्षण घेतले नाही, तर जिनवाणीचे मर्म हृदयंगम करण्यासाठी संस्कृत शिक्षण घेतले आहे. याची जाणीव भून करून देत असत. संस्थेच्या व्यापातून वेळ कमी मिळत असल्यामुळे व आपल्यापेक्षा संस्कृतामध्ये तज्ज्ञ असल्यामुळे धर्मबंधु मोहोळकर गुरुजींना संस्कृतचे दुसरे पुस्तक शिकविण्यास सांगितले. सत्तरी ओलांडलेल्या गुरुजींनी एकट्या विद्यार्थिनीसाठी आपला बहुमूल्य वेळ देऊन दररोज नियमितपणे येऊन भांडारकरांचे संस्कृत दुसरे पुस्तक व सुबोधिनी भाग २,३ शिकविला व सर्व पुस्तकांच्या परीक्षासुद्धा घेतल्या. त्यांचे उपकार या जन्मी तरी विसरणे शक्य नाही. संस्कृत भाषेत आणखी प्रावीण्य मिळवावे व कठीण ग्रंथांचासुद्धा अनुवाद करता यावा याकरिता संस्कृत शिक्षक शोधण्याकरिता भून गाडी घेऊन सांगली येथे गेल्या. दिवसभर चौकशी केल्यावर जयराम पु. जोशी नावाचे एक निवृत्त शिक्षक मिळाले. त्यांनी प्रत्येक शनिवारी, रविवारी बाहुबलीला येऊन पूर्ण वेळ देण्याचे कबूल केले. ठरल्याप्रमाणे २ महिने त्यांनी सपत्नीक बाहुबलीस येऊन शिकविले. ते संस्कृत भाषेत अस्खलित बोलत होते. काही कारणास्तव पुढे त्यांचे येणे बंद झाले.

परंतु भूनी आपली चिकाटी सोडली नाही. धर्मबंधु तात्याजींना सांगून बनारस किंवा सागरहून एखाद्या पंडितजींना बोलाविण्यासाठी पत्र लिहायला लावले. तात्याजींचे पत्र पोहोचताच त्यांच्या विनंतीला मान देऊन सागरहून श्री. मोतीलालजी साहित्याचार्य बाहुबलीस आले व त्यांनी ५ महिने येथे राहून पूर्ण लघुसिद्धान्त कौमुदी शिकविली. आपल्या प्रांतापासून ५

महिने एकटे दूर राहणे, शिवाय येथील खानपान निराळे तरी ते सर्व सहन करून पंडितजींनी भून व तात्याजींची इच्छा पूर्ण केली. भूनना अतिशय आनंद वाटला. आपली शिकण्याची इच्छा अपूर्ण राहिली निदान आपल्या धर्मपुत्रीची इच्छा तरी पूर्ण झाली याचे त्यांना समाधान वाटले.

भूनना शिकण्याची खूप जिद्द होती. त्यासाठी त्यांनी अनेक पंडित लोकांशी संपर्क साधला. पंडित फूलचंदजी, पं. रतनचंदजी मुख्तार, पं. पन्नालालजी, पं. जीवंधरजी, पं. खूबचंदजी, न्यायाचार्य पंडित दरबारीलालजी इत्यादी पंडितांना 'तुम्ही येथे या, किंवा तुम्ही सांगाल तेथे मी येते; परंतु मला शिकण्याची संधी द्या' अशा आशयांची लिहिलेली व त्यांची आलेली भूनच्या संग्रहातील पत्रे वाचून भूनना शिकण्याची केवढी जिद्द होती हे लक्षात येते. पं. फूलचंदजी, पं. जीवंधरजी, पं. दरबारीलालजी यांचा थोडा बहुत संयोग मिळालाही; परंतु तो जास्त काळ टिकू शकला नाही. सहजानंद वर्णीजींशीसुद्धा संपर्क चालू होता, पण तो योग जुळून आला नाही. जे काही मिळते ते आपल्या पुण्याच्या उदयाने प्राप्त होते. भाग्यापेक्षा अधिक मागूनही मिळत नाही. या तत्त्वज्ञानाच्या आधाराने भूननी समाधान मानले. मला नाही मिळाले. तुला मिळते तर तू शिक, तू शिकलीस की मी शिकल्यासारखेच आहे. अशाप्रकारे आपल्या धर्मकन्येला सर्व प्रकारचे शिक्षण द्यावे ही त्यांची तळमळ.

विमलताई मुराबुट्टे ४ दिवस सुट्टीमध्ये येत होत्या. तेव्हा त्यांना ४ दिवसात सुजाताला एक ग्रंथ शिकवा असे भून सांगत असत. भूनची आज्ञा शिरसावंद्य मानून एक वर्षी न्यायदीपिका व एक वर्षी प्रमेयरत्नमाला असे दोन ग्रंथ त्यांनी शिकविले. न्यायाचा अधिक चांगला अभ्यास व्हावा यासाठी तात्याजींकडून न्यायाचार्य पंडित दरबारीलालजी यांना बोलावण्यासाठी पत्र लिहून पाठविले. तात्याजी व भूनच्या आमंत्रणाला मान देऊन १९८६ साली ते बाहुबलीस आले. न्यायदीपिका ग्रंथ शिकवायला प्रारंभही केला; परंतु १५ दिवसातच त्यांचे प्रकृतिस्वास्थ्य बिघडले. त्यामुळे त्यांना आपल्या गावी जावे लागले. तरीही भूननी जिद्द सोडली नाही. १-२ वर्षानंतर पंडितजींशी



पुन्हा संपर्क केला. 'पंडितजी आप यहां नही आ सकते, तो हम आपके पास आयेंगे। आपको जो समय उचित लगे वह लिखियेगा।' पंडितजी बीना (मध्यप्रदेश) येथे राहत होते. बीनापासून खुरई जवळ. खुरईचे श्रीमंत सेठ व सेठानी भूनचे भक्त होते. त्यांच्याशी संपर्क साधून तेथे पंडितजींना बोलाविण्याची व्यवस्था केली. मी व भून येथून खुरईला गेलो. पंडित दरबारीलालजीसुद्धा तेथे आले व १।। महिना 'अष्टसहस्री' ग्रंथाचे वाचन केले. अष्टसहस्री ही कष्टसहस्री असल्यामुळे पूर्ण होण्यास एक-दीड वर्षे लागली असती. इतके दिवस दुसरीकडे राहणे अशक्य म्हणून १० कारिका झाल्यावर समाधान मानून बस केले. धर्मप्रेमी श्रीमंत सेठ, सेठानी व त्यांच्या सूनांनी आमची व पंडितजींची खूप छान व्यवस्था केली. सेठानींनी स्वत:च्या हाताने गरम गरम करून दीड महिना खाऊ घातले. त्यांची भक्ती व प्रेम अपूर्व होते.

प. पू. महाराजांच्या निर्याणानंतर कारंजाला एक महिना राहण्याचा योग आला. त्या अवधीत पंडिता विजयाताई भीसीकर यांना भूननी आज्ञा केली की 'सुजाताला लब्धिसार शिकवा.' धर्ममाता भूनची आज्ञा शिरोधार्य मानून साठी ओलांडलेल्या ताईंनी दररोज गावातून २ किलोमीटर दूर महावीर ब्रह्मचर्य आश्रमात येऊन माझ्या एकटीसाठी ५-६ तास देऊन २०-२२ दिवसातच लब्धिसारचे पाच अधिकार शिकवून पूर्ण केले. शेवटचा एक चारित्रमोहक्षपणा अधिकार शिल्लक होता. पुन्हा दुसऱ्या वर्षी कारंजाला गेल्यावर १५-२० दिवसात तो अधिकारही शिकवून ग्रंथ पूर्ण केला. माझ्यासाठी ताईनी घेतलेले श्रम मी कधीच विसरू शकत नाही. त्यांच्या ऋणातून मी या जन्मीतरी मुक्त होऊ शकत नाही.

**एकही अक्षर शिष्यको जो गुरु देय पढाय।**
**पृथ्वीपर वह द्रव्य नही देकर ऋण फिट जाय।।**

पुढे १९९० साली प. पू. समंतभद्र महाराजांच्या चरणपादुका स्थापनेच्या निमित्ताने प. पू. आचार्य विद्यानन्दी महाराजांच्या संघासोबत आर्यिका भरतमती माताजींच्या संघाचे बाहुबली येथे आगमन झाले होते.

त्यांना भूनकडून जीवकांड, कर्मकांड ग्रंथ शिकायचा होता. त्यासाठी भूनना विचारून त्यांनी येथे त्यावर्षीचा वर्षायोग केला. भूनचे वय झाल्यामुळे त्यांनी ही जबाबदारी माझ्यावर सोपविली. अद्यापि संस्कृत टीकेसहित हा ग्रंथ मी एकदाही वाचला नव्हता. मी आल्यापासून भूननी ग्रंथाचा अर्थ मलाच लावायला सांगून स्वत:च्या पायावर मला उभे केले होते. सिद्धान्ताचे पायाभूत मजबूत ज्ञान झाल्यामुळे कोणत्याही नवीन ग्रंथांचा अर्थ स्वत:हून लावण्याची कला आत्मसात झाली होती. त्यामुळे जीवकांड व कर्मकांड ग्रंथ स्वत: लावण्याचा प्रयत्न केला. दररोज माताजींच्याबरोबर ४ तास वाचन करायचे म्हटल्यावर त्याची तयारी करायलाही ४ तास लागत असत. त्याचवेळेस संस्कृत टीकेमधील अर्थसंदृष्टीचे गणित लावण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी श्री. जडे गुरुजींची मदत घेतली. बरीच अर्थसंदृष्टी लागली. त्यामुळे काहीतरी नवीन शिकल्याचा आनंद मला मिळाला. ६ महिन्यात दोन्ही ग्रंथ पूर्ण झाले. चारी माताजींनी अतिशय समाधान व्यक्त केले.

पुढे आपला अधिक वेळ ज्ञानाभ्यासात जावा या हेतूने राजस्थानमधून जैनधर्माची उपाध्याय परीक्षा देण्याचे मी ठरविले. भूननी त्याला पूर्ण प्रतिसाद देऊन सर्व प्रकारची मदत केली. ५ महिन्यात अकरा पेपरची स्वयंपाठीरूपाने तयारी करावयाची होती. त्यासाठी भूननी सर्व अनुकूलता करून दिली. कोणतेही काम न लावता अभ्यासात व्यत्यय आणला नाही. बुद्धीमध्ये सशक्तता रहावी म्हणून दररोज बदामाचा शिरा करून खाऊ घालत होत्या. कधीही कोठे न पाठवणाऱ्या भून परीक्षेसाठी १-१ महिना मला सोडून राहत असत. पुढे ३ वर्षे शास्त्री परीक्षा व २ वर्षे आचार्य परीक्षा देण्यासाठीसुद्धा त्यांनी प्रोत्साहन दिले. व सर्व प्रकारचे सहाय्य केले.

आचार्य परीक्षेनंतर आता परीक्षा देणे बंद करायचे असे ठरवून निश्चिंत झाले होते; परंतु दोन वर्षानंतर पंडित राकेश शास्त्रींचे दिल्लीहून पी.एचडी. परीक्षेला बसण्यासाठी प्रेरणाप्रद पत्र आले. ते वाचून भून मला तू पीएच.डी. कर म्हणून पाठी लागल्या. तुला पाहिजे ती सर्व मदत मी करते असे म्हणून त्यांनी उत्साहित केल्यामुळे 'आचार्य जयसेन प्रणीत ग्रंथांवर



समीक्षात्मक अध्ययन' या विषयावर ४ वर्षे अभ्यास करून लालबहादूर राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठामध्ये शोधनिबंध सादर केला व २००५ साली पी.एचडी. पदवी संपादन केली. मला पीएच.डी. मिळाल्यावर भूनना अतिशय आनंद झाला. तो आनंद येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांजवळ व्यक्त करून मोठ्या अभिमानाने सांगत असतात की 'आमच्या सुजाताने दिल्लीला जाऊन पीएच.डी. ची परीक्षा दिली आहे.' हे सर्व भूनच्यामुळेच शक्य झाले.

भूननी मला काय दिले हे विचारण्यापेक्षा त्यांनी मला काय दिले नाही हे विचारा. त्यांनी मला तन दिले, मन दिले, धन दिले, ज्ञान दिले, अभयदान दिले, आपले सर्वस्व दिले. कुणालाही न मिळालेला स्नेहाचा अखंड वाहता झरा मला मिळाला. जणू भूननी तो माझ्यासाठीच साठवून ठेवला होता.

**धर्ममातेची संताने –**

कोणतीही मुलगी किंवा मुलगा शिकण्यासाठी आला व तो ब्रह्मचर्यव्रत घेणार आहे असे म्हटले की भूनना खूप आनंद होत असे. त्यांना आपल्याजवळ ठेवून घेऊन शिकविण्यासाठी त्यांनी कधीही नकार दिला नाही. पूर्वी कोण कोण राहून गेले त्या सर्वांचा मला परिचय नाही; परंतु जयमाला, विशल्या, सुलोचना, सरला या मुलींची नावे मी भूनच्या तोंडून ऐकली आहेत. ब्र. यशपाल अण्णा येथे २६ वर्षे होते. त्यांना भूननी सतत अभ्यासाची प्रेरणा करून जीवकांड, कर्मकांड, समयसार इत्यादी ग्रंथ शिकविले. कुंभोज येथील ब्र. कुसुमताईंना ८-१० वर्षे आपल्याजवळ ठेवून ग. म. भ. पासून धर्माचे व संस्कृतचे सर्व शिक्षण दिले. आयुष्याला पुरेल अशी ज्ञानाची व सुसंस्कारांची शिदोरी दिली. बागणी येथील सौ. सुनंदाताईंना सासरी काही समस्या असल्यामुळे २-३ वर्षे भूनच्या छत्रछायेखाली राहण्याची संधी मिळाली. त्यांनाही संस्कृत व धर्माचे ज्ञान देऊन पायावर उभे केले. त्यांना दोन मुली होत्या. म्हणून त्यांनी सासरी जाऊन धर्माराधना करीत संसाराचा गाढा ओढला. प. पू. श्रुतसागर महाराजांच्या संघातील कुसनाळ येथील ब्र. नेमिनाथ भूनकडे शिकण्यासाठी आले. नेमिनाथ अत्यंत बुद्धिमान, संस्कृतची दोन पुस्तके व धर्माचे बरेच ग्रंथ

भूननी शिकविले. येथे क्षु. जिनेन्द्र वर्णी आले असता त्यांच्याबरोबर ते निघून गेले. सर्व भारतभर अनेक ठिकाणी ते जाऊन आले, परंतु भूनचे उपकार ते विसरले नाहीत. पुण्याच्या ज्योती जितेंद्र शहा सासरी पटत नसल्यामुळे १९८२ साली भूनच्या आश्रयाला आल्या. भूननी त्यांना अभयदान देऊन धर्माचा पाया घालून देऊन स्वावलंबी बनविले. स्वत:च्या उपजीविकेसाठी त्यांना मुंबईला शरयूताईंच्याकडे सर्व्हिस दिली. त्यांना एक छोटा मुलगा असल्यामुळे त्यांच्या मोहाने त्या पुन्हा सासरी गेल्या. त्यानंतर त्यांनी पुन्हा एका पुत्राला जन्म दिला. पुन्हा संसारामध्ये वितुष्ट निर्माण झाले. लहान बाळाला घेऊन भूनकडे त्या आल्या. भूननी पुन्हा त्यांना अभयदान दिले. पुन्हा ज्यावेळी सासरी बोलावण्यात आले तेव्हा भूननी त्यांच्या पतिराजांना पूर्ण समजाऊन व त्यांच्याकडून सर्व कबूल करून घेऊनच पाठविले. त्यानंतर त्यांचे सर्व व्यवस्थित झाले. सध्या त्या पुणे येथे सुखपूर्वक धर्माराधना करीत आहेत.

१९९६ साली क्षु. सुशीलमती माताजींच्या शिष्या ब्र. मंजूषा भूनजवळ करणानुयोगाचे ज्ञान घेण्यासाठी आल्या. भूननी त्यांना प्रेमाने आपल्याजवळ ठेवून घेतले. त्यांची पित्तप्रकृती असल्यामुळे त्यांना जेवण जात नसे. जेवता-जेवताच वान्ती येत असे. हिमोग्लोबिन तपासले तर फक्त ६% च होते. ओठ पांढरे पडलेले. भूननी त्यांना ताकातले औषध दिले व जबरदस्तीने खाऊ घातले. थोड्याच दिवसात त्यांची तब्बेत सुधारली. येथे ६ वर्षे राहून त्यांनी भूनकडून व माझ्याकडून धर्म शिक्षण घेतले.

२००३ साली आचार्य वर्धमानसागर महाराजांच्या संघातील दोन ब्रह्मचारिणी सरिताबेन व मधुबेन यांना आचार्यश्रींनी धर्मशिक्षण घेण्यासाठी भूनकडे पाठविले. भूननी त्यांना ठेवून घेतले व मला शिकवायला लावले. ४ वर्षात त्यांचा संस्कृत दोन पुस्तके, लब्धिसार, क्षपणासार, जीवकांड, समयसार न्यायदीपिका इत्यादी बऱ्याच ग्रंथांचा अभ्यास झाला. ऑक्टोबर २००७ साली त्यांनी आर्यिका सुपार्श्वमती माताजींकडून आर्यिका दीक्षा ग्रहण केली. गरिमामती (सरिताबेन) व गंभीरमती (मधुबेन) अशी त्यांची नावे ठेवण्यात आली.

अशा कित्येक मुला मुलींना धर्मज्ञान व सुसंस्काराचे बाळकडू पाजून



त्यांचे जीवन भूननी उन्नत बनविले आहे. भून त्यांना केवळ धर्मशिक्षणच देत नव्हत्या तर बसायचे कसे, उठायचे कसे, जेवायचे कसे, झोपायचे कसे, केसांचा भांग कसा पाडायचा, डोक्यावर पदर कसा घ्यायचा, मोठ्यांशी विनयाने कसे बोलायचे या सर्व गोष्टी त्यांना शिकवायच्या. स्वच्छता, टापटीप, शिस्त कशी ठेवावी? या सर्व गोष्टी भूनकडून त्यांना शिकायला मिळत असत. भूनजवळ राहिलेली मुलगी म्हटले की तिच्या अंगी उपर्युक्त सर्वगुण असणारच. कारंजा येथील ध. श्री. शिशुपाल सावजी, ध. श्री. अभयसावजी, ध. श्री. विष्णुसावजी आपल्या मुलींना योग्य वळण मिळून धर्माचे सुसंस्कार व्हावेत म्हणून भूनजवळ २-४ महिने त्यांना पाठवून देत असत.

कित्येक महिला सासरी सासूबरोबर पटत नसेल, पती व्यसनी असेल, मुलगा, सून सांभाळत नसेल तर त्या त्रासाला कंटाळून बाहुबलीला शरण शोधत भूनजवळ येत असत. भून त्यांना आपल्याजवळ ठेवून अभयदान देत असत. रुसून आल्यामुळे काही न खाता पिता व कपडे न घेताच त्या यायच्या. भून त्यांना आल्याबरोबर संस्थेत पोटभर खाऊ घालत. त्यांना आपल्या जवळील कपडे, आंथरूण, पांघरूण देऊन त्यांचे मन शांत करीत. ४-८ दिवसात त्यांच्या सासरचे लोक शोधत आले की त्यांना 'छळवाद करू नका' म्हणून समजावून सांगत. व्यसनामुळे होणारे तोटे सांगून त्यांना व्यसने सोडायला लावीत. सर्व गोष्टी कबूल केल्यानंतर त्यांच्याबरोबर त्या महिलेला पाठवून देत. हे सर्व करीत असतांना भून एका वकिलाप्रमाणे शोभून दिसत असत.

कोणत्याही विद्यापीठाची बी.ई., एम.डी., एल.एल.बी., एम.बी.ए. इत्यादींपैकी कोणतीही पदवी न घेतासुद्धा डॉक्टर, वकील, इंजिनिअर व ऑफीस मॅनेजमेंट इत्यादी योग्यता त्यांच्या अंगी निसर्गत: विद्यमान आहेत. त्यांनी आपल्या बुद्धिवैभवाने, अनुभवाने व प्रयोगपद्धतीने या योग्यता संपादन केल्या आहेत.

वयाच्या ८८ व्या वर्षापासून त्यांना थोडे विस्मरण होऊ लागले आहे. तसा त्यांनी बाह्य व्याप कमी केला आहे, जीवहिंसा टाळावी म्हणून त्यांनी प्रवासही कमी केला. सकाळी पूजन, तिन्ही वेळा स्वाध्याय, दोन

वेळा सामायिक न चुकता चालू आहे. अन्य गोष्टी विसरत असल्यातरी तत्त्वाच्या बाबतीत त्यांना आजही विस्मरण झाले नाही. वयोमानपरत्वे वाचन होत नसले तरी सकाळ व संध्याकाळ स्वाध्याय ऐकायला तास-न्-तास मांडी घालून एका आसनावर आजही बसतात. वक्त्याचे कोठे अशुद्ध उच्चारण झाले किंवा सांगायला चुकले तर तेथे बरोबर त्याला टोकतात. ऐकायला बसलेल्या श्रोत्यांच्याकडेही त्यांचे बारीक लक्ष असते. कुणाचे ऐकण्याकडे लक्ष आहे की नाही, कोणी झोपतात का? याकडेही त्यांचे लक्ष अजूनही असते. सर्वांनी शास्त्रज्ञानाचा फायदा करून घ्यावा अशी त्यांची आंतरिक भावना असते. इष्टोपदेश, समाधिशतक, समयसारमधील कोणताही श्लोक चालू केला की पुढे त्याबरोबर म्हणतात. हे सर्व आयुष्यभर केलेल्या ज्ञानाराधनेचेच फळ म्हणावे लागेल.

माझ्याजवळ ब्र. विद्या, ब्र. श्रुतिका शिकत असताना त्यांना विचारतात. 'तुम्ही काय शिकता? ग्रंथाचे नाव सांगितले तर लगेच त्यातील प्रश्न विचारून त्यांची परीक्षा घेतात व प्रेरणा करतात. 'खूप शिका, खूप ज्ञान मिळवा, आपले जीवन सफल करा.'.

४ जून २०११ रोजी 'देवलाली' येथे अचानक पडल्यामुळे त्यांच्या कमरेला मार लागला. त्यामुळे उठणे, बसणे,चालणे कठीण झाले; परंतु त्याही अवस्थेत धर्माचा उपदेश सांगितला तर तो व्यवस्थित ग्रहण करीत असत. देवदर्शन केल्याशिवाय कधी तोंडात पाणी घेतले नाही. थोड्या औषधोपचाराने पुन्हा त्यांची प्रकृती सुधारली. २१ नोव्हेंबर २०११ ला, ९८ वर्षे पूर्ण होऊन त्यांनी ९९ व्या वर्षामध्ये पदार्पण केले आहे. सकाळी देवपूजा, सकाळ, सायंकाळ प्रवचन ऐकणे, दुपारी कॅसेटच्या माध्यमातून प्रवचन ऐकणे, सामायिक करणे हे नित्यक्रम आजही सुरू आहेत. धर्माची भक्तिगीते, बारा भावना, वैराग्य भावना, इत्यादी म्हणून दाखविले तर लक्षपूर्वक ऐकतात. नेहमी त्यांच्या तोंडात हे वाक्य असते, 'या मनुष्य भवात आपल्याला सर्व प्रकारची अनुकूलता आहे, फक्त आपण सुधारायला पाहिजे, पुरुषार्थ केला पाहिजे.' त्यांची ही भावना सफल होऊन शेवटी सल्लेखनारूपी रत्नमयी कळस चढवून त्यांचे पवित्र जीवनरूपी सुवर्ण मंदिर पूर्णत्वास प्राप्त होवो हीच मंगलभावना आहे. ❏❏❏